म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५८०८
९८·२०

# आनंदलहरी.

## ( काव्यसंग्रह )

लेखक व प्रकाशक

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए.
संपादक 'मुमुक्षु' पुणें.

REFBK-0001830
REFBK-0001830

मत बारा आणे.

# अनुक्रमणिका.


| नं. | | रचनेचें स्थळ व काळ | पद्यसंख्या | पृ. |
|---|---|---|---|---|
| १ | समर्पण | ... ... ... ... ... ... ... | ३ | १ |

## १ स्तोत्रें

| नं. | | रचनेचें स्थळ व काळ | पद्यसंख्या | पृ. |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीगणेशध्यान | संगमनेर, गणेशचतुर्थी शके १८२१ | २१ | ३ |
| २ | मोरयाचें भजन | पुणें, अश्विन शु० ३ शके १८३४ | ९ | ५ |
| ३ | श्रीरामप्रार्थना | पंढरपूर, चैत्र शु० १ शके १८२५ | १२ | ६ |
| ४ | रामप्रार्थना | धुळें, माघ वद्य ३ शके १८२८ | १० | ८ |
| ५ | आत्मकथन | धुळें, रामनवमी शके १८२९ | ११ | ९ |
| ६ | [illegible]स्तव | पुणें, माघ शुद्ध ५ शके १८२९ | ६ | १० |
| ७ | श्रीकृ[illegible]प्रार्थना | पुणें, माघ वद्य ११ शके १८३० | ८ | ११ |
| ८ | हरिशरणागति | पुणें, वैशाख वद्य ३ शके १८३६ | ९ | १२ |
| ९ | दर्शनाची आस | पुणें, चैत्र शके १८३६ | २४ | १३ |
| १० | श्रीरामाष्टक | इंदूर, श्रावण वद्य ११ शके १८३९. | ९ | १५ |
| ११ | श्रीरामस्तुति | पुणें, माघ वद्य ७ शके १८३९ | १५ | १७ |
| १२ | अवतारप्रयोजन | उमरावती, रामनवमी शके १८२८ | ५ | १९ |
| १३ | द्वैताद्वैतसंगतिस्तोत्र | इंदूर, आषाढ शके १८३९ | १२२ | २० |
| १४ | नर्मदास्तव | महेश्वर, पौष शके १८३९ | २ | ३३ |
| १५ | सप्तशृंगी | सप्तशृंगी, नवरात्र शके १८२२ | ५ | ३४ |
| १६ | मनीषानिवेदन | मुंबई. आश्विन वद्य ११ शके १८४० | २ | ३५ |
| १७ | आनंदाचा क्षण | पुणें, चैत्र शुद्ध १५ शके १८३६ | १० | ३६ |
| १८ | पदें | पुणें | ५ | ३८ |


२८६

## २ महाराष्ट्र, संत आणि सद्ग्रंथ.


| | | | |
|---|---|---|---|
| १९ माझा महाराष्ट्र | मसूरी, वैशाख शुद्ध ६ शके १८३६ | २१ | ४१ |
| २० महाराष्ट्रमहोदय | पुणें, दासनवमी शके १८४१ | ६० | ४३ |
| २१ गीता–ज्ञानेश्वरी | पुणें, पौष वद्य ४ शके १८४१ | १३ | ५५ |
| २२ कविवर्य मोरोपंत | पंढरपूर, जेष्ठ शके १८२३ | ३१ | ५७ |
| २३ मनाचे श्लोक | इंदूर, मार्गशीर्ष शके १८३८ | ६ | ६० |
| २४ दासबोधाचें मंगलाचरण | हैदराबाद, श्रावण शके १८४० | १३ | ६१ |
| २५ जन्मसाफल्य | उमरावती, पाडवा शके १८२८ | ८ | ६४ |
| २६ धर्मगुरूचा आदर्श | पुणें, शके १८१७ | | ६६ |


## ३ उपदेशपर कविता.


| | | | |
|---|---|---|---|
| २७ उद्यम | इंदूर, माघ शके १८३८ | १३ | ६९ |
| २८ निग्रहासी साध्य सर्व कांहीं–मसूरी, वैशाख शके १८३८ | | २७ | ७१ |
| २९ व्यवहारनीति–फटका | पुणें, शके १८१६ | | ७४ |
| ३० अनुभव योगिराज–सर्ग १ ला | संगमनेर शके १८२१ | ७२ | ७६ |
| सर्ग २ रा | पंढरपूर, शके १८२४ | ५३ | ८३ |
| ३१ क्रोध | इंदूर, शके १८४० | | ८८ |
| ३२ आपत्तीचें गाणें | पुणें, श्रावण शके १८४१ | २५ | ८९ |
| ३३ स्तुतिनिंदा | पुणें, माघ शके १८२९ | ५ | ९४ |
| ३४ स्वातंत्र्यलाभ | उमरावती, कार्तिक शके १८२८ | | ९५ |


## ४ प्रासंगिक.


| | | | |
|---|---|---|---|
| ३५ विवाहसमयीं सासऱ्याचा उपदेश–मुंबई, माघ वद्य १ शके १८२१ | | १० | ९६ |
| ३६ एक प्रसंग–'भयकृत् भयनाशनः' इंदूर, नाथषष्ठी शके १८४१ | | १६ | ९८ |
| ३७ लीला आणि मोगरा | इंदूर, फाल्गुन वद्य ७ शके १८४० | ५ | १०२ |
| ३८ पद्मेचें हास्य | पुणें, कार्तिक शके १८४१ | ४ | १०६ |
| ३९ स्नेहलता | इंदूर, श्रावण शके १८३९ | ५ | १०७ |
| ४० उपकृतिस्मरण | पुणें, चैत्र शके १८४२ | ७८ | १०८ |

॥ श्रीविठ्ठलाय नमः ॥

# ग्रंथपरिचय

गेल्या पंचवीस वर्षांत वेळोवेळीं वेगवेगळ्या विषयांवर मी लिहिलेल्या कविता ह्या पुस्तकांत एकत्रित केल्या आहेत. ह्यांतील गुणदोषांचें विवेचन करण्याचें काम मार्मिक रसिकांचें आहे, माझें नाहीं. यांत दोष असतील व आहेत, पण गुण कांहींच नाहींत असें मला वाटतें तर त्या प्रसिद्ध करण्याच्या भानगडींत मी मुळींच पडलों नसतों. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वाणीनें ' तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें । करूनि घ्यावें हें तुमतें । विनवित असे ॥ ' अशी वाचकांची प्रार्थना करून प्रस्तुत ग्रंथाचा त्यांस परिचय करून देतों.

२ ह्यांतील ७४ व्या पृष्ठावरील ' फटका ' सुमारे २२।२४ वर्षांपूर्वीं ' करमणूक ' पत्रांत प्रसिद्ध झाला होता. ' अनुभवयोगिराजांच्या ' आर्या मुंबईच्या माजी ' श्रीसरस्वतिमंदिर ' मासिकांत प्रथम प्रसिद्ध झाल्या. ' जन्मसाफल्य ' हें अष्टक इ. स. १९०६ सालीं उमरावतीस कांहीं प्रसंगानें तयार झालें व त्याच्या छापील प्रती श्रोत्यांस वाटल्या जाऊन त्यावर श्री. दादासाहेब खापर्डे यांनीं व्याख्यानही दिलें होतें. हीं व आणखी ४।५ प्रकरणें रा. नरसोपंत केळकर यांनीं संपादिलेल्या ' अभिनवकाव्यमालेच्या ' तिसऱ्या भागांत प्रसिद्ध झालीं आहेत. रा. किन्हरे यांनीं आपल्या ' काव्यामोदांत ' तीन प्रकरणें घेतली असून मध्यप्रांतांच्या विद्याखात्यानें

प्रसिद्ध केलेल्या क्रमिक पांचव्या पुस्तकांत ' जन्मसाफल्य ' हें अष्टक घेतलें आहे. वऱ्याचशा कविता वेळोवेळीं मी मुमुक्षूंत प्रसिद्ध केल्या आहेत. याशिवाय कांहीं स्तोत्रें वगैरे डायरींतच सिसपेन्सिलीनें लिहिलेलीं पडलीं होतीं तीं निवडून यांत घेतलीं आहेत. ' द्वैताद्वैतसंगति ' यांनाल विचार द्वैती व अद्वैती या उभयतांस पसंत पडले असून ' उभय मतांचा समन्वय आपण फार उत्तम केला आहे ' असे उद्गार हुबळीच्या श्रीसिद्धारूढ स्वामीनीं काढले होते. हें प्रकरण व ' महाराष्ट्रमहोदय ' हीं दोनीं स्वतंत्रपणें छापलीं आहेत. ' उद्यम ' ' माझा महाराष्ट्र ' व महाराष्ट्रमहोदय ' हीं माझ्या महाराष्ट्रावरील प्रेमामुळें निर्माण झालीं आहेत. ' उद्यम ' ' आपत्तीचें गाणें ' व ' निःशस्त्री सत्य सर्व कांहीं ' हीं तीन प्रकरणें प्रयत्न, पौरुष व निग्रह या गुणांना उत्तेजक आहेत. ' एक प्रसंग ' ' लीला आणि मोत्या ' व ' पत्नीचें हास्य ' हीं काव्यं गृहस्थाश्रमांत सर्वांच्या अनुभवाला येणारीं अशीं वत्सलरसपूर्ण आहेत. यांत मुलांच्या बाललीलांचें कौतुक केलें आहे. ' उपकृतिस्मरण ' हें आत्मचरित्रपर प्रकरण मात्र ह्या पुस्तकाचे चार फॉर्म छापून निघाल्यावर लिहिण्याची बुद्धि झाली. तें नुक्तेंच म्हणजे परवा चैत्रांत लिहिलें गेलें व तसेंच छापावयास पाठविलें. माझ्या वडिलांची भगवद्भक्ति; पुण्याच्या शाळा—कॉलेजांतील शिक्षण; माझ्या आवडीचे संस्कृत, मराठी व इंग्रजी ग्रंथकार; आगरकर, रानडे, जिन्सीवाले व टिळक; आगरकरांच्या संगतीनें नास्तिकपणाची झालेली प्रवृत्ति व तिचें भगवत्कृपेनें झालेलें निरसन, परमार्थदृष्टीनें झालेलें ग्रंथाध्ययन, साधु-

काव्य ५८

ग्रा० क्र० १८३०

ग्र. क्र. १८३०

REFBK-0001830

REFBK-0001830

सं-काव्य ९१

॥ श्रीविठ्ठल प्रसन्न ॥

# आनंदलहरी

## काव्यसंग्रह

लेखक व प्रकाशक

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.,
संपादक ‘ मुमुक्षु ’ पुणें.

अक्षय्य तृतीया शके १८४२—मे १९२०

किंमत बारा आणे

प्रिंटर्स

रा. रा. महादेव सखाराम दाते खेडकर वैद्य यांनीं पुणें पेठ शनवार घर नंबर १२१ येथें आपल्या "वैद्यकपत्रिका" छापखान्यांत छापिलें.

 काव्यह. ...

संतांचा दर्शनसहवास, वाद व संवाद, अलीकडील स्थिरावलेली मनाची बैठक इ. विषय ह्या शेवटच्या प्रकरणांत आले आहेत. पहिली १८ प्रकरणें केवळ भगवद्भक्तिपर आहेत, बाकीच्यांचें दिग्दर्शन वर केलें आहेच.

३ ह्यांतील ४० प्रकरणांशिवाय श्रीतुकाराममहाराजांचें अभंगांत गायिलेलें चरित्र ह्या ग्रंथाबरोबरच पण स्वतंत्रपणें प्रसिद्ध होत आहे. मोठें गद्यचरित्र वेगळें तयार झालें आहे, त्याचा ह्या अभंगात्मक चरित्राशीं संबंध नाहीं. वाचकांनीं दोहोंचा गोंधळ करूं नये.

४ प्रस्तुत काव्यसंग्रहाचें नांव ' **आनंदलहरी** ' असें ठेविलें आहे. आनंदाच्या लहरींतच हीं बहुतेक प्रकरणें निर्माण झालीं आहेत. काव्य ह्मणजे कवीच्या हृदयांतील आनंदलहरी. चित्त प्रसन्न असतां, आनंदतरंगाशीं खेळत असतां, त्यासह सुखस्वरूपाचें आंदोलन पावत असतां हीं काव्यें जन्मास आलीं तेव्हां आनंदलहरीपेक्षां यांना दुसरें कोणतें नांव द्यावें ? काव्यरचनाकालीं कवीला, किंबहुना कोणतेंही सत्कार्य करीत असतांना कर्त्याला जो अनुपम आनंद होतो त्यापेक्षां त्याला कोणत्याही बक्षिसाची अपेक्षा नसते. लहान मुलांसारखीच कवींची ' सद्यःपरनिर्वृति— ' परता असते. काळाच्या अनंतत्वांत कशाची यशःस्फीति ? भासासारख्या कवींचीं रमणीय नाटकेंही जग अल्पावधींत विसरून जातें, तेथें इतरांची मातब्बरी काय ? लहान मुलें वर्षाकाळाच्या प्रारंभीं गावांतील नदीनाले पाण्यानें तुडुंब भरून वाहत असतांना अत्यंत हौसेनें कागदाच्या नावा

करून पाण्यांत सोडतात, त्यांचें आंदोलन सकौतुक आनंदभरित होऊन पाहतात, त्या आनंदलहरींत घरदार व सारें जग विसरतात! नावांचा खेळ खेळतांना मुलें जो तन्मयतेचा आनंद भोगतात, जें अव्याजमनोहर सुख अनुभवितात त्यापुढें त्या नावा तरतात कां बुडतात, कां कोठें वाहत जातात, याचा विचारही त्यांला स्फुरत नाहीं. काव्यरचनाकालीं कवींचें सुख याच प्रकारचें असतें. आपल्या लेकराला न्हाऊं माखूं घालून अलंकारमंडित करून त्याकडे सप्रेम पाहण्याचा जो आनंद आईला, तोच आनंद आपला ग्रंथ जगापुढें ठेवतांना ग्रंथकाराला. तें बाळ पुढें आपल्या प्रारब्धकर्मानुसार बरें वाईट फळ भोगावयाचें असेल तें भोगील. तो विचार आई आपल्या आनंदानुभवांत गर्क असतांना करीत नाहीं!

५ माझे रसिक मित्र माधव गोविंद भिडे कीं, ज्यांच्या सप्रेम नजरेखालून माझी प्रत्येक ओळ लिहिल्याबरोबर किंवा लिहितां लिहितांच जाते त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों; अथवा १०।१२ वर्षांच्या सतत सहवासामुळें त्यांचे विचार कोणते व माझे कोणते हेंही चिरस्नेहामुळे आमचे आह्मांसच कळणें जेथें दुर्घट होत चाललें आहे तेथें आभार तरी कोणी कोणाचें मानावें?

अक्षय्य तृतीया
१८४२.

ल. रा. पांगारकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क. ९८३०

# समर्पण.



उपजाति.

वाक्पुष्प माझें तुजला समर्पण
माझें ह्मणायासि नसेहि कारण ।
वाचा तुझी बोलविताहि तूं हरी
सत्ता तुझी गाजतसे चराचरीं ॥ १ ॥
नृदेह हा दुर्लभ निर्मुनी भला
त्वां वाग्लता लाविलि यांत कोमला ।

प्रेमामृतें सिंचुनि आपण स्वयें
संगोपिली त्वां सदयेंहि चिन्मय ॥ २ ॥

[1]सपुष्प वाणी तव वाहिली तुला
म्यां कोठुनी गा हरि ! आणिले हिला ।
वा ! अंगसंगें करुनी सुनिर्मला
प्रेमादरें स्वीकारि गा ! हिला—मला ॥ ३ ॥

---

१ तारुण्यांत आलली.

# १ स्तोत्रें.

## १ श्रीगणेशध्यान.

साकी.

विघ्ननाशका ! सिद्धिदायका ! नमितों मी सद्भावें ।
ऋद्धिसिद्धिसह गजानना ! हो देवनायका ! यावें ॥
वहनावरि बसुनी । हस्तीं मोदकही धरुनी ॥ १ ॥
शब्दब्रह्माकार दिसे तव मूर्ती ही सकलांला ।
ज्ञानरूप तूं असती ऐसें सांगति गुरु आह्मांला ॥
प्रत्यय हा आला । संशय विलयाला गेला ॥ २ ॥
व्यासमुनींचीं अष्टादश हीं महापुराणें गमतीं ।
अलंकार तव गात्रावरचे–भावदीप्तिनें खुलती ॥ ३ ॥
सहा भुजांचीं आकृति पाहुनि निश्चय कीं षट्शास्त्रें ।
हींच ह्मणुनि या करीं चमकती विसंवादशस्त्रास्त्रें ॥ ४ ॥
एके हातीं मोदक मिरवे वेदान्तामृतसार ।
अन्यहस्तिचा परशु दाखवी भीति नास्तिका फार ॥ ५ ॥
शुंडादंडाहि विवेकवंता मोक्षसुखाचा कंद ।
वंदन करितां शंभुनंदना होत असे आनंद ॥ ६ ॥
स्फटिकासम जो दंत विलसतो तो समतेच्या भासें ।
गुरुशिष्यांचा प्रेमळ सुखकर सुसंवादसा भासे ॥ ७ ॥
ज्ञानसुगंधें युक्त झळकती माळा ज्या सुमनांच्या ।
माळा नसुनी उपनिषदें शिरिं राजति सुरराजाच्या ॥ ८ ॥
अकार मांडी पदद्वयाची उदर उकाराकार ।
मकार मस्तक विशाल तव हें धन्य रूप ॐकार ॥ ९ ॥
भक्तांमाजी आर्तचि पहिला जिज्ञासू तो दुसरा ।

प्रेमामृतें सिंचुनि आपण स्वयें
संगोपिली त्वां सदयेंहि चिन्मय ॥ २ ॥
संपुष्प वाणी तव वाहिली तुला
म्यां कोठुनी गा हरि ! आणिले हिला ।
वा ! अंगसंगें करुनी सुनिर्मला
प्रेमादरें स्वीकारि गा ! हिला—मला ॥ ३ ॥

---

१ तारुण्यांत आलली.

# १ स्तोत्रें.

## १ श्रीगणेशध्यान.

साकी.

विघ्ननाशका ! सिद्धिदायका ! नमितों मी सद्भावें ।
ऋद्धिसिद्धिसह गजानना ! हो देवनायका ! यावें ॥
वहनावरि बसुनी । हस्तीं मोदकही धरुनी ॥ १ ॥
शब्दब्रह्माकार दिसे तव मूर्ती ही सकलांला ।
ज्ञानरूप तूं असली ऐसें सांगति गुरु आह्मांला ॥
प्रत्यय हा आला । संशय विलयाला गेला ॥ २ ॥
व्यासमुनींचीं अष्टादश हीं महापुराणें गमतीं ।
अलंकार तव गात्रावरचे–भावदीप्तिनें खुलती ॥ ३ ॥
सहा भुजांचीं आकृति पाहुनि निश्चय कीं पट्शास्त्रें ।
हींच ह्मणुनि या करीं चमकती विसंवादशस्त्रास्त्रें ॥ ४ ॥
एके हातीं मोदक मिरवे वेदान्तामृतसार ।
अन्यहस्तिचा परशु दाखवी भीति नास्तिका फार ॥ ५ ॥
शुंडादंडाहि विवेकवंता मोक्षसुखाचा कंद ।
वंदन करितां शंभुनंदना होत असे आनंद ॥ ६ ॥
स्फटिकासम जो दंत विलसतो तो समतेच्या भासें ।
गुरुशिष्यांचा प्रेमळ सुखकर सुसंवादसा भासे ॥ ७ ॥
ज्ञानसुगंधें युक्त झळकती माळा ज्या सुमनांच्या ।
माळा नसुनी उपनिषदें शिरिं राजति सुरराजाच्या ॥ ८ ॥
अकार मांडी पदद्वयाची उदर उकाराकार ।
मकार मस्तक विशाल तव हें धन्य रूप ॐकार ॥ ९ ॥
भक्तांमाजी आर्तचि पहिला जिज्ञासू तो दुसरा ।

अर्थार्थी तिसरा, तो ज्ञानी देवा ! त्वद्रूप खरा ॥ १० ॥
ज्ञान्याची भूमिका ‘ चतुर्थी ’ पावतांच तव जन्म ।
होउनि लोपे मनश्चंद्र, तद्दर्शन तेथें अधम ॥ ११ ॥
जागृत्यादि अवस्थात्रय तें ओलांडुनियां जावें ।
तेव्हां तुर्या—चतुर्थीस तव मंगलदर्शन व्हावें ॥ १२ ॥
दर्शन झालें, कृतार्थ गमले, तरि तें साधन करितां ।
नवविधभक्तिपथानें जातां साध्याचि येइल हातां ॥ १३ ॥
आत्मनिवेदन होतां ध्याता विरुनि ‘ चतुर्दशभुवनें ।
व्यापुनि उरला ‘ अनंत, ’ मग तें ध्यान करावें कवणें ? ॥१४॥
एकीं दाविसि अनेकता तूं एक अनेकीं अससी ।
एकात्मता न खंडे ह्मणुनीं ‘एकदंत’ वा ! दिससी ॥ १५ ॥
अणुरेणुहि जें सूक्ष्म सान तें अधिष्ठान तव नाथा ! ।
‘मूषकवाहन’ नाम ह्मणुनि हें सुचलें रुचलें संतां ॥ १६ ॥
विघ्नांचें कोठार असा हा दुःखरूप संसार ।
आह्मे सकळां ठावा, गावा येथ तूंचि वा ! सार ॥ १७ ॥
संसारस्वप्नातें उडविसि आत्मसुखामृत देसी ।
ह्मणुनी दिधली ‘विघ्नहर’ प्रभु आख्या संतीं ऐसी ॥ १८ ॥
ब्रह्मांडांच्या अनंत कोटी सांठविल्या तव पोटीं ।
यास्तव ‘ लंबोदर ’ ऐसें हें नाम जनांच्या वोठीं ॥ १९ ॥
ज्ञानस्वरूप तूं गणराया ! ज्ञानदानही करिसी ।
स्वानंदाचे भजका द्याया ‘मोदक’ हातीं धरिसी ॥ २० ॥
वंदन करितों पुनः पुन्हा मी विद्यागारा ! तुजला ।
अज्ञानाचें पटल काढुनी सद्विद्या दे मजला ॥
तुजविण संसारीं । कोण लक्ष्मणा तारी ? ॥ २१ ॥

## २ मोरयाचें भजन.

( माझा वडील मुलगा मोरया दोन वर्षांचा असतांना त्याशीं सहज खेळतां खेळतां ' मोरया यावे यावे । बापा लवकर यावें ' असा चरण तोंडून आला व अकस्मात् ' तो मोरया ' वृत्तीवर उभा राहून पुढील भजन निर्माण झालें. )

मोरया यावें यावें । बापा लवकर यावें ॥ ध्रु० ॥ मोरया हो लवकर यावें । अहो समयातें पावावें । आह्मांतें सांभाळावें । ब्रीदातें वा पाळावें । अहो दर्शन द्यावें । निजरूपातें दावावें । अहो लवकर यावें ॥ मोरया० ॥ १ ॥ अहो श्रद्धाबळ द्यावें । प्रज्ञाबळ द्यावें । शक्तीबळ द्यावें । युक्तीबळ द्यावें । अहो भक्तीबळ द्यावें । साधूंचें यश गाया । प्रज्ञाबळ द्यावें । अहो मोरयाहो लवकर यावें ॥ २ ॥ आमुचें आह्मां द्यावें । निजरूपधन द्यावें । मायिक सर्वहि न्यावें । नश्वर सर्वहि न्यावें । अविनाशी पद दावावें । आत्मपदीं हो बसवावें । मोरयाहो लवकर यावें ॥ ३ ॥ अहो क्लेशांतें वारावें । मोहातें वारावें । विघ्नांतें वारावें । दुष्टांतें निर्दाळावें । षड्रिपुंतें निर्दाळावें । पुण्यातें सांभाळावें । सात्विक सांभाळावें । अष्टभाव सांभाळावें ॥ मोरयाहो० ॥ ४ ॥ अहो शमदम द्यावे । यमनियमांचें सत्फळ द्यावें । चित्स्वरूप द्यावें । सत्यस्वरूप द्यावें । सदानंदरूप द्यावें । माझें मजला द्यावें । अभेदभजनाचें वर्म दावावें ॥ मोरयाहो० ॥ ५ ॥ अहो प्रेमाचें ज्ञान द्यावें ।

ज्ञानाचें प्रेमहि द्यावें । गुण गातां चित्त रमावें । चित्ताचि हें चैतन्य व्हावें । आपपर भेद नुरावे ॥ मोरयाहो० ॥ ६ ॥ अहो सर्व तूंचि भावावें । सर्वाभूतीं तूंचि दिसावें । स्वरूपाचें प्रेम भरावें । श्रीहरिचें प्रेम भरावें । स्वस्वरूप डोळां यावें । आंतबाहेरि म्यांचि भरावें ॥ मोरयाहो० ॥ ७ ॥ अहो जिव्हेवरि बैसावें । हृदयांतरिं बैसावें । या मुकयातें वदवावें । पंगूतें चालवावें । हृदयचौफाळीं स्थिर व्हावें । स्वानंदाचे डोल यावे ॥ मोरयाहो० ॥ ८ ॥ अहो विश्वांच्या दातारा । वेदांच्या गव्हरा । अहो शास्त्रांच्या जिव्हारा । धर्माच्या गोभारा । अहो साधूंच्या माहेरा । वाणींच्या परात्परा । लवकर यावें । सर्वांगीं संचरावें । हृदयकल्हारीं स्थिर व्हावें । मोरयाहो लवकर यावें ॥ लक्ष्मणासि पावावें ॥ मोरया० ॥ ९ ॥

---

## ३ श्रीरामप्रार्थना.

आर्या.

श्रीरामा जयरामा ! भक्तारामा ! अनंतगुणधामा ! ।
वंदी दास पदाब्जा अवाप्तकामा ! विभो ! घनश्यामा ! ॥१॥
त्वद्गुणकीर्तनरस म्यां सेवावा वा ! अतृप्तकर्णांहीं ।
त्वत्पदपद्मद्वय पहावें अखंड—यावेगळी स्पृहा नाहीं ॥ २ ॥
नेत्रादींद्रियसंघ प्रभो ! तुवां रक्षिला सदा साचा ।
ह्याच उपायनभावें अर्पावा तुजचि हेतु दासाचा ॥ ३ ॥

‘ आरोग्य धन महत्तम ’ वदला श्रीभारतीं महाव्यास ।
मज तें द्यावें, पुरलें, स्वर्णाचा मज नसोचि हव्यास ॥ ४ ॥
सद्विद्याधन द्यावें कीं भ्रम हा लेशही नुरावाच ।
मज भगवद्भक्तांचा संग घडो राघवा ! सदा साच ॥ ५
नामाधीन प्रभु तूं, नामहि त्वद्भक्त जें तयासंगीं ।
त्वद्भक्तसंग यास्तव सदया ! दे पंगु दास आपंगीं ॥ ६ ॥
शुद्धचित्त जेणें शत्रहि सन्मित्र आप्त होतात ! ।
तीर्थांचे तीर्थ तुझे पायहि येणेंचि प्राप्त हो तात ! ॥ ७ ॥
शांति क्षमा दया या गंगायमुनासरस्वती असती ।
यांत निमज्जन करुं हें चित्त, घडो या तिथें सदा वसती॥८॥
श्रीमन्मयरचरितीं मन घालुनि चार जाहले अब्द ।
ग्रंथ प्रसिद्ध लवकर हो सुजनाचा न यो मला शब्द ॥ ९
संतमहंतहि मागे झाले तद्ग्रथितकाव्यमकरंदा ।
म्यां भ्रमरें लोभावें छंद पुरा द्याचि या महा मंदा ॥ १० ॥
ही आळ पुरवुनी गा ! स्वीकृत कार्यी सदा सुयश द्यावें ।
घ्यावें लक्ष्मणबाळें प्रभुपदपंकजरजा शिरीं घ्यावें ॥ ११ ॥

## अश्वधाटी.

गावें तुझें नाम हा एवढा काम साधोनि आराम चित्तासि दे ।
तूं भक्तविश्राम देवा ! घनश्याम ! गायासि निष्काम वा प्रेम दे ॥
रामा ! परंधाम पावावया ठाम सद्भक्तसंतामधें वास दे ।
दे शुद्ध वाचामती मूर्ति ती श्याम पूर्ती मनीं कोमला राहुं दे १२

---

# ४ रामप्रार्थना.

( ‘ मुमुक्षू ’ च्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकांतील मंगलाचरण )

आर्या.

श्रीरामा ! जयरामा ! जयजयरामा ! विभो घनश्यामा ! ।
तुझिया पदकमलाहुनि आधार जगत्त्रयीं नसे आह्मां ॥ १ ॥
विषयसुखाभासाला मानस विटलें, दया करा देवा ! ।
स्वोन्नत्यर्थ झगडतों–परि माझ्या अभयकर शिरीं ठेवा ॥२॥
योगक्षेम तयांचा चालविसी येति जे तुला शरण ।
निजधन त्यांतें अर्पिसि सद्भावें करिति जे तुझें स्मरण ॥ ३ ॥
बापा ! संचित जाळी, दयाकरा ! तूंचि होसि पावकसा ।
आरोग्य, यश, सुसंपत्, दे मजला, धांव, धांव; पाव कसा ४
मायानिर्मित दुःखें दुःसह (दुःसह) परि तीं अपाप वोसरती ।
सरतीच यातना जरि जीव जगन्नायका ! तुला स्मरती ॥५॥
व्यंकटरमणा ! संकट वारुनि दावी अकंटक सुपंथ ।
खंत कशास करूं ? यश, सुख दे, पाहों नको नको अंत ॥६॥
विषयविषचि निरय, परि त्यांतुनि सोडील एक सत्कर्म ।
सर्व सुखाचें वर्मचि धर्म, इतरथा न पाविजे शर्म ॥ ७ ॥
त्या धर्मीं मति गुंतो, जसि कां गूळासि गुंतते माशी ।
राज्य असो, मोक्ष असो, धर्मचि जीवासि येत कामाशीं ॥८॥
दे बुद्धींत सुनिश्चय, तैसा दे सुप्रसाद वाणींत, ।
सर्वेंद्रियांत भगवत्प्रेम, शिरो मन न विषयघाणींत ॥ ९ ॥
हरिपादीं मुमुक्षु सजला स्वपरार्थ वर प्रभत मागाया ।
लावा या स्वचरित्रें संतचरित्रें प्रभूत्तमा ! गाया ॥ १० ॥

---

# ५ आत्मकथन.

आर्या.

श्रीरामप्रभुच्या हा प्रमुदित होवोनि भक्त पादास ।
नमितों सद्भावें कीं तारावा राघवें तुवां दास ॥ १ ॥
चंचल मन धडपडतें मायिक सौख्यार्थ हाय ! तडफडतें ।
सर्वसुखागर पाय प्रभुचे दडुनी न तेथ कां पडतें ? ॥ २ ॥
चित्ता ! भ्रमसि कशाला ? मिथ्यामोहाचिया उगा तोंडीं ।
पडसी कां ? हृदयस्थ–प्रभुरूपीं इंद्रियें सख्या ! कोंडीं ॥ ३ ॥
मायामय जग सारें चित्ता ! उमजुनि वळेंचि कां रडसी ? ।
जें आपलें नव्हे त्यासाठीं आर्तस्वरेंचि आरडसी ! ॥ ४ ॥
या विषयांची गोडी थोडी कां चाखलीस सांग मना ! ।
विटलासि आजुनी नच ? निर्लज्जा ! हरिपदीं करीं नमना॥५॥
शास्त्रें सांगति संतहि कथिती कीं आत्मरूप आचक्षीं ।
नेत्रादि इंद्रियें हीं अवघीं लावीं म्हणूनि त्या लक्ष्यीं ॥ ६ ॥
आत्माराम प्रभु हा निकट हृदयवर्तिही असूनि कसा ।
आढळला न तुला गा ! परांपुढें पसरिसी कशास पसा? ॥७॥
अंगावरि येउं न दे अहंकृतिप्रबळसर्प हा दुष्ट !
द्वैताचा वायु पहा भक्षुनि हा मातला भला पुष्ट ॥ ८ ॥
आप्तेष्टसुहृद्बंधुस्त्रीधन इत्यादिकीं न हो सक्त ।
आत्मसुखीं रम, रस घे, होसिल–आहेस तूं स्वयें मुक्त ॥९॥

थारा सर्वसुखांचा पारावार न सुखासि या लोकीं ।
वारा हरिभक्तीचा सारा या सेवुनी सुखी हो कीं ॥ १० ॥
ऐसें स्वमुखें सांगा रामा ! प्रेमें कृपा करा दासीं ।
लगटवुनि घ्या बळेंचि प्रबळ मना आपुल्याचि पादांसीं॥११॥

---

## ६ श्रीहरिस्तव.

( मुमुक्षूच्या दुसऱ्या वर्षाचें मंगलाचरण. )

श्लोक ( वृत्त—रथोद्धता. )

श्रीहरिप्रभुपदांसि वंदन । प्रेमयुक्त करि रामनंदन ।
सत्सभा हरिपदांसि वानिते । व्हावया त्रिविधतापहानितें॥१॥
जीं पदें हृदयिं नित्य चिंतुनी । हा भवार्णवहि लंघिती मुनी ।
जीं महोग्रतर दुःख वारितीं । या भवार्णवभया निवारितीं॥२॥
हा भवार्णव फिरूनि भागलों । त्वत्पदीं विफलयत्न लागलों ।
बावरे बहुत चित्त, नावरे,। नाव रे ! तवचि येथ नांव रे!॥३॥
'नाम मात्र भविं तारितें ' असें। संत बोलति, अविश्वसूं कसें ?।
संत बाप, गुरु संत माउली। याविना दुजि नसेचि साउली॥४॥
संत गायचि 'मुमुक्षु'—वासरा। याविना मज दुजा न आसरा ।
'संतसंग-मुखिं नाम-हा तुला'। या वरें हरि ! पुरीव हेतुला॥५॥

आर्या.

वळवा दयाघना ! हो अमृताची दृष्टि या मुमुक्षुकडे ।
तुकडे शिळेहि चारा, परि घ्या हो द्रवुनि बाळकासि कडे॥६॥

---

# ७ श्रीकृष्णप्रार्थना

भक्तीनें आळवितां नारायण सर्व पुरवितो आळ ।
पाळक विश्वाचा हा प्रेमनिधि प्रणतभक्तपरिपाळ ॥ १ ॥
वाग्वश्वा आरूढ प्रभु माझा मेघमंदिरीं राहे ।
रविशशिनयनांहीं हा विश्व सकळ सर्वकाळ हें पाहे ॥ २ ॥
ब्रह्माविष्णुमहेश प्रभुच्या आज्ञेंत वागती वा ! हे ।
मद्रक्षण क्षणक्षण करि शिरिं मम देवदेव हा आहे ॥ ३ ॥
झाडी सर्व अहंकृति, तोडी ओढी मनाचिया कृष्णा ! ।
विषय-मृगजळीं वाहे वा ! हें मन, आवरी स्वयं तृष्णा ॥४॥
चित्तीं विवेक जागो, ज्ञान विवेकेंचि येतसे हाता, ।
ज्ञानेंचि मोक्ष लाभे,-ऐसा क्रम संत सांगती ताता ! ॥ ५ ॥
श्रीकृष्णनाथ ! निजसख ! करुणाब्धे ! भक्तवत्सला देवा ! ।
स्वप्रेमामृतबिंदु प्राशन करवुनि अखंड घे सेवा ॥ ६ ॥
त्वच्चरणीं जन्मुनियां झाली त्रैलोक्यपावनी गंगा ।
चरणांभोरुहरेणुस्मरणाहि पावन करी सदा अंगा ॥ ७ ॥
नारायनकर्मी रावो हा देह गेह विसरुनियां ।
विस्तारीं भूतदया, भावो त्वद्रूप ही अलंदुनिया ॥ ८ ॥

# ८ हरिशरणागति

( एके रात्रीं भयभीत होतच जागा झालों तों ध्रुवपद मुखांतून निघालें. लगेच ही शरणागति लिहिली गेली. )

चालः—एडका मदन । तो केवळ पंचानन ॥ ध्रु० ॥

जीव हा भ्याला । म्हणुनि हरिशरण रिघाला ॥ ध्रु० ॥ त्ती नानाविध उद्भवती । अपुल्या संगें वोढित नेती । शांति-सुखाला उसंत नेदिति । जीव हा भ्याला । म्हणुनि हरि-शरण रिघाला ॥ १ ॥ शेळी व्याघ्रमुखीं सांपडली । कूपांत गाय काय गा पडली । वणव्यांत हरिणि तडफडलि । तेविं हा भ्याला । म्हणुनि हरिशरण रिघाला ॥ २ ॥ भार्या सुगुणवती हे सुसती । पुत्र मित्रही प्रेमळ असती । परि भव-भय कुणि वारु न सकती । जीव हा भ्याला । म्हणुनि हरि-शरण रिघाला ॥ ३ ॥ विद्याधनयशआरोग्यांहीं । श्रमलों भुललों शुद्धी नाहीं । हरिपदविस्मृति झाली पाहीं । जीव हा हा भ्याला । म्हणुनि हरिशरण रिघाला ॥ ४ ॥ प्राकृत संस्कृत ग्रंथ पसंत । धीर द्यावया सज्ज अनंत । माझ्या जिविचे कलिजे संत । तरी जिव भ्याला । म्हणुनि हरिशरण रिघाला ॥ ५ ॥ नक्रें धरितां पाय जळांत । आठविलासि गजासि पळांत । तारियला त्वां भवानलांत । समय आठवला। चित्तासि धीर बहु आला ॥ ध्रु० ॥ बाळ ध्रुव तो बहु गडब-डला । हरिसंदर्शनकामें भरला । नारदमुनिनें प्रभु भेटविला। समय आठवला । चित्तासि धीर मज आला ॥ ७ ॥ साक्षात्

जनकें तो जरि छळिला । प्रल्हाद प्रभुपदीं विनटला । त्यास्तव स्तंभीं अति कडकडला । समय आठवला । चित्तासि धीर मज आला ॥ ८ ॥ नवल वर्तलें कसें क्षणांत । उगव हरिपदचंद्र मनांत । प्रेमतरंग चढति गगनात । जीव हा धाला । लक्ष्मण निजहृदयीं निवाला ॥ ९ ॥

---

## ९ दर्शनाची आस

( माझे स्नेही कै. त्र्यंबक गुरुनाथ काळे हे अकालीं कालवश झाल्याचे पाहून आलेल्या उदासीनतेंत हें प्रकरण लिहिलें गेलें. काळे अत्यंत विद्वान्, रसिक व सज्जन होते. )

अनुष्टुप् छंद.

श्रीरामकृष्णचरणा शरणागत होउनी ।
वंदितों त्यांस हा दास आस सर्वहि सोडुनी ॥ १ ॥
संसारभयदीनातें नातें सर्वस्व तूंचि गा ।
वामना ! पाव गा यातें, गायातें लाव गा मना ॥ २ ॥
त्वत्पादकंजचि खरा आसरा वासरा मला ।
पादस्पर्शेचि तरली गौतमा या तमांतुनी ॥ ३ ॥
त्वत्पाददर्शनासाठीं भुकेला जीव हा अती ।
मती नाहीं तुला गावें भावें पायाचि चिंतितों ॥ ४ ॥
अज्ञानध्वांत हें सारी, भारी भिववितें मला ।
लागलों वा ! तुझ्या पाया वांया जन्माचि चालला ॥ ५ ॥
चालला बहुधा गेला गेला प्रापंच हातिंचा ।
देखिले पाय नाद्यापी पापी पापांत वाढलों ॥ ६ ॥
पापपुण्य तुला ठावें भावें गावें पदासि गा ।
दाखवी दाखवी पायां ! पां या वांचीव सत्वरी ॥ ७ ॥

जाळी पर्वत पापाचे तापाचे पादरेणु तें ।
ऐकिलें संतवाणीनें, वाणीनें ब्रीद रक्ष गा ॥ ८ ॥
जंजाळ वासनेचें गा तोडी काढी भवांतुनी ।
काळव्यालासि पाहूनी घाबरे बावरे मन ॥ ९ ॥
कृतांतकटकाची ही पताका चमके शिरीं ।
उरीं बाणाचि हा लागे भागे गा जीव हा बहु ॥१०॥
चाळिसी लागली डोळां गोळा पोटांत ऊठतो ।
चालले सोबती माझे जीवाचे सोयरे सखे ॥ ११ ॥
स्वमुखें सांग पां! यास सांग पायास लागलों ।
भागलों त्रासलों भारी आसलोभा निवारिजे ॥१२॥
निवारी भवतापाचें पापाचें भय मानसीं ।
शुनीसी वासना सैरां धांवते दुःख पावतें ॥ १३ ॥
स्वगुणस्तुति जीवाला आवडे, नावडे कदा ।
निंदा–कुत्सा, जरी हेची सांभाळी मायसी सदा ॥१४॥
स्तुतिकर्ता मित्र वाटे, वाटे शत्रूचि निंदक ।
भाव हा दवडी आतां वाटो निंदक वंदक ॥ १५ ॥
निंदका वंदका मानी सारिखे, पारिखे न, तो ।
आठवे नाथ धन्यात्मा साम्योपासक निर्मळ ॥ १६ ॥
दोष हे मानसींचे गा ! वारी तारी भवांतुनी ।
आंतुनी प्रार्थितों रामा ! बोल फोल नको गणूं ॥१७॥
दाखवी रूप तें डोळां दाविलें तुकयासि जें ।
चाखवी रस भक्तीचा भुक्तिचिंताचि नूरवी ॥ १८ ॥

'कोठें तो ज्ञान वैराग्यमेरू; वाचाट तूं कुठें ।'
वदान्या ! वत्सला ! ऐसें न वदा, न्याय हा नसो ॥१९॥
सुंदरा ! इंदिरा जैशी तुझां प्रिय तशीच ती ।
वांकुडी सात ठायींची, मान्य केली तुवां कुडी ॥२०॥
तुझ्या प्रेमसुखाहूनी नसो अन्या तृषा मपा ।
प्रेमळा वृत्ति गोपींची मुरली मुरलीरवें ॥ २१ ॥
तुझा प्रेमसुधाबिंदू इंदुसा हृदयीं वसे ।
तत्पाद प्रसरो देहीं होवो सर्वांग शीतळ ॥ २२ ॥
ग्रंथावलोकनाचा हा छंद मंदास लागला ।
वाटे निःसार संसार सार पाय तुझे खरे ॥ २३ ॥
वेदांत ग्रंथ वाचूनी वांचूनी लाभ काय गा ।
भवत्संदर्शनाकांक्षी क्षू लक्ष्मण प्रार्थितो पदा ॥ २४ ॥

---

## १० श्रीरामाष्टक

( श्रीमदाचार्यांची व्यतिरेकपर प्रकरणें पाहून हें अन्वयाचें स्तोत्र लिहिण्याची बुद्धि झाली. )

स्रग्विणी.

आदि हा अंत हा मध्य, आकाश हा ।
वायु हा तेज हा आप थ्वी मही ।
चार खाणी सृजी जीवजाता पहा
राम हा राम हा राम हा राम हा ॥ १ ॥

पंचतत्वीं शिरे त्याहुनी वेगळा
रामराणा स्मरा, काळ चेपी गळा ।
काळ विक्राळ ज्या कांपतो चळचळा
तो प्रतापी स्मरा राम सर्वांगळा ॥ २ ॥
रुद्र हा विष्णु हा हाचि ब्रह्मा खरा
वैखरी मध्यमा हाचि वाणी परा ।
बाल्य तारुण्य प्रौढत्वही हा जरा
दुस्तरीं या भवीं रामराणा स्मरा ॥ ३ ॥
स्थूल हा सूक्ष्म हा राव हा रंक हा
पिंडब्रह्मांडविस्तार निष्टंक हा ।
जाग्रतिस्वप्न हा हा सुषुप्ति स्वयें
हाचि तुर्या तशी उन्मनी हा अये ॥ ४ ॥
सिंह हा श्वान हा हंस हा काक हा
तोष हा रोष हा दान हा भीक हा ।
योग हा भोग हा त्याग आदान हा
धर्मकर्मादि हा ज्ञानविज्ञान हा ॥ ५ ॥
काल हा कर्म हा देश हा शेष हा
देवदत्त्यादिकांचे धरी वेष हा ।
बुद्ध्यहंकार हा प्राण हा घ्राण हा
श्रोत्रनेत्रादि सर्वान्वयी जाण हा ॥ ६ ॥
राम सीतापती ध्याइजे गाइजे
हाचि सत्सेव्य सर्वेंद्रियीं पाहिजे ।

संत योगी मुनी यासि आराधिती
ह्याचि सर्वांतरात्मा अयोध्यापती ॥ ७ ॥
याचिया चिंतनें नामसंकीर्तनें
भोगणें स्वात्मसुख सज्जनें सन्मनें ।
वाहणें राघवा पुत्रदाराधनें
भाग्यसुख हेंचि गा ! लक्ष्मणाच्या मनें ॥ ८ ॥

आर्या.

बा ! राम तोचि लक्ष्मण, भेद नसे खचित यांत गा लवही ।
गुंगे भक्तत्वीं मति, रीत जुनी सोडिती भले न कहीं ॥ ९ ॥

---

## ११ श्रीरामस्तुति.

( तुळशीदासांच्या रामायणाचें उत्तरकांड पाहत असतां त्यांतील एका स्तोत्राचें हें बहुधा त्यांच्याच शब्दांत रूपांतर झालें आहे. )

तोमरवृत्त.

जय राम रमारमणा शमना भवतापभयाकुल राखि जना ।
अवनीश रमेश सुरेश विभो शरणागत दास अनन्य प्रभो ॥ १ ॥
दशतुंड प्रचंड वितंड अही मथुनी सुखवा अखिलाहि मही ।
रजनीचरवृंद पतंग हरी ! तव सायकपावक भस्म करी ॥ २ ॥
महिमंडलमंडन वीरवरा ! हरि ! सायकचाप निषंगधरा ।
मदमोहमहाममता-रजनी-द्युतिपुंज-दिवाकर तूंचि जनीं ॥ ३ ॥
अति दुर्धर कामकिरात करी जन विव्हळ भोगशरेण हरी ।
विषयाटवीं पामर जीव भुले म्हणुनी तुज होति अनन्य भले ४

अतिवृष्टि अवृष्टि क्रमेचि दिसे बहु रोग कुभांगे शरीरिं वसे ।
चरणीं तव निश्चल भाव नसे ह्मणुनी बहु भोगिति दुःख असे ५
बहु पाप त्रिताप वियोग जनीं बहु दुःखाचि भोगिति लोक मनीं
तव पायिं निरादर, प्रेम नसे ह्मणुनी बहु भोगिति दुःख असे ६
जन पाप अधर्म अकर्मचि ते बहु आचरिती मनिं भीति नसे ।
लव सत्पदिं निर्मल भाव नसे ह्मणुनी बहु भोगिति दुःख असे ७
किति शास्त्रविधी गुरु संत मुनी पथ दाविति उत्तम आचरुनी ।
तरि वागति स्वेच्छ पिसाट जसे ह्मणुनी बहु भोगिति दुःख असे ८
भवसिंधु अगाध, बुडे नर तो, पदपंकज प्रेम न जो धरितो ।
अति दीन मलीनचि ते असुखी हरिनाम नयेचि जयासि मुखीं ९
प्रिय संत अनंत जयासि अती भवताप न त्यासि कदा वरिती ।
हरि ! संत अनत अभिन्न असा प्रगटो मनिं निश्चळ नित्य ठसा
नच कोप न लोभ न मोह मद धरितो वरितो हरिचें सुपद ।
सम मानि निरादर आदरही समचित्त फिरे सकलाहि मही ११
रसना रमवीं रघुवीरगुणीं पदपंकज चिंतुनि रम्य मनीं ।
हरिभक्त गणी नच योग दुजा हरिनामसुखें करि मोक्ष खुजा १२
मुनिमानसपंकजभृंग हरी रघुवीरसरोवर या लहरी ।
गुणशील कृपाघन वीर हरी भवरोग महामदमान हरी ॥१३॥
तव नाम निरंतर गाउं हरी तव रूप निरंतर ध्याउं हरी ।
गुणगान करुं मनिं प्रेम धरुं भवदुःखाचि हें मनिंचें विसरुं १४
तुलसीपद पाहुन पाहुन रे मनिं हर्ष भरे नच शोक उरे ।
जड पामर दुःखित जीव तरे मग दास मुमुक्षु कसा न तरे १५

# १२ अवतारप्रयोजन

धर्मदीप कलि नष्ट मालवी
पापपादप सहर्ष पालवी ।
जातिवर्ण सर्व कालवी
तो अकंटकाचि राज्य चालवी ॥ १ ॥
भ्रष्ट नष्ट जनता समस्तही
होउनी बहुत होति मरतही ।
न्यावया निरयलोकिं घातकें
स्वेच्छ संचरति पंच पातकें ॥ २ ॥
तेधवां कळवळे जगत्पती
देहही धरुं असी धरी मती ।
पुण्यवंत कुळवंत सन्मती ।
त्यांचिया उदरिं देव जन्मती ॥ ३ ॥
धर्मनष्ट खळ दुष्ट मारिती
भक्तताप हरि सर्व वारिती ।
लोकशोकभय ते निवारिती
या रिती सकल विश्व तारिती ॥ ४ ॥

श्रीरामप्रभुनें प्रपन्न जन जे ते बंधुसे पाहिले
साकेतीं अनवाप्तकाम बहुधा नाहीं कुणी राहिले ।
या लोकीं सुख त्यांसि देउनि वरी स्वर्गीं सवें वाहिले
कीर्तिस्तंभ उभारुनी स्वपितरां प्रेमाश्रुंनीं नाहिले ॥५॥

# १३ द्वैताद्वैतसंगतिस्तोत्र,

[ हुबळी व इंदोर या दोन्ही ठिकाणच्या श्रीशंकराचार्योत्सवांत 'द्वैत आणि अद्वैत मतांचा समन्वय' ह्या विषयावर अनुक्रमें इ. स. १९१२ व १९१६ सालीं माझीं व्याख्यानें झालीं वं द्वैती व अद्वैती श्रोत्यांस तीं सारखींच प्रिय झालीं. हा विषय मनांत सारखा घोळत असतां इ. १९१७ च्या आषाढांत प्रस्तुत स्तोत्र निर्माण झालें. परमात्मा निर्गुण निराकार आहे, तसाच तो सगुण साकार आहे, तत्वबुद्धीनें जीव-परमात्मा एकरूप आहेत तरी उपासनेचा आनंद कांहीं अपूर्व आहे, ज्ञान आणि भक्ति ही दोन्ही भिन्न नाहींत—ही ज्ञानोत्तर भक्ति, अद्वैतभक्ति किंवा अभेदभक्ति, ही मुक्तीवरील भक्ति-आपल्या सर्व महाराष्ट्रीय साधुसंतांना अभिप्रेत आहे. संत ज्ञानाच्या बैठकीवर स्थिर होऊन भक्तीचा सुख सोहळा भोगतात. हें अद्वैतभक्तीचें वर्म ध्यानांत आल्यावांचून सत्कवींचें हृद्गत समजणार नाहीं. असो. प्रस्तुत स्तोत्रांत मंगलाचरणानंतर अद्वैतभावानें परमात्म्याची स्तुति केली आहे (आर्या १ ते २६). तेथून द्वैताची मांडणी केली आहे. द्वैतावांचून प्रेमसुखानंद जीवांना भोगतां येत नाहीं ( २८ ते ३८ ). द्वैतांत अद्वैत व अद्वैतांत द्वैत हा देवाचा खेळ आहे हें पतिपत्नींचें अन्योन्य प्रेम व उभयांचें अपत्यावर प्रेम या दृष्टांताच्या मिषानें सांगितलें आहे ( ३८ ते ५० ). प्रेमाची महती ( ५१ ते ५६ ). कामक्रोधादि प्रेमाचींच विकृतरूपें आहेत ( ५७ ते ६० ). प्रेमाची सत्ता देवावरही चालते ( ६१ ते ६८ ). प्रेमाला द्वैत पाहिजे ( ६९ ). प्रेम व परोपकार याला वश होऊन देवही सगुणसाकार होऊन अवतार घेतात ( ७०-८१ ). देवाचें भक्त प्रेम ( ८२-९२ ). मुख्य मुख्य अवतार ( ९३-१०४ ). देव आणि भक्त ( १०५-११० ). निर्गुणापरिस सगुण सोपें व गोड ( १११-११३ ). देवाचें ध्यान व भक्तिसुख (११४-११९). उपसंहार (१२०-१२२). ]

आर्या.

**श्रीरामकृष्ण जयजय दामोदर वासुदेव गोविंद ।**
**नंदयशोदानंदन भवकंदन जय मुकुंद सुखकंद ॥ १ ॥**

कर्ता तूं धर्ता तूं संहर्ता तूंचि विश्वभर्ता तूं।
त्राता तूं दाता तूं धाता तूं सकलदुःखहर्ता तूं ॥ २ ॥
वसुदेवसुता ! देवा ! वास तुझ्या या चराचरामाजी ।
तूं वासुदेव ! गाया तुज मति सोत्कंठ जाहली माजी ॥३॥
प्रेरक वाणीचा तूं, वाणी तुज पावतांचि हो मूक ।
हें सत्याचि ! काय करूं, गाया वाचेसि लागली भूक ॥४॥
तुजपासुनीच उठती चिल्लहरी[2], तुजचि पावती परत
त्रिपुटी ग्रासुनियां तूं होसी सुखरूप तूंचि आत्मरत ॥५॥
त्वत्संकल्पावांचुनि वृक्षाचें पर्णही न तें हाले ।
सत्ता तुझीच देवा ! ब्रह्मांडीं शंर्मदा[3] ! सदा चाले ॥ ६ ॥
ती[4] क्षोभे तरि बापा ! हातींचा ग्रासही गळां नुतरे ।
होतां प्रसन्न कांहीं अप्राप्य न सकल विघ्न आशु[5] तरे ॥७॥
एक भरे एक रितें, होय रितें तेंहि आगुतें भरतें ।
गर तें अमृत, अमृत विष, त्वत्सत्तेसम न कांहिंही ठरतें ८
एक हंसे एक रडे, एका दे भाग्य आणि एक रडी[6] ।
हें किति ? ब्रह्मांडांच्या उतरी रचि ती अनंत उतरंडी ९
सत्तेनेंच समर्था ! वायु टरे छिद्रमय देहांत ।
मरतांहि उठे सदय प्रभु जरि अबला जनास दे हात १०
सत्तेनें वायु फिरे, जळ वाहे, वन्हि पचवि[7] सकळांतें ।

---

१ वसुदेवसुत ह्मणून वासुदेव व चराचरांत वास करणारा तूं देव म्हणून-ही वासुदेव. २ ज्ञानाच्या लहरी. ३ सौख्य देणाऱ्या. ४ सत्ता. ५ तात्काळ. ६ रडी आणतोस. ७ उकडतो, भाजतो, भस्म करतो.

व्यापुनि सर्वत्र वसे नभ[1], वसणें प्राप्त त्याहि अचळांतें[2] ११
अक्षोभ्यता समुद्रा दिधली, उल्लंघि तो न मर्यादा।
वाहे मृगमनुजांतें पृथ्वी, नभही खगांसि, जल यादां[3] १२
ऐसीं सत्तासूत्रें चाळविसी, तूं धणी समर्थ महा।
वेडा जीव फुगे धरि कर्तृत्वाहंकृती किमर्थ पहा ॥ १३ ॥
तुझिया ज्ञानकलेनें करिती गा ! जीवजंतु व्यापारा।
प्राणाचा प्राण सख्या ! भूतात्म्या चिन्मया निराकारा॥१४॥
त्वच्चित्सुखांशलाभें भोगिति बहु देव गा ! सुखानंद।
सत्यज्ञानानंदा ! देवा ! तूं पूर्ण सच्चिदानंद[4] ॥ १५ ॥
एकी अनेक देवा ! एक अनेकींहि तूंचि गा ! असती।
भूतें तुझ्याच ठायीं भूतामध्येंहि तूंच तूं वससी ॥ १६ ॥
भूतांहुनी निराळा साक्षी तूं असासि त्या नभाचाही।
व्यापक सकळांहि घटीं देवा! स्वयेंचि द[5] ग्वाही ॥ १७ ॥
व्यापक म्हणणें हेंही साजेना. व्याप्य वा नसे दुसरें।
दुसरें तिसरें न सरे येथ. तुझ्याविण न कांहिही कुसर[6] रे १८
ब्रह्मा तूं विष्णू तूं रुद्रहि तूं नाथ ! सूर्यचंद्रहि तूं।
इंद्राग्निवायु अवघा एकचि नटसी अनंतरूपें तूं ॥ १९ ॥
जेथें न अंधकार, ज्योतीहि न. एकमय असे अवघें।
तेथें जीवशिवादि द्वैताची कवण सांग, वा ! चव घे ॥२०॥
पीत[7] न रक्त न जें न श्वेतहि, मनबुद्धि जेथ पांगुळते।

---

१ आकाश. २ पर्वतांना वसायसचि प्रभूची आज्ञा आहे. ३ मत्स्यादि जलचर. ४ सहाव्या ओवीपासून १५ व्या पर्यंत सत्, चित् आनंद या पदांन्वयें प्रभुस्तुति केली आहे. ५ साक्ष. ६ बाकी, अणुभरही स्थळ. ७ हे तीन वर्ण तम, रज व सत्व यांचे वाचक आहेत. तूं त्रिगुणातीत आहेस हा भाव.

अणुरेणुहि भरलें जें, उरलें कोठें कसें दशांगुळ तें? ॥२१॥
जें इंद्रियां न गोचर, जाग्रत्स्वप्नादिकांहुनी पर जें ।
'अंतर्बहिश्च' सकलहि, 'अधऊर्ध्वं' सर्वही चराचर जें॥२२॥
जेथें न पापपुण्य, न जन्ममरण, विधिनिषेध जेथ सरे ।
तें देवदेव ! अवघें रूप तुझें, कवण भाप तेथ उरे ? ॥२३॥
दिक्कालावच्छेद न तुज लिंपे, ज्ञप्तिमात्र[2] तूं देवा ।
अससी अनंत अमित प्रभो ! करावी कसी तुझी सेवा ?२४
सर्वात्मका ! नसे वा तुजमजमध्यें सख्या ! तिळहि भेद ।
जीव ब्रह्मचि न दुजा—ऐसें तो ज्ञानराशि कथि वेद ॥२५॥
आह्मीं तुह्मीं तसें ना ? हेमीं नग[3], सागरीं तरंग जसे ।
सच्चित्सुखरूप तुह्मी नित्य निरंजन, आह्मी कसे न तसे?२६
अमर तुह्मी ? आह्मी ही ! सत्य तुह्मी ? मीहि ! लटिक ?
मीहि तसा ! ।
आह्मां तुह्मां न नाव न रूपहि, गुज[4]गोष्ट कथिन मी हि-
नसा ॥ २७ ॥
साखर गोड खरी परि साखर होऊनि राहण्यापरिस ।
वा ! राहुनी निराळें खाण्यांतचि मौज शाहण्या ! परिस२८
साखर तूं मुंगी मी, मुंगी तूं मीहि शर्करा हो तों ।
द्वैतीं आनंद गड्या ! रसिकवरा प्राप्त वा ! खरा होतो२९
देवा ! अभेद असतां, जाणत असतांहि आवडे भेद ।
द्वैता-वांचुनि सखया! मौज कसि घडे कसा सरे खेद?॥३०॥

---

१ दशांगुळें उरला हेंही बोलणें पूर्वपक्षांत गेलें. २ ज्ञानस्वरूप. ३ सुवर्णावर से अलंकार तसे. ४ गुह्य. येथून पुढें द्वैताची उभारणी केली आहे.

जळ न जळातें सेवी, पिउनि तृषार्तचि निवे मन अंगें ।
वृक्ष न खाय फळातें, तद्रस सेवूनि पक्षिगण रंगे ॥ ३१ ॥
माता न सेवि आपुलें दूध, पिउनि तोष पावतें तोक ।
वृक्षछाया सुखदा, येति छायेसि तप्त जरि लोक ॥ ३२ ॥
वाडे सुंदर, बगिचा सुंदर, माडच्या महाल आहेत ।
स्त्रीपुरुषपलेंकुरें नच भोगिति तरि तें अमंगल प्रेत ॥ ३३ ॥
सोनें शुद्ध नवें, परि सरी ठुसी गोठ पाटल्या घडती ।
जडती अंगा त्या जरि सुंदरिच्या तरिच सार्थकी पडती ३४
द्वैतावांचुनि कैचा प्रेमसुखानंद भोगवे जीवा ? ।
नसतां तो रसिकवर भ्रमर पुसे कोण सांग राजीवा[२] ?॥३५॥
राजा प्रजानुरंजन न करी तरि राजपण कसें तगतें ? ।
उद्धरि शिष्य, गुरुत्वहि शिष्यगुणें त्यासि लाभतें मग तें ३६
होउनि अनन्य मायें अनुसरतें वत्स तनुमनप्राणें ।
स्मरणेंहि फुटे पान्हा मायेसी ! प्रेम विमल जग जाणे !३७
पतिवांचुनि सतिचे गुण यौवन सौंदर्य काय कामाचे ? ।
सतिवांचुनि पतिलाही प्रेमें रिझवील कोण गा ! वाचे? ३८
आपुकमापुकरूपें प्रेमसमुद्रासि येतसे भरती ।
सरती संसृतिदुःखें, आनंदाची उदंड भरभर ती ! ॥३९॥
द्वैतीं अद्वैत तसें अद्वैतीं द्वैत हा तुझा खेळ ।
दोन्हीं तुझींच रूपें, तुज जाणे तोचि पाहतो मेळ ॥ ४० ॥
पतिपत्नीप्रेमांत द्वैत मुरे, एकता उरे खाशी ।
तेव्हां त्यांतचि निपजे आनंदग्रंथि बाळ सुखराशी ॥४१॥

---

१ मूल. २ कमलाला.

प्रेमालिंगन देती, सुखठेवा चुंबिती किती रमती, ।
आनंदजळें वर्षति, होती बाळ स्वयें अधीरमती ! ॥ ४२ ॥
हास्य अकारण करितां पसरे दिव्यप्रभा मुखावरि ती ।
तें ध्यानभान हरपे, पितर ब्रह्माधिका सुखा वरिती ॥४३॥
मिळवुनि मुखासि मुख ते चुंबिति,लीलेसि त्याचिया भुलती
खुलती हृदयकपाटे, भ्रमरभ्रमरी फुलावरी झुलती !॥४४॥
रिझवी 'गुलाम चिमण्या' त्यांतें तो सहजसुभग लीलांनीं ।
गानीं वानिति त्यातें, ऐकविती ऐकती सुगुण कांनीं ४५
शिशुलीला तच्चित्ता देति रसें प्रेमरज्जुचे झोले ।
खोले लोल नयन तंव उभयांचें विमल हृदय आंदोले ४६
कधि हांसेहि रडे कधि पडे उडे बोल बोबडे बोले ।
ते ऐकुनि पितरांच होती प्रेमामृतें नयन ओले ॥ ४७ ॥
तन्मुखदर्पणिं पाहति दोघे गुणरूप एकमेकांचे ।
गालीं हांसुनि पटविति खूण, मनीं सौख्य तेधवां नाचे४८
प्रेमाची ती त्रिपुटी नाचवुनि तिघांस होय एकपुटी ।
दिव्यप्रेमरसायन सेवी त्याच्या सुखा कधी न तुटी ॥४९॥
देवा ! साजुक सुख हें कौसल्येला दिलें यशोदेला ।
करधृतकंकण मंजुस्मित करुनि तयापुढे जधी ठेला ॥५०॥
प्रेमें विश्व चळे हें प्रेम तुझें रूप माधवा ! धन्य
प्रेमामृत जीवाविना तरि जीवा जाळितें भवारण्य ॥ ५१ ॥
प्रेमामृत पिउनि पहा ! आनंदें जीव डोलती सकळ ।
सर्व चराचर भरलें प्रेमें, प्रेमेंचि जन्म हा सफळ ॥ ५२ ॥
प्रेमोत्कंठित गंगा भेटाया सागरासि कसि धांवे ।

सागरहि प्रेमानें वेंचुनि वपु मेघमंडळीं पावे ॥ ५३ ॥
रविकिरणचरणनिकटीं उघडी नेत्रांसि कमलिनीकांता ।
तें देखुनि नलिनी ने हर्षें चंद्रा-प्रियासि एकांता ! ॥५४॥
धांवे रविसत्कारा पूर्वदिशा क्षाळुनी स्वमुखकमळ ।
रेखुनि कुंकुम भाळीं—अरुणोदय ज्यासि बोलती सकळ५५
पशुपक्षिकीटदानवमानवदेवादिकांसि आधार ।
एक प्रेमचि जाणा, देवा ! प्रेमचि सार संसार ॥५६॥
हे काममोहलोभक्रोधादि तरंगरंग जाणावे ।
सर्वहि विकार[1] दिव्यप्रेमाचे—हें मनांत आणावे ॥ ५७ ॥
'कोठें प्रेम कुठे हे विकार ?' ऐसे मनांत आणाल ! ।
दीपांत काजळी कसि सांगा उगवे ? जलांत शेवाल ? ५८
झांकोळे आकाशा मेघ कसा ? डोळियांसि पडळ कसे ? ।
जागृति झांकी निद्रा ? निद्रेवरि स्वप्न केविं मिरवतसे ? ५९
हेंहि असो, ब्रह्मीं ती माया कसि जाहली तुला ठावें ।
सत्यस्वरूप एक प्रेम, तदन्यचि वृथा कशा गावे ! ॥६०॥
सामर्थ्य असे प्रेमीं तसें अन्यत्र आढळेना कीं ।
नाकीं देवाच्या ये लवतां बाळापुढेहि नव नाकी ॥ ६१ ॥
शक्ति प्रेमाची गा ! अद्भुत तुजवरिहि करितसे सत्ता ।
भूषण मिरविसि लोकीं भृगुनें जी मारिली उरीं लत्ता !६२
शवरीस वरी ह्मणसी, काय तिचें ज्ञान ? कोणयोगबळ ? ।
दाव्यानें बांधियलें गोपीनें[2], काय जाहला दुबळ ? ॥६३॥
विदुरस्त्री प्रेमपिशी, केळीं खाऊनि चारिल्या साली ।

---

१ कामक्रोधादि हे प्रेमाचीं विकृत स्वरूपें आहेत. २ यशोदेनें

हविपान्नांहुनि मानुनि अधिक रसें उतरल्या घशाखालीं! ६४
ताकपिरें गवळ्यांचीं पोरें तोंडांत तोंड घालोनी ।
पाजिति शक्रसुदुर्लभ तक्र पहा ! हस्त धरुनियां दोनी ६५
प्रेमाचीं सोसवते जवरी, उपचार बाह्य नावडती ।
पोहे फिके शिळे प्रियें जसि कां रामेश्वरासि कावड ती ६६
गोडी प्रेमरसाची अमृतासीही कधी न यायाची ।
ज्ञानी उद्धव रडुनी गोपींशीं गलितगर्व या याची ॥ ६७ ॥
वा ! ज्ञान सत्य जप तप पूजन योगादि सर्व जें कांहीं ।
प्रेमाविणें फिकें तें ग्राह्य तुह्मां कधिच जाहलें नाहीं ॥६८॥
ऐसें दिव्य प्रेम प्रगटे द्वैताविना कुठे सांगा ! ।
द्वैतींच रंग मांजे, अद्वैतीं मौज ही कुठे हां गा ! ॥ ६९ ॥
देवा ! अद्वय तुह्मी असुनि प्रेमासि जागते नसता ।
साकार न होतां तरि कैसे भक्तासि लाभले असता ? ॥७०॥
भक्तोद्धार न करिता, त्यांच्या कार्यासि वाहिले नसता ।
तरि मी निर्भय पुसतों, प्रांजळ बोला, तुह्मां कवण पुसतां ?
लोकाचार दिसे तो सोडुनि मी स्पष्ट भीड, सांगेन ।
लोक न त्यासि नवाजिति परकार्यीं जो झिजेचि आंगें न ७२
कैवल्यांहुनि वाटे अधिक शतगुणें असे परोपकृती ।
परदुःखवारणीं जो सर्वस्वेसी झटेल तोचि कृती ॥ ७३ ॥
माझें सर्वहि जावो परि पर वांचो ह्मणोनि जो अर्पी ।

---

१ यज्ञांत दिलेल्या हविभागापेक्षां. २ सुदामदेवाचे पोहे तुह्मांला आवडतात ! कसें ? तर गंगेची कावड जसी रामेश्वरास आवडते तसे ! ३ स्तुति करीत नाहींत. ४ मोक्षाहून. ५ भाग्यवंत.

कायावाचामन, त्या परकार्यरतासि विश्वजन तर्पी ॥७४॥
ऐकत दुःखार्तांची हाक उडी घालितोचि कळवळुनी ।
प्रिय लोकीं तो, नच जो निश्चळ राहे उगा सकळ कळुनी
'भक्त पर नव्हे, माझा आत्मा तो, ही नव्हे परोपकृती'
ऐसें ह्मणाल देवा ! तरि करितों मान्य मी करूनि नती७६
परि ह्मणतो ' उपकृतिची स्फूर्ति प्रेमाविणें न व्हायाची ।
' परं ' जाउनि 'आप' उरे, प्रेम भरे, तरिच ही उठे साची
उपकृति वा प्रेम म्हणा मज नावाची नसे मुळी खंती ।
कीं आत्मकार्यहि म्हणा ही भगवद्गीति वानिली संतीं ७८
देवा ! तुम्हीच जाणां प्रेममया ! हें परोपकारित्व ।
ताराया स्वजनातें अवतरतां विवश विसरुनी स्वत्व[1] ॥७९॥
अव्यक्त अचिंत्य तुम्हीं अज अव्यय अकलही परात्पर ते।
शोध कराया जातां मति खुंटे वाणिही परा परते ॥८०॥
ठेवुनि अजत्व परतें, संभवतां[2] दास संकटीं पडतां ।
मनुजावतार घेउनि लीलालेशें जगासि उद्धरितां ॥ ८१ ॥
रूपीं आग्रह न धरा, भान नुरे मुळिच लोककार्यरतां[3] ।
परि देवा ! कैसी हो आवडली मत्स्यकूर्मसूकरता ?॥८२॥
लुगडीं[4] अंगें झालां, नामारूपा न पाहतां पोड ।
खचित प्रेमांधासि न विचार, लज्जा न कीर्तिची चाड !
श्रुतिशास्त्रपुराणांनीं भक्तपिसें गायिले तुझें देवा ।
ठेवा आत्मसुखाचा अर्पुनि भक्तासि करिसि तत्सेवा ८४

---

१ निजरूप. २ जन्म घेतां. ३ लोककार्य करण्यांत गुंग झाल्यावर बाह्य उपचारांकडे लक्ष जात नाहीं. ४ द्रौपदीवस्त्रहरणप्रसंगीं. ५ योग्यता.

भक्तार्थ कष्टसहनीं परपीडावारणीं रणीं-तेथ ।
वज्राहुनि कठिण तुह्मी व्हा लोण्यापरिस मृदु सख्या ! येथ
‘ सत्वर उपाय सारे करा, परी पोर वांचवा, ह्राता ।
यश घ्या ’ वैद्यां पायां लागुनि कळकळुनि हंबरे माता८६
तैसेंच तुह्मां होतें पडतां दासासि कांहिं जड[1]भारी ।
अव्यक्तही प्रगटतां अवचित समयासि भक्तकैवारी ॥८७॥
हो भक्तकार्य सत्वर सत्वरतां सज्जनां समाधान ।
धर्मार्थ झटति संतत संत तया कुजनविघ्नबाधा न ॥८८॥
हो भूतांचें पाळण, निर्दळणहि दुष्टदुर्जनांचे हो ।
यास्तव अवतरतां तुह्मि, हर्षे तव देववृंद नाचे हो ॥८९॥
भक्तां घालुनि पाठीं, झुंजां दुष्टांसि एकले वीर ।
कळिकाळ तळीं दडपां, दावां दासासि देव ! परतीर ९०
आपण खाय शिळें परि माय मुला दे दुधावरिल साय ।
तैसा स्वकाय कष्टीं टाकुनि दासासि सुखवि यदुराय॥९१॥
चरणस्पर्शे वसुधा, सती अहल्या तशीच, उद्धरतां ।
दर्शनमात्रें देवा ! जीववुनि जडत्व पापमल हरतां ॥९२॥
जैसा प्रसंग तैसे तत्तत्कार्यार्थगौरवासाठी ।
अवतार तुह्मी धरिले, प्रत्येकीं वेगळी नवी धाटी[2] ॥ ९३ ॥
निजतां ब्रह्मा चारी वेद स्रवले मुखांतुनी त्याचे ।
ते श्रुतिरक्षक देवा ! रक्षियले धरुनि रूप मत्स्याचें ॥९४॥
बुडतां समुद्रमंथनसमयीं रवि मंदराख्य गिरिवरही ।
धरिला पृष्ठीं होउनि कूर्म तुह्मी रक्षिले सुरासुरही ॥९५॥

---

१ संकट. २ प्रकार, तऱ्हा.

तारां वराहरूपें दंर्ता धरुनी धरा सुराराध्या ।
कवण्याहि उपायें गा ! रक्षितसा सकललोक जगदाद्या ९६
स्तंभीं प्रल्हादास्तव कडकडला, विश्व त्या महीं[1] गायें[2] ।
चिरला नखदंष्ट्रांहीं अत्युग्रप्रकृति [3]तो महाकाय ॥ ९७ ॥
मागा त्रिपाद्-भूमी, जागे सत्वा, वळी अनुंग्र महा ।
वामनरूपें हरिलें नश्वर वैभव, वेळी अनुग्रह हा ॥ ९८ ॥
राजे ब्रह्मद्वेष्टे अधर्मरत मत्त जाहले फार ।
तैं परशुराम होउनि करुणेनें उतरला धराभार ॥ ९९ ॥
जय अकलंका ! नाथा ! लंकानाथासि बुडवुनी लोक ।
तारियले स्वचरित्रें, रामें, नामेंचि दवडिला शोक[6] ॥१००॥
गोपीमानसहंसा ! पार्थसख्या ! कंसमर्दना ! कृष्णा ।
त्रिभुवनमंगलचरितें भक्तांची शमविली महातृष्णा ॥१०१॥
श्रीव्यासरूप घेउनि रचिला तो भारतेतिहास महा ।
जो धर्मनीतिसेतु प्रख्यात भवार्णवांत, यासम हा ॥१०२॥
अवतरुनि कपिलरूपें माता जगती तशीच उद्धरिली ।
त्वां आत्मबोध करुनी सर्व भवभ्रांतिही तिची हरिली१०३
अनसूयासतिच्या गा ! पोटीं दत्तावतार त्वां धरिला ।
केवळ तिचा न साऱ्या जगतीचा दुःखभारही हरिला१०४
अवतार फार झाले, प्रतिभक्तां भेटतां तुह्मी राया ।
होता कीर्तिंप्रुख तुह्मी अन्योन्यांचेचि-लोक ताराया १०५
भक्तांसि ख्याति नको, जगदुपकारार्थ तुह्मिच वाढवितां ।
तुमच्या यशासि गाती भक्त, किरण ते तुह्मी हरे ! सविता

---

१ तेजाला. २ गातें. ३ हिरण्यकशिपु. ४ अत्यंत सौम्य. ५ मोठा. ६ दुःखें.

उपनिषदांनीं निर्गुणरूप तुझें गायिलें ह्मणुनि कळलें ।
झालां मुनीश्वरांतें 'श्रुत'ह्मणुनिच सूज्ञ तेथ ना वळले१०७
श्रीवाल्मीकिसमर्थ श्रीतुलसीदास रामदास भले ।
रामकथा¹पीयूषीं हे रमले जणुनि कोटिजन रमले ॥१०८॥
पुंडलिकास्तव सदया ! कटिं कर ठेउनि विटेवरी नटलां ।
चट लाविली समस्तां, भव हटला, प्रेमळा जना पटलां१०९
भक्त प्रसिद्ध झाले ज्ञानेश्वरनाथनामदेवतुका ।
ह्मणुनी विठ्ठलनामारूपाचा गजर जाहला इतुका ! ११०
निर्गुणरूप कठिण तव, मनवाचाबुद्धिसी अगम्य सदा ।
शास्त्रांसि मर्म न कळे श्रुति उगली राहिली धरूनि पदा१११
निर्गुण तेंचि सगुण गा ! जैसें कां तूप विघुरलें थिजलें ।
थिजलेंचि गोड लागे रसिका,स्वादिष्ट खावयासि भलें११२
भक्तांसाठीं आला नावारूपासि जाहला सोपा ।
हो पा गोपाळ प्रिय मज अतितर जेविं गोपिकागोपा ११३
घनसांवळा रमाधव रुळते वक्षःस्थळींहि वनमाळा ।
माथां मुकुट झळाळी भाळीं तो टिळक रेखिला पिंवळा११४
कंठीं कौस्तुभ झळके कटिं तळपे दिव्य पीत पाटोळों² ।
पार्श्वीं वेल्हाळ उभी कमळा³ कमळासि लाजवी डोळा ११५
काळ कराळ कठिण परि तच्छिरिं देतोचि पाय हरि भोळा।
प्रणतजनांतें रक्षिति तच्छक्ती जेविं पापण्या डोळा⁴॥११६॥
श्रीमूर्तिदर्शनानें डोळयांचें पारणें फिटे राया ।

---

१ रामकथामृतांत. २ पीतांबर. ३ लक्ष्मी, रुक्मिणी. ४ पापण्या जशा डोळयाचें रक्षण करितात. त्याप्रमाणें देवाच्या शक्ति भक्ताचें रक्षण करितात.

होय महानंद, बुडे वृत्ति सुखीं, दूर ती पळे माया ॥११७॥
त्वद्दर्शनें अघ गळे ताप टळे त्रिविधकर्म सर्व जळे ।
किंतु पळे मार्ग कळे, देव वळे तरिच होय हें सगळें॥११८॥
तप सत्य दान सम्यग्ज्ञान इहीं मार्ग गा ! तुझा निवळे ।
परि निःसंशय न कळे जंव करुणार्द्र प्रभु स्वयें न वळे ११९
जय निर्गुण गुणसागर संतकमलवनवसंत भगवंत ।
जय शरणागतवत्सल निगमागमगीत इंदिराकांत ॥१२०॥
जय दानवजनभंजन[1] ! सज्जनरंजन ! करूनि अंगलगा[2] ।
पादास दास लक्ष्मण वंदी याचें करी सुमंगल गा॥१२१॥

शिखरिणी.

श्रीदेवी सति नीतिधर्मनिरता ख्याता अहल्या भली
भूताराधनयज्ञकर्म करुनी मोक्षासि जी लाभली ।
तीच्या इंद्रपुरींत[3] लक्ष्मण रची स्तोत्रासि सप्रेम या
होवो मान्य असो समर्पण पदीं श्रीपांडुरंगाचिया ॥१२२॥

---

१ यथार्थ ज्ञान. २ अंगलगा करणें हेंच सूमंगल करणें होय. ३ इंदूर शहरांत.

# १४ नर्मदास्तव

——:o:——

( मी सहकुटुंब महेश्वरास गेलों. ते दिवशीं नर्मदेला महापूर आला होता. मोठें स्तोत्र होणार असें वाटत होतें, पण तिसऱ्या श्लोकांतीं चित्त समाधान पावलें व स्तोत्र संपलें ! ).

वृत्तः—विबुधप्रिया.

नर्मदा बहुशर्मदा सति धर्मदान करावया
न्हावया जन पुण्यशील भवाब्धिमाजि तरावया ।
पातली जनताघविप्लव दुःखशोक हरावया
दर्शनेंचि प्रसाद पावलि धांवली मति गावया ॥ १ ॥
नर्मदे ! करिती तुझा स्तव थोर सन्मुनि सज्जन
मज्जनांसह लाभलें अजि दानपाननिमज्जन ।
राहुनी निकटीं तुझ्या तरले किती सुतपोधन
सत्समागम सद्गतिप्रद जाहला कवणासि न ?॥२॥
दिव्य उज्ज्वल रूप देखुनि बुद्धि फार सुखावली
रक्ष देवि ! दया करीं स्वसुतावरी जसि मावली ।
भक्तिभावसमुल्लसेंचि मिळावया प्रिय सागरा-
प्रति धांवसी तसि बुद्धि भेटिव माधवा स्वसुखाकरा ३

———

## १५ सप्तशृंगी

—:०:—

( नाशिक जिल्ह्यांत सप्तशृंगीच्या उंच डोंगरावर देवीचें
जागरूक स्थान आहे. तेथें देवीच्या दर्शनास
गेलों असतांना हें स्तोत्र झालें.

वृत्तः—स्रग्धरा.

श्रीदेवी सप्तशृंगाभिधगिरिशिखरीं गाढवृक्षप्रचुरीं
राहे, भक्तांसि तारी, दुरित हरि, करीं दुष्टदैत्यांस चूरी ।
दासांचें दैन्य वारी सकलहि सदया ताप गौरी निवारी
लोटी श्रद्धावताला शमसुखयुत त्या मोक्षसाम्राज्यपुरीं ॥१॥
अंबे ! तूं मोक्षदात्री इहपरसुखदा यास्तव स्पष्ट सिद्ध
मोठे योगी तपस्वी तव पदकमलीं लोळती हें प्रसिद्ध ।
अंबे ! तूं मूळमाया त्रिभुवनजननी आसरा वासरा या
ध्याती तूतेंचि माये ! विधिहरिहरही या भवा वोसराया

पापताप मम वारी गे
दैन्यदुरित हे सारी गे ।
कृपाकवळ मज चारी गे
दीन दास हा तारी गे ॥ २ ॥
कुवासनानग जाळीं गे
तोडीं ही भवजाळी गे ।
काम दैत्य मज पोळी गे
कोप झोकितो खोळी गे ॥ ४ ॥

आत्मशुद्धिसुख देई गे
पादपांसुनग लेई गे ।
कटीं लेंकरूं घेई गे
निजसद्नीं या नेई गे ॥ ५ ॥

---

## १६ मनीषानिवेदन

शिरीं ज्याचिया स्नान गंगोदकाचें
श्रुतीं ज्याचिया पान गीतामृताचें ।
मुखीं ज्याचिया नाम गोविंदजीचें
करीं त्याचिया मोक्षसाम्राज्य साचें ॥ १ ॥
पदीं चालणें मंद श्रीमंदिरासी
मनीं चिंतणें रूप लावण्यराशी ।
सदा योग सप्रेम भक्तोत्तमासी
तया आंगणीं राबती मुक्ति–दासी ॥ २ ॥
हरिप्रेम जें भोगिलें गोपगोपीं
तदंशांश नंदात्मजा ! यासि वोपीं ।
तुझ्या नामरूपीं सख्या ! म्यां रहावें
पहावें बहावें तुला भक्तिभावें ॥ ३ ॥
तुझे गूण गातां रमावें नमावें
हंसावें रिझावें पडावें रडावें ।
तुझ्यावेगळा ठाव मातें नको रे
मला मारुनी तूंचि नांदे मुरा रे ! ॥ ४ ॥

---

# १७ आनंदाचा क्षण

हरी हरी राम हरी हरी हरी
हरी हरी कृष्ण हरी हरी हरी ।
असा मुखीं ओघ अमोघ चालला
रघूत्तम प्रेमसमुद्र पावला ॥ १ ॥
यन्नाममंत्रावलिछंद लागला
अत्यंत पुण्योदयकाल पातला ।
चित्ता रमाकांतपरीस गावला
रघूत्तम प्रेमसमुद्र पावला ॥ २ ॥
चित्तीं सुखानंद अपार दाटला
गये क्षणीं या भव सर्व आटला ।
नेत्रीं सुखोर्म्युत्थित पूर लोटला
रघूत्तम प्रेमसमुद्र भेटला ॥ ३ ॥
नेत्रीं मुखीं पादकरादिकांतरीं
कर्णीं त्वचीं राहुनि चाळवी हरी ।
हा चारही देह भरोनि राहिला
रघूत्तम प्रेमसमुद्र पाहिला ॥ ४ ॥
सर्वेंद्रियीं श्रीहरि एकला वसे
असोनि सर्वत्र कुठेंहि ना दिसे ।
तरी पहा मद्हृद्यीं प्रकाशला
रघूत्तम प्रेमसमुद्र पावला ॥ ५ ॥

नक्षत्रताराग्रहमंडलीं भला
अनंतरूपीं हरि हा विराजला ।
ब्रह्मांड गोविंद भरोनि राहिला
रघूत्तम प्रेमसमुद्र पाहिला ॥ ६ ॥
जिथें तिथें एक हरी समावला
चराचरीं श्रीहरि हा दिसे मला ।
तयाविना ठाव रिता न राहिला
रघूत्तम प्रेमसमुद्र पाहिला ॥ ७ ॥
अनंतजन्मार्जित पुण्यपुंज हा
कसा अजि प्रेमफळा अला पहा ।
पहा ! कसा हर्ष अमर्ष कोंदला
हृदंतरीं येति सुखोर्मि कोमला ॥ ८ ॥
अनंत हा एकरसात्म जाहला
जिथें तिथें भासत एक चित्कला ।
‘ अहं ’ पहा ! म्यां मम हा गमावला
रघूत्तम प्रेम भरोनि राहिला ! ॥ ९ ॥
श्रीरामसौख्यांत विलीन जाहला
हा लक्ष्मण प्रेमसमुद्रिं नाहला ।
प्रेमाच विश्वांत अफाट कोंदला
हरी पहा प्रेमसमुद्र जाहला ॥ १० ॥

———

## १८ पदें

( यांतील पदें २।३।४ शके १८१७ च्या पाडव्यास व पद १ लें शके १८३७ सालीं झालें असून ५ वें पद शके १८४० सालीं झालें. त्याचा उगम. )

[ १ ]

रामा ! कामा दूर करा गा खुडा मूळवासना ।
जडो ह्या चरणपंकजीं मना ॥ ध्रु० ॥
जप तप केलें ग्रंथ पाहिले केलें तीर्थाटणा ।
अजुनि कां जडती या कामना ॥ १ ॥
नश्वर ह्मणुनी जाणत बोलत असतांही गा धना ।
त्रिटेना जीव कसा वामना ॥ २ ॥
स्तुति–निंदा या भाव प्रियाप्रिय उपजवुनी यातना ।
कशा रे देती करुणाघना ॥ ३ ॥
परवनिता मातासम व्हाव्या शुद्धचि हे भावना ।
टिकावी नित्य जगज्जीवना ॥ ४ ॥
विषयविषाला त्रिटो वसों दे वासुदेविं वासना ।
दान हें द्यावें गा ! लक्ष्मणा ॥ ५ ॥

[ २ ]

स्मर हरिनाम मना ! । रसने ! येवो दे वदना ॥ ध्रु० ॥
विषयाटविं या वणवण फिरवुनी । नेसी गे पतना ॥ र०॥१॥
परदोषांतें गाउनि शिणशी । सेविसि कां वमना ॥ र०॥ २ ॥
परनिंदास्तुति सोडी । जोडी श्रीहरिच्या चरणा ॥ र० ॥३॥

रामकृष्ण हरि यादव माधव । भज षड्रिपुदमना ॥ र० ॥४॥
लक्ष्मण यापरि बोधुनि चित्ता । आळवितो रसना ॥र०॥५॥

[ ३ ]

असो मज संतसमागम तो ॥ ध्रु० ॥
क्षणभंगुर संसारापासुनि । चित्तचि परतावितो ॥ असो०॥१॥
मळ काढुनि जो देखोदेखीं । मानसवस्त्र धुतो ॥ असो० ॥२॥
विविध पापतापांतें वारुनि । शांतिवृष्टि करितो ॥ असो०॥३॥
जीवभाव तो दडवुनि सारे । आत्मबुद्धि भरितो॥असो०॥४॥
लक्ष्मणहृदयीं राम सदोदित । संतकृपें स्फुरतो ॥ असो०॥५॥

[ ४ ]

दिन हा भाग्याचा भाग्याचा । आजि उदेला साचा ॥ ध्रु० ॥
तळमळ नुरली चित्तीं । शांत झाल्या वृत्ती ॥ दिन० ॥ १ ॥
वांझट झाली तृष्णा । गेली ममता जाणा ॥ दिन० ॥ २ ॥
अवघें मायिक कळलें । मिथ्या जग वोसरलें ॥ दिन० ॥३॥

[ ५ ]

गुरु गोविंद गोविंद । लागला तयाचा छंद ॥ ध्रु० ॥
गोविंदावांचुनि कांहीं । मज बाई करमत नाहीं ।
त्या सांगुनि कांहीं बाही । आणा हो आणा कोणी ॥१॥
साजिरें रूप लावण्य । गोजिरें हास्य तें धन्य ।
मधुरेक्षण माझे प्राण । हारितें मी करु गत काई ? ॥ २ ॥
लागला तयाचा ध्यास । त्याविना घेईना श्वास ।
पाहीन मूर्ति ही आस । वांचाया कारण होई ॥ ३ ॥

जागृति वा स्वप्न सुषुप्ती । नेत्रांसि होइना तृप्ती ।
रचुनियां कांहिंही क्लृप्ती । भेटवा माझा प्राण ॥ ४ ॥
तत्संगसंगिं आनंद । आणा हो तो सुखकंद ।
त्यावांचुनि दुसरा फंद । राधेसि ठाउका नाहीं ॥ ५ ॥
धन्य कृष्ण धन्य ती मुरली । नादांत राधिका मुरली ।
पळ वियोग होतां झुरली । कृष्ण होय अंतर्बाह्य ॥ ६ ॥
धन्य कृष्ण राधा धन्य । वृंदावनरजही धन्य ।
गोविंदकथेविण अन्य । लक्ष्मणासि प्रियतर नाहीं ॥ ७ ॥

२ महाराष्ट्र संत, आणि सद्‌ग्रंथ.

## १९ माझा महाराष्ट्र

———:•:———

अभंग.

महाराष्ट्र माझा अत्यंत पवित्र ।
हरिकृपापात्र पुण्यभूमी ॥ १ ॥
कृष्णागोदाभीमातटिनींचा प्रांत ।
येथ पावे श्रांत विश्रांतीतें ॥ २ ॥
साधुसंत कवी येथें थोरथोर ।
होती सच्चरित्र विश्वोद्धर्ते ॥ ३ ॥
वेदशास्त्रधर्मपुराणांची चर्चा ।
देवतांची अर्चा जेथें तेथें ॥ ४ ॥
विठ्ठला राघवा दत्ताशिवाशिवा ।
नानारूपें देवा पूजिताती ॥ ५ ॥
साधुसंतांपरी शूरवीर धीर ।
पुरुषांचें माहेर महाराष्ट्र ॥ ६ ॥
प्रपंच परमार्थ दोन्ही यथासांग ।
संपादिती व्यंग न ठेवितां ॥ ७ ॥
महाराष्ट्र प्रयागीं मिळती अतिप्रीती ।
प्रवृत्ति निवृत्ति एकरूपें ॥ ८ ॥
महाराष्ट्र राजा राष्ट्रांसी सकळां ।
कांपती चळचळां सानथोर ॥९॥

महाराष्ट्रीयांतें मराठे ह्मणती ।
मरेतों न हटती मरहट्ट ॥ १० ॥
सह्याचलोदरीं नृसिंह उपजती ।
प्रतापें कांपविती मेदिनी हे ॥ ११ ॥
घर्डिती चिर्डिती रडविती बळें ।
महारिपुदळें लोळवीती ॥ १२ ॥
निष्णात अत्यंत शस्त्रप्रहरणीं ।
जयांची करणी अघटित ॥ १३ ॥
मर्द मानी धीट वीरश्रीचे भोक्ते ।
वक्ते आणि कर्ते शूरमर्द ॥१४॥
धर्मसंरक्षणीं राज्यसंपादनीं ।
आपदुद्धरणीं शूरमर्द ॥ १५ ॥
संतशिरोमणी वीरचूडामणी ।
मंत्रिलोकाग्रणी विश्वख्यात ॥१६॥
शस्त्रीं आणि शास्त्रीं धर्मीं आणि कर्मी ।
निपुण सद्धर्मी शोधकर्ते ॥ १७ ॥
स्वधर्मस्वदेशस्वभाषादिकांतें ।
प्रिय प्राणांपरते मानिनाती ॥ १८ ॥
सिद्धमुनीसंतमहंतांची माय ।
ऐसें विश्व गाय भारतातें ॥ १९ ॥
भारताच्या वक्षस्थळीचा कौस्तुभ ।
सर्वराष्ट्रककुभ महाराष्ट्र ॥ २० ॥

एवं महाराष्ट्र आत्मा भारताचा।
झेंडा नाचे त्याचा त्रैलोक्यांत ॥२१॥

## २० महाराष्ट्रमहोदय.

( श्रीशिवाजी महाराजांच्या काळीं महाराष्ट्रांत संत, कवि, वीर व मुत्सद्दी निर्माण होऊन महाराष्ट्राचा महोदय सर्वांगांनीं झाला तो प्रस्तुत स्तोत्रांत गाइला आहे. श्रीदासनवमीच्या निमित्तानें हें राष्ट्रीयस्तोत्र स्फुरलें. )

महाराष्ट्र माझा असे हा पवित्र
हरिप्रीतिला सर्वथा पूर्णपात्र ।
असा पुण्यभूभाग अन्यत्र नाहीं
मला नावडे यापुढें स्वर्ग कांहीं ॥ १ ॥
इथें चंद्रभागातटीं देव राहे
इथें पुण्यगोदावरीनीर वाहे ।
त्रिलोकीं पहा ! ज्ञानदेवीसमान
नसे ग्रंथ सर्वांगसंपूर्ण जाण ॥ २ ॥
महाराष्ट्र माझा त्रिलोकीं प्रसिद्ध
इथें नांदती सत्कवी संत सिद्ध ।
इथें शत्रुनिदाळणीं शूर वीर ।
इथें नांदती मानवांमाजि हीर ॥ ३ ॥
इथें कार्यकर्ते इथें विश्वधर्ते
इथें शोकहर्ते इथें लोकभर्ते ।

इहामुत्र सर्वां भवीं कर्णधार
इथें नांदले, नांदती, नांदणार ! ॥ ४ ॥
इथें गाजला मर्द राजा शिवाजी
तुकाराम भक्ताग्रणी वीर गाजी ।
इथें रामदास प्रभू तो समर्थ
अशा ना मिळे कोणता हो पुमर्थ ? ॥५॥

× × × ×

जनीं गाजतां या कलीचा प्रताप
बहू भोगिती संत गो विप्र ताप ।
मनीं पापभीती सुरीती सुटोनी
सदाचार सन्मार्ग जातो खुटोनी ॥६॥
नसे स्नानसंध्या नसे नामनिष्ठा
न वैराग्य न ज्ञाननिष्ठा वलिष्ठा ।
नसे भूतमात्रीं दयाधर्म कांहीं
मनें भ्रष्टती दुष्ट दुर्वासनांहीं ॥ ७ ॥
स्वधर्म स्वयें सांडिती वर्णजाती
तदा पुण्यसौख्यें लया सर्व जाती
पहा ! पातकें दैन्य द्रारिद्र्य तेथें
उभीं ठाकतीं सोडिती धर्म जेथें ॥ ८ ॥
असा काळ येतां स्वयें विश्वनाथ
जनीं जन्म घेतो सवें येति संत ।
अधर्मासि मोडूनि धर्मासि दावी
मुखें काय म्यां गोष्ट ती हो ! वदावी ॥९॥

जगीं धर्म नांदे सुखें विश्व कोंदे
सुखें चालती सर्व व्यापारधंदे
घडी बैसते नीट वर्णाश्रमांची
यथापूर्व चाली रुळे सज्जनांची ॥१०॥

× × × ×

रितें तें भरे जें भरे तें रिचे कीं
असा खेळ खेळे विधी मृत्युलोकीं ।
कधीं खोल जाये भरेही यशानें
चढे ऊतरे चक्रनेमिक्रमानें ॥ ११ ॥
पहा ! न्याय हा थोर सर्वांहि ठायीं
कुटुंबांस राष्ट्रांसही हाच पाहीं ।
मना ! जाणुनी हें रघूत्तंसपायीं
बुडी देउनी स्वस्थ तेथेंचि राहीं ॥१२॥

× × × ×

असो आज गाईन या सुप्रसंगीं
कथा प्रेमळा सोज्ज्वळा अंतरंगीं ।
महाराष्ट्र सद्भाग्यसंपन्न झाला
स्मरूं आदरें पूर्वजांच्या यशाला ॥१३॥

× × × ×

पराधीनता सर्व राष्ट्रास आली
तिच्या कारणें लोकसत्ता बुडाली ।
अती जाहली हीनदीन प्रजा ही
न वाली कुणी राहिला तीस पाहीं ॥१४॥

इहामुत्र सर्वां भवीं कर्णधार
इथें नांदले, नांदती, नांदणार ! ॥ ४ ॥
इथें गाजला मर्द राजा शिवाजी
तुकाराम भक्ताग्रणी वीर गाजी ।
इथें रामदास प्रभू तो समर्थ
अशा ना मिळे कोणता हो पुमर्थ ? ॥५॥

× × × ×

जनीं गाजतां या कलीचा प्रताप
बहू भोगिती संत गो विप्र ताप
मनीं पापभीती सुरीती सुटोनी
सदाचार सन्मार्ग जातो खुटोनी ।६॥
नसे स्नानसंध्या नसे नामनिष्ठा
न वैराग्य न ज्ञाननिष्ठा बलिष्ठा ।
नसे भूतमात्रीं दयाधर्म कांहीं
मनें भ्रष्टती दुष्ट दुर्वासनांहीं ॥ ७ ॥
स्वधर्म स्वयें सांडिती वर्णजाती
तदा पुण्यसौख्यें लया सर्व जाती
पहा ! पातकें दैन्य दारिद्र्य तेथें
उभीं ठाकतीं सोडिती धर्म जेथें ॥ ८ ॥
असा काळ येतां स्वयें विश्वनाथ
जनीं जन्म घेतो सवें येति संत ।
अधर्मासि मोडूनि धर्मासि दावी
मुखें काय म्यां गोष्ट ती हो ! वदवी ॥९॥

जगीं धर्म नांदे सुखें विश्व कोंदे
सुखें चालती सर्व व्यापारधंदे
घडी बैसते नीट वर्णाश्रमांची
यथापूर्व चाली रुळे सज्जनांची ॥१०॥

× × × ×

रितें तें भरे जें भरे तें रिचे कीं
असा खेळ खेळे विधी मृत्युलोकीं ।
कधीं खोल जाये भरेही यशानें
चढे ऊतरे चक्रनेमिक्रमानें ॥ ११ ॥
पहा ! न्याय हा थोर सर्वांहि ठायीं
कुटुंबांस राष्ट्रांसही हाच पाहीं ।
मना ! जाणुनी हें रघूत्तंसपायीं
बुडी देउनी स्वस्थ तेथेंचि राहीं ॥१२॥

× × × ×

असो आज गाईन या सुप्रसंगीं
कथा प्रेमळा सोज्ज्वळा अंतरंगीं ।
महाराष्ट्र सद्भाग्यसंपन्न झाला
स्मरूं आदरें पूर्वजांच्या यशाला ॥१३॥

× × × ×

पराधीनता सर्व राष्ट्रास आली
तिच्या कारणें लोकसत्ता बुडाली ।
अती जाहली हीनदीन प्रजा ही
न वाली कुणी राहिला तीस पाहीं ॥१४॥

निशा दाटली घोर अंधार झाला
विवेक स्वधर्मासवें पार गेला ।
अशा त्या महाघोर आपत्तिकाळीं
हरिस्फूर्ति उत्पन्न झाली निराळीं[1] ॥१५॥
हरिप्रेरणेनें हरीचे निरोपी
जनां वाट दावावया शुद्ध सोपी ।
स्वधर्मीं स्वकर्मीं तया जागवाया
सती संत झेपावले याचि ठाया ॥१६॥
हरिप्रेमगोडी जना चाखवाया
स्वधर्मक्रिया सज्जना दाखवाया ।
जना बोधवाया धरा उद्धराया
कवी संत झेपावले याचि ठाया ॥१८॥
स्वदेशस्वधर्मस्वभाषादिकांसी
जिहीं दुर्जनीं मांडिलें वैर त्यांसीं ।
स्वबाहुप्रतापें रणीं लोळवाया
महावीर झेपावले याचि ठाया ॥१८॥
स्वराष्ट्रोदया आड जें विघ्न आलें
रिपूंनीं रणीं वा गृहीं डाव केले ।
स्वबुद्धिप्रतापें तथा तोड द्याया
सुमंत्र्याग्रणी पातले याचि ठाया ॥१९॥
अहा ! धन्य तो काळ गावें तयासी
स्मरूं आदरें संतवीरोत्तमांसी ।

---

१ आकाशतत्वांत.

कृती दिव्य त्यांची स्मरूं प्रेमभावें
गुणध्यान होतां स्वयें उद्धरावे ॥२०॥

× × × ×

जनीं रूढली दत्तभक्ति प्रसिद्ध
पहा गाणगापूरवाडींत सिद्ध ।
तसे मोरयारंगनाथादि संत
वहू गाजले जागजागीं महंत ॥ २१ ॥
महाभक्त नाथ प्रतिष्ठानवासी
उदेले जगीं ज्ञानविज्ञानराशी ।
घरीं चाकरी त्या करी कृष्णनाथ
तयें फार विस्तारिला भक्तिपंथ ॥२२॥
तुकाराम सद्भक्त सर्वांसि ठावा
विरागी क्षमावंत सप्रेम गावा
दयाशील दामाजि निंबाजिबावा
असा प्रेमळीं भक्तवृंद स्मरावा ॥२३॥
कथा भारती गोड मुक्तेश्वरानें
तशा कृष्णलीलाहि त्या वामनानें ।
बहूंनीं बहु ग्रंथ निर्माण केले
जनोद्धारकार्यास ते सिद्ध झाले ॥२४॥

× × × ×

कुळस्वामिनी भोंसल्यांची भवानी
जना पावली धांवली ती निदानीं ।
शहाजी न सामान्य योद्धा, न काचा

गुलामींत हा जन्म गेला तयाचा ॥२५॥
शहाजीस भार्या मिळाली जिजाई
तिच्या पूर्वपुण्यासि यत्ता न कांहीं ।
सती निश्चयी धूर्त मानी सुशीला
तिच्या जन्मले श्रीशिवाजी कुशीला ॥२६॥
तया थोर दादाजिही कारभारी
भला जाहला पूर्णता साहकारी ।
दिलें शिक्षण क्षात्रधर्मानुसारी
पुराणीं शिवाच्या मनीं प्रीति भारी ॥२७॥
कथा रामजींची कथा कृष्णजीची
कथा शक्तिभक्तिप्रदा मारुतीची ।
कथा लक्ष्मणावीरबीभीषणाची
कथा स्फूर्तिदा भीष्मकर्णार्जुनांची ॥२८॥
कथा ऐकतां पूर्ण तल्लीन झाला
शिवानें मनीं निश्चयो थोर केला ।
स्वकर्तव्यनिष्ठाहि चित्तीं उदेली
महाराष्ट्रभूकामना तृप्त झाला ॥ २९ ॥
शिवाची विभूतीच राजा शिवाजी
महाभाग त्या जाहलें विश्व राजी
भले भावडे गावळे मावळे ते
जय वेधलें लाविलें क्षात्रपंथें ॥३०॥
वळी मावळे वीर तानाजि बाजी
यसाजी प्रभूवीर मुरारि बाजी ।

फिरंगोजि नेताजी आनाजि गाजी
शिवाजीहि सप्रेम ज्यांतें नवाजी ॥३१॥

रणीं पिंगळे पेशवे वीर गाढा
जयें लोटिले शत्रु काळाग्निदाढा ।
पिता-पुत्र नीराजि-प्रल्हाद गाजी
निळो-रामचंद्रांसि सारेहि राजी ॥३२॥

रघूनाथ हणमंत विख्यात वीर
महाधोरणी कारभारी सुधीर ।
जये अर्पिली राष्ट्रकार्यांत सारी
स्वबुद्धी, शिवाजीस जो मान्य भारी ॥३३॥

तयामुख्य मंत्रीहि बाळाजि औजी
बहिर्जीहि वार्ताहरांमाजि मौजी ।
शिवें गुंफिली थोर हे रत्नमाळा
बहू होय आनंद त्या लोकपाळा ॥३४॥

गुणश्रेष्ठ सत्पात्र हे प्रेमसूत्रें
शिवें बांधिले जोडिले पुण्यगात्रें ।
हिरे कोंदणामाजि हे बैसवूनी
शिवें रुष्ट संतुष्ट केली भवानी ॥३५॥

बहू रत्नशाळा बहू पांचशाळा
बहू मौक्तिकांच्याहि शाळा विशाळा ।
बहु जोडिती भूप—ऐसीं न रत्नें
तिथें—जोडिलीं जीं शिवें थोर यत्नें ॥३६॥

महावीर तानाजि त्याचा दरारा
अरी संगरीं कांपती त्या थरारा ।
वडा रावणीवीर तो चंडदेही
उदेभान ज्याला रणीं भान नाहीं ॥३७॥

रणीं झुंजतां मल्लयुद्धासि आला
तयांचा तिथें घोर संग्राम झाला ।
गडा देउनि सिंह कामासि आला
ह्मणोनि शिवा शोकसंतप्त झाला ॥३८॥

पहा अफ़्ज़ुला त्या फज़ूलास त्यानें
स्वहस्तें रणीं मारिले नीकरानें ।
वधाया धरी शत्रु कापट्यभाव
शठा ठोकितां नाहिं दोषासि ठाव ॥३९॥

असंभाव्य सामर्थ्य याचें कळेना
शिवाजी कुणा शत्रुला आकळेना ।
किती मोडिले झोडिले चूर्ण केले
गळाले पळाले पुढारी न ठेले ॥४०॥

समस्तांस मस्तांस हा काळ वाटे
मराठ्यांसवें झुंजतां धाक सूटे ।
न काळाहि आटोपिती वा मराठे
रणीं शूर झुंजार हे वीर लाठे ॥४१॥

जुमानी न विघ्ना हटें थोरल्याही
शिवें घातली पालथी पातशाही ।

ग्रं. क्र. ९८३०

यशस्वी मनस्वी प्रभावंत झाला
महाराष्ट्रभाग्योदयो सूर्य आला ॥४२॥

× × × ×

तया जेथवां होय राज्याभिषेक
निवाले सुखें हर्षले सर्व लोक
चिरंजीव झाला खरा कर्मयोगी
जनांच्या मनीं नित्य साम्राज्य भोगी ॥४३॥
प्रजा स्वप्रजाशा तयें लोकपाळें
पहा पाळिल्या त्या कृपाळें नपाळें ।
समस्तांसि सन्मानुनी प्रेमभावें
शिवें लोक आकर्षिले सुस्वभावें ॥४४॥
स्वधर्मी विधर्मी स्वजाती विजाती
न हा भेद कांहीं शिवाच्या सुचित्ती ।
किती म्लेंछही पातले आश्रयार्थी
किती गोतही घातले त अनर्थी ॥४५॥
झिजे लोककाजीं शिवा त्यास राजी
गुणोत्कर्ष देखोनि त्यातें नवाजी ।
करी राष्ट्रहानी विरोधें न मानी
असो पुत्रही शत्रु मानी निदानीं ॥४६॥
शिवाच्या तळ्यामाजि हो वाघ गाय
जळ प्राशिती वानुं औदार्य काय ? ।
तया लोभ तो सद्गुणांचाचि फार
मनीं द्वेषही दुर्गुणांचा अपार ॥४७॥

तया गाय पूज्या जशी माय साची
तशी ब्राह्मणीं थोर निष्ठा शिवाची
सतीसंतअभ्यागतीं प्रेम भारी
भला धर्मनिष्ठ प्रभू सद्विचारी ॥४८॥
परस्त्री जया नित्य मातेसमान
भवानीसमा ज्यासि माताहि जाण।
तया मातृभक्ता न आघात पंथीं
सदाचार कीर्तीहि फांके दिगंतीं ॥४९॥
शिवाजीस भार्या नऊ पुत्र दोन
गृहासक्ति नाहीं गृही तो असोन
कधीं द्रव्यदारेंत गुंफे न कोठें
कसें धर्मधर्मी श्रेष्ठ वैराग्य मोठे ॥५०॥
भवानी जिजाई गुरु रामदास
तयांच्या नमी नित्य भावें पदांस।
त्रिमूर्तिप्रसादें यशा पावला हो
स्मरूं त्या शिवाच्या सदा पावलां हो ॥५१॥
असा धर्मशाली महात्मा उदार
सदाचारस्वाचारसंपन्न थोर।
शिवासारखा भूप झाला न कोठें
स्वदेशी विदेशी पहा ग्रंथ मोठे ॥५२॥

× × × ×

स्वसौख्याभिलाषी न राजा शिवाजी
झिजे चंदनासारिखा लोककाजीं।

कलीमाजिं राजर्षि ऐसा न झाला
दिलें राज्यही सद्गुरु माउलीला ॥ ५३ ॥

गुरूही पहा पूर्णभाग्योदयानें
भले लाभले त्या भवानीदयेनें ।
तृष्णासारिखें ज्यासि त्रैलोक्यवित्त
विराला स्वरूपींच ठेवूनि चित्त ॥५४॥

"स्वकष्टार्जित प्राज्य राज्यास भोगी
अकर्तात्मभावें अहंतेसि त्यागी ।
प्रजापालनीं दक्ष राहोनि सेवी"
असें सांगुनी मस्तकीं हस्त ठेवी ॥५५॥

वसिष्ठें जसें बोधिलें रामचंद्रा
शिवाजीस तैसें तुह्मीही मुनींद्रा ।
स्वधर्मासि संरक्षिलें लोकनाथा
नमस्कार साष्टांग भावें समर्था ॥५६॥

परब्रह्म जें रामरूपासि आलें
तिथें आपुलें चित्त तें अर्पियेलें ।
सखा ब्रह्मचारी हनूमंत केला
नमस्कार साष्टांग स्वामी तुह्मांला ॥५७॥

परब्रह्म तें जाणुनी जाणवीलें
महावाक्य संशोधुनी शोधवीलें ।
स्वधर्मासि रक्षूनि संरक्षवीला
नमस्कार साष्टांग स्वामी तुह्मांला ॥५८॥

समस्तांसि द्याया सुखानें सुबोध
सुधानाम साजेलसा दासबोध ।
प्रपंची विरागी रमे जेथ ऐसा
महद्ग्रंथ निर्मीयला रामदासा ।। ५९ ।।
नमो ब्रह्मतेजा नमो क्षात्रतेजा
नमो रामदासा शिवाजी सुतेजा ।
नमो सद्‌गुरो गा नमो शिष्यवर्या
सदा धांव गा पाव गा राष्ट्रकार्या ।।६०।।

# २१ गीता–ज्ञानेश्वरी.

## पद.

चाल–सूरावृत्ताची.

रामा हरे कृष्णा हरे ज्ञानेश्वरा देवा हरे ।
त्वन्नाममात्रें संसृतीचा ताप हा सारा हरे ॥ ध्रु० ॥
श्रीपांडुरंगध्यान हें माझ्या सदा चित्तीं भरे ।
तेणें भवाची तापदा ती आपदा सारी सरे ॥ रामा० ॥ १ ॥
श्रीविठ्ठलाची भक्ति लोकां ज्ञानदेवें लाविली ।
तारावया साऱ्या जना ज्ञानेश्वरी हातीं दिली ॥ रामा० ॥ २ ॥
श्रीकृष्णदेवा ! तूंचि गा ज्ञानेश झालासि स्वयें ।
गीतेपरी ज्ञानेश्वरी तारी जना जना स्वप्रत्ययें ॥ रामा० ॥ ३ ॥
गीता महाराज्ञी भली श्रीआत्मराजाची सती ।
संन्यासियां संसारिकां–नारीनरां दे सद्गती ॥ रामा० ॥ ४ ॥
गीता महाराज्ञी खरी गीर्वाणवाणी भर्जरी ।
वस्त्रें धरी अंगावरी शोभे त्रिलोकीसुंदरी ॥ रामा० ॥ ५ ॥
या दिव्यरूपा पाहुनी त्रैलोक्य डोले आजुनी ।
ही कर्मबीजा भाजुनी तारी भवाब्धी पासुनी ॥ रामा० ॥ ६ ॥
औदार्य गीते । काय वानूं ? देसि ज्याचे त्यापरी ।
कर्म कोणा ज्ञान कोणा भक्तियोगाची परी ॥ रामा० ॥ ७ ॥

ज्या रीध नाहीं संस्कृतीं त्या अज्ञ लोकीं प्राकृतीं ।
दातृत्वकीर्ती ऐकिली, लोभावले गीतामृतीं ॥ रामा० ॥ ८ ॥
प्रेम त्यांचें जाणुनी माये ! स्वयें पान्हावसी ।
शुभ्र साधें वस्त्र देशी लेउनी त्या पावसी ॥ रामा० ॥ ९ ॥
ज्ञानेश्वरांच्या बुद्धिमध्यें वेष हा घेसी नवा ।
उल्हासमूर्तीला भुले या प्रेमळांचा हा थवा ॥ १० ॥
ज्ञानेश्वरी ! संसारतप्ता तूं सुखाची साउली ।
आबाळवृद्धां पाजिसी ज्ञानामृतासी माउली ॥ ११ ॥
श्रीकृष्णचित्तीं जो खरा गूढार्थ तो त्वां दाविला ।
अद्वैतमार्गें भक्तिपंथा लोक सारा लाविला ॥ १२ ॥
भाषा महाराष्ट्री सती भाग्योदयें हे साजली ।
तुझ्या गुणें सत्कीर्ति झाली हे त्रिलोकीं गाजली ॥ १३ ॥

# २२ कविवर्य मोरोपंत.

बहु धन्य भाग्य ह्मणुनि श्रीपंढरि ! पातलों तुझ्या ठाया ।
गाया सुयश विठोचें झिजविती सद्भक्त नित्य हे काया ॥ १ ॥
बहु चित्त हर्षतें श्रीविठ्ठलपदवासपरमलाभानें ।
त्यजिलें मयूरकाव्यामृतपानीं आजवर मला भानें ॥ २ ॥
वाङ्माधुर्य कवीचें रसिका थयथय सदैव नाचवितें ।
काव्यामृतरसरंगीं रंगुनि तो अन्य मानिना चवितें ॥ ४ ॥
पंत मयूरकवीची कविता रसिकांसि देतसे गोडी ।
अरसिकशिरोमणी वा दुर्भागी येथ काढिती खोडी ॥ ५ ॥
प्राकृतगद्याचार्या गुरुवर्या विष्णुशास्त्रि बोवाला ।
चटका न लाविला कां ? रचिली ज्याणें सुरम्य ती माला ६
यमकानुप्रासांचे शब्दचमत्कार फार दाखविले ।
भक्तिप्रमुख विविधरस रसिकांकरवी अपार चाखविले ॥ ७ ॥
नमन असो हें मयुरा काव्यनदीना सुदीन दासाचें ।
वर्षत्रय काव्यामृतपानें मन्मन सुखावलें साचें ॥ ८ ॥
सच्छील, गुणग्राही, निर्मत्सर, विनयशील, पंडित हा ।
मजासि ह्मणे ' येथ रहा, काव्य पहा, रामरूपिं चित्त वहा ' ९
आजन्म ठेविला वा ! अन्यसुदुष्कर असाचि व्यासंग ।
लाभो रसिकप्रेमी आर्यापतिचा मला भला संग ॥ १० ॥
माझीं सहस्रनमनें भागवतोत्तंस कवि मयूराला ।
यद्वागमृतरुचिपुढें न रुचे सद्गानही मयूराला ॥ ११ ॥

यत्कृत 'भारत'रत म्यां होवोनि सहर्ष मास चवदा ते ।
मासासम घालविले न गणुनि तदितर पदार्थ चव–दाते ॥१२॥
' सन्मणिमाला ' पाहुनि हरिकेर्टी हर्ष पावलों थोर ।
मणिदीप्तिनें पळालें माझें अज्ञानतम महाघोर ॥ १३ ॥
' आर्याकेका ' ऐकुनि सद्ग्रदितस्वांत फार मी झालों ।
प्रेमाश्रुसुप्रवाहीं, होउनि तल्लीन, सर्वथा न्हालों ॥ १४ ॥
' सत्संग, ' 'साधुरीति', 'प्रश्नोत्तरमालिका' अतीव मन ।
पाहुनि धालें, फुगलें, सत्संगेतर गणी अती वमन ॥ १५ ॥
'पंढरिमाहात्म्या'सह वर्णियला 'पांडुरंगदंडक' तो ।
'सद्भक्तकथा' डंबर पाहुनि कलिकाळ कां न तो डगतो ? १६
'गंगास्तव' 'कृष्णास्तव' ऐकुनि कोण न शुभेच्छु डोलेल ? ।
मन्मन कविनें कथिलें–मनकवडा हा, असें न बोलेल ? ॥१७॥
सज्जनमनोरथांची ' अवलोकुनि बहुत काळ ती ' राजी ' ।
तृप्त नव्हे मन, मज तुह्मि वदा अधाशी, तयास मी राजी ! १८
पिंजारुनी पिसारा 'केकां'चा फोडिलाचि जो टाहो ।
गोटा हो परि परिसुनि खळखळ रडतो, रडे न खोटा हो १९
वाङ्मन पूत कराया लिहिलीं जीं देवभक्तसच्चरितें ।
कोणा न भाविका तीं तारक होतील सत्सुधाभरितें ? ॥२०॥
'श्रीमद्भागवता'च्या अमृताधिकरुचिर दिव्य पुण्यकथा ।
सप्रेम गायिल्या त्या पाहुनि जन लागतील मोक्षपथा ॥२१॥
जेणें विविधछंदीं रचिलीं रामायणें शताधिक तीं ।
त्या कविमुगुटमणिपुढें कवणाची काव्यसंपदा टिकती ? २२

ज्याच्या कवनें उत्पथगामी तो रामजोशि शाहीर ।
सन्मार्गी लावियला वानावा तो कसा न कविहीर ॥ २३ ॥
ज्याच्या कवनें प्राकृत भाषावैभव अपार वाढविलें ।
त्या कविपतिचे गुणगण कोणी नाहींच आजवरि मविले २४
सच्चरितामृतपानें पापक्षय चित्तशुद्धिही होते ।
हरिपदलीना लीना मति ह्मणुनिच येथ लाविली हो ते ॥२५॥
बहुयत्नें मेळवितों अवगणुनिहि चरितसाधना काय ।
सत्पुत्र वृद्ध पितया बहु मानी परि तसा धना काय ? ॥२६॥
श्रीरामा ! जय रामा ! वंदुनि हा पसरितो पसा दास ।
आरोग्य, यश, सुसंपत् द्या, पात्रचि हा करा प्रसादास ॥२७॥
अंगीकृत कार्यी यश देउनि कृतकार्य मज करावेंची ।
सत्कार्यी तनमनधन अनलस होउनि भला सदा वेंची ॥२८॥
सत्संकल्प सकलही विकलतनु न तोंचि सिद्धिला जावे ।
रामा ! वर दे ऐसा, त्वत्सुयशा कल्पनगहि लाजावे ॥ २९ ॥
पांडवसख ! सद्भाविक सौख्यागार ! प्रभो ! प्रसादकर ! ।
भृगुपद लक्ष्म ! ऋणत्रय फेडाया रामचंद्र ! दे सुवर ॥ ३० ॥

पृथ्वीवृत्त.

महाकवि मयूर मूर्त हरिधामसोपान हो
असा कलियुगीं रमाधवदयौध सोपा न हो ।
प्रपंच परमार्थ साधुनि कथासुधापान हो
करी करवि त्या कधी पितृवनाग्नि तापा न हो ॥३१॥

# २३ मनाचे श्लोक.

( इंदूरच्या महाराणी श्री• सौ• इंदिराबाई यांस चार महिने मनाचे श्लोक समजावून सांगितले. समाप्तीचे दिवशीं सुप्रभातीं हे श्लोक स्फुरले. )

भुजंगप्रयात.

समर्थांचिया पूर्ण कारुण्य पोटीं
मुखीं वाहिली बोधगंगा चखोटी ।
जना उद्धराया मना बोध केला
भवभ्रांति–अंधार तो दूर नेला ॥ १ ॥
सुधेचे मुखीं दोनशे पांच ग्रास
कसे माउलीनें दिले चार मास ।
अवस्था मनीं लाविली सर्वसंगीं
रघूत्तंस खेळे सदा अंतरंगीं ॥ २ ॥
मनाचीं शतें ऐकतां सांगतांही
गमे लाभली जन्मसाफल्यता ही ।
मनीं खेद अत्यल्पही आढळेना
सुखानंद आनंद पोटीं ढळेना ॥ ३ ॥
समर्थ स्वयें मेघ आनंदवृष्टी
करी, कोणता जीव राहेल कष्टी ।
सुखीं नाहली काय ही भूतसृष्टी
न ये तो महाघोर संसार दृष्टी ॥ ४ ॥

भरे रामरंग स्वयें अंतरगीं
बुडे चित्त चिद्रूप हें चित्तरंगीं ।
न भंगोचि हा रंग कोण्या प्रसंगीं
मना ! दंग हो शुद्ध चैतन्यसंगीं ॥ ५ ॥
रघूत्तंस वक्ता रघूत्तंस श्रोता
असा दोनि भागीं रघूत्तंस होतां ।
रघूत्तंस हा रंगतां अंगअंगीं
विराला पहा ! लक्ष्मण प्रेमरंगीं ॥ ६ ॥

## २४ दासबोधाचें मंगलाचरण.

( श्रीदासबोधांतील महत्वाचे विषय मुद्दा न सोडतां क्रमानें दोनशें श्लोकांत आणायची इच्छा झाली तेव्हां त्याचवेळीं संपूर्ण पहिला दशक पुढील १३ श्लोकांत आला ).

( १ ) असे कोणता ग्रंथ हा ? काय येथ
मुखें बोलिले श्रीगुरु ? प्राप्ति तेथ ।
कशी कोणती श्रोतयां वाचकांसी ?
वदोनि स्वयें संशयो सर्व नाशी ॥ १ ॥
गुरू बोलती नाम या दासबोध
इथें दाविला भक्तिमार्ग प्रसिद्ध ।
इथें ऊघडी थोर अध्यात्मखाण
असा ग्रंथ हा ज्ञानभक्तिप्रधान ॥ २ ॥

इथें बोलिले ज्ञानविज्ञान याचे
नसे संशयाचे असे निश्चयाचे ।
इथें दाविली शास्त्र–आत्मप्रचीती
उडे ज्या गुणें घोर संसारभीती ॥ ३ ॥

असा ग्रंथ सश्रद्ध ऐकावयासी
सदोद्युक्त ते होति गा ! पुण्यराशी ।
क्रिया पालटे मुक्ति साजुज्यलाही
गळा माळ घाली न संदेह कांहीं ॥ ४ ॥

(२) नमो बोधरूपा गणेशा ! परेशा
नमो ज्ञानदात्या सुरूपा सुरेशा ।
नमो विघ्नहर्त्या नमो विश्वभर्त्या
परेहूनि पर्त्या नमो सर्वधर्त्या ॥ ५ ॥

(३) नमो शारदा ! ब्रह्मकन्या सुरूपा
चतुर्वाक्–स्वरूपा नमो स्फूर्तिरूपा ।
जगत्कार्यकर्त्री नमो मूळमाया
मला स्फूर्ति दे स्वस्वरूपासि गाया ॥ ६ ॥

(४) नमो सद्गुरो ! वर्णवे रूप कोणा ?
जिथें मूळमायाहि पावो सकेना ।
दिसेना तया कांहिं दृष्टांत द्याया
भजे मौनरूपेंचि लागोनि पाया ॥ ७ ॥

(५) नमो संत ! श्रीमंत मोक्षश्रियेनें ।
जिवा स्वात्मसाम्राज्य देती दयेनें ।

सुखानंदराशी जगीं धर्ममूर्ती
करा हो करा अर्थिवांछाप्रपूर्ती ॥ ८ ॥

(६) नमो श्रोतृवृंदा! सदानंदकंदा
सदा प्रेमभावेंचि गातां मुकुंदा।
कृपादृष्टीनें बोलवा याहि मंदा
पहा माय ते पूरवी बाळछंदा ॥ ९ ॥

(७) नमो सत्कवी! शब्दसृष्टिप्रणेते
तुह्मी झाडितां हो अविद्यानिशेतें।
जनीं देवसत्कर्मधर्मादिकांतें
तुह्मीं गाउनी जागवीतांचि यांतें ॥ १० ॥

(८) नमो संतसभा जेथ अध्यात्मचर्चा
घडे वाक्सुपुष्पें हरीची सदर्चा।
जिथें भक्त सप्रेम गाती हरीला
उभा ठाकतो तोहि भावा भुकेला ॥ ११ ॥

(९) नमो मोक्ष जो सर्व अर्थांवरिष्ठ
भवाचे चुके घोर जेणें अरिष्ट।
परब्रह्म अंगें सुखें देई खेवा
जरी भाग्ययोगें घडे संतसेवा ॥ १२ ॥

(१०) नमो मानुषाकार हा देह धन्य
असा आत्मलाभासि सत्पात्र नान्य।
विवेकें अहंताममत्वासि त्यागी
सुखेनैव स्वानंदसाम्राज्य भोगी ॥ १३ ॥

———

# २५ जन्म साफल्य.

सुप्रेम जे मजवरी करितात नित्य
ज्यांचें असे विमल वर्तन शुद्धसत्य ।
आनृण्य जोडिन तया सुखवूनि जेव्हां
मज्जन्म हा सफल होईल जाण तेव्हां ॥ १ ॥
ज्यांनीं परार्थ बहु कष्टविले स्वदेहा
नाहीं कधींहि गणिले सुख-वित्त गेहा ।
त्यांच्या समान जनकार्य करीन जेव्हां
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ २ ॥
जे शूर, वीर, कवि, साधु, विचारवंत,
जे राष्ट्रनायक, धुरंधर, जे महंत ।
त्यांच्या स्मरेन कृति पुण्य उदार जेव्हां
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हा ॥ ३ ॥
ज्यांनीं स्वदेशयश भूवरि गाजवीलें
ज्यांनीं स्वदेश इतिहासहि साजवीलें ।
त्यांचें चरित्र गुण गाइन नित्य जाण जेव्हां
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥४॥
ज्यांच्या मनीं दिसति मूर्तिहि पूर्वजांच्या
सद्ग्रंथ थोर कृति रम्य अपूर्व ज्यांच्या ।
त्यांचा मनीं सदुपदेश ठसेल जेव्हां
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥५॥

' शीलार्थ संतत झटा—न धनार्जनार्थ
यज्ञार्थ अर्थ मिळवा—न सुखार्जनार्थ ।
हा शास्त्रबोध मनिं पूर्ण भरेल जेव्हां
मज्जन्म हा सफळ होइल जाण तेव्हां ॥ ६ ॥
स्नेहार्द्र यन्नयन सर्व जनांसि पाहे
यत्प्रेमपूर जगतीवरि नित्य वाहे ।
त्या दीनवत्सल विभूस भजेन जेव्हां
मज्जन्म हा सफळ होइल जाण तेव्हां ॥७॥
आपद्गत स्वजन पाहवती न डोळां
तत्क्लेश ते बघुनि होतहि जीव गोळां ।
तद्दुःख दूर करण्यास झटेन जेव्हां
मज्जन्म हा सफळ होइल जाण तेव्हां ॥ ८ ॥

---

# २६ धर्मगुरुचा आदर्श.

( इंग्रजी कवि गोल्डस्मिथ यांचें 'डिझर्टेड व्हिलेज' हें काव्य मुलांस शिकवीत असतां त्यांतील ' त्या खेडेगांवचा धर्मोपदेशक ' हें वर्णन वाचून पुढील काव्य लिहिलें. बहुतेक स्वतंत्र असून आपल्या आचरविचारांना धरून लिहिलें आहे. )

## पद

( चाल—सृष्टिचा लडिवाळ ).

श्रीहरिचरणीं वंदन करितों नंदनसा हा कवी ।
संतचरित हें दिव्य रसायन याची घ्यावी चवी ॥ध्रु०॥

[ १ ]

पंचवटीं क्षेत्रांत राहिला पुण्यपुरुष चांगला ।
वयोवृद्ध परि सतेज ह्मणुनी तरुण शोभला भला ॥
पुष्पवृक्षपरिवेष्टित उटजीं राहुनि विश्रामला ।
'मला मला' हा घोष करुनि तो चित्तीं नच तापला ॥
ज्या प्रभुनें मज सदयपणें नरदेह थोर हा दिला ।
योगक्षेमहि तोचि चालविल जाणुनि संतोषला ॥
'चोंच निर्मिता चारा पुरवी-' यावरि विश्वासला ।
मायबाप विश्वाचा विठल तद्भजनीं रंगला ॥
शिकला नाहीं विद्या अथवा नानाविध त्या कला ।
परोपकारीं परी परोपरि पिंड पहा पोसला ॥

शुद्ध चित्त मृदुभाषण यांहीं सर्वांला मानला ।
सभोंवारचे लोक ह्मणती हो पाहुं पुरुष हा चला ॥१॥

[ २ ]

मोठ्यामोठ्या शहरापासुनि दूर सदा राहुनी !
जनहितकर आयुष्य वेंचिलें निष्पापत्वें जनीं ॥
संपत्सत्ताधीश नुतिप्रिय दुबळ्यांच्या वंचनीं ।
शूर थोर जे त्यांचें द्वारहि पाहीना लोचनीं ॥
हांजी हांजी करुनि थोरपण मिरवावेसे मनीं ।
येईना, परि तत्पर राहे दीनांच्या रंजनीं ॥
आत्मदुःखसुख विसरे सारे परदुःखोद्धारणीं ।
मानी परधन वमनसम सदा मूक असल्लापनीं ॥
ज्या ज्या वृद्ध प्रौढा युवती तितुक्या माता गणी ।
मुग्धा सरला बाला याला दिसती कन्या मनीं ॥
भार्या आर्या सुशील तत्पर होती तद्रंजनीं ।
गृहलक्ष्मीसे तिस संमानी हाही मंजुध्वनी ॥ २ ॥

[ ३ ]

भवार्णवीं दगदगले थकले त्यांतें तारावया ।
झटला, शिकला यांत महोत्सव मोक्षहि मानावया ॥
जया माय ना बाप बंधु सुत उरला पोसावया ।
भोगी रोगी विषयी व्यसनी—साधु जवळ करि तया ॥
भिक्षावृत्ति स्वधर्म गणुनि प्रतिवर्षीं यावया ।
पलितमुंड लिंबाजि सवकला हाही पोषी तया ॥

पूर्ववयीं दुर्वृत्त मत्त सोमाजी मागावया।
लज्जा शंका ज्यास न उरली सांभाळी हा तया ॥
तरुणपणीच्या युद्धकथा सरसावुनि सांगावया।
सजे सयाजीराव हाहि त्या जखमा बांधावया ॥
देशकालपात्रत्व पाहिजे जरी दान द्यावया।
पात्रापात्रविचार सुजेना द्रववी तन्मन दया ॥ ३ ॥

[ ४ ]

परोपकारीं झटला झिजला कायावाचामनीं।
कृती तयाची देखुनि वदनें लपविलिं हो चंदनीं॥
भूतें सारीं भगवंताचीं रूपें मानी मनीं
तत्सेवा ही भूतात्म्याची पूजा ऐसें गणी ॥
सन्मार्गच्युत युवयुवती त्या आर्द्रचित्त होवुनी
घरीं जाउनी त्यांच्या त्यांना सुधरि बोधबोधुनी ॥
पाप्यांच्याहि मृत्युसमयिं हा रामनाम गर्जुनी।
आश्वासी या सांगे 'लय हें लावा नारायणीं' ॥
स्वसुखासक्त न, रक्त सदा परसौख्याच्या चिंतनीं।
अनाथ दुबळे अंध पंगु या सर्वांचा हा धनी ॥
नवनीताहुनि मृदु कोमल तद्धृदय रसें ध्याउनी।
विरला विरघळला कवि लक्ष्मण काव्य संपलें म्हणी ॥

# ३ उपदेशपर कविता.

## २७ उद्यम

अनुष्टुभ् छंद.

उद्यमें चित्तवृत्ती या पुष्पांपरि विकासती ।
मालिन्य जाउनी त्यांचें होती संशुद्ध पावन ॥१॥
उद्यमें दृढ होती हे नेत्रपादकरादिक ।
उद्यम श्रेष्ठ जीवांचें मुखमंडलमंडन ॥ २ ॥
उद्यमें झळके तेज कोण पाहे मुखाकडे ।
आरोग्य भाग्य तेंही या उद्यमें प्राप्त होतसे ॥ ३ ॥
उद्यमें बुद्धि फांके बा ! शास्त्रजातीं कळांतरीं ।
उत्साह यश संपत्ती उद्यमें द्वारिं खेळती ॥ ४ ॥
उद्यमेंचि चढे जीव परमात्मपदावरी ।
जे जे विख्यात या लोकीं ते सारे उद्यमेंचिगा ॥५॥
दैन्यवाणें जिणें व्यर्थ आळसें तुच्छ होतसे ।
उद्यमें अपराधीनें साधावे पुरुषार्थ ते ॥६॥
दारिद्र्य दुःख भोगोनी गांठावे सुमहत्पदा ।
कष्टां कंटाळतां प्राणी स्वहितासि मुके सदा ॥७॥
टांकीचे घाव सोसोनी दगडाचा देव होतसे ।
क्लेशाच्या पाहतां खडका रडका-त्रासतो मनीं ॥८॥
विघ्नांच्या उठतां फौजा लोटावे त्यांवरी बळें ।
दळें रिपुगणांचीं जो लोळवी वीर धीर तो ॥९॥

आळसें बुद्धिसामर्थ्य ज्याचें त्यासीहि नाकळे ।
वडिलें ठेविलें धनही करंट्यासी न भोगवे ॥१०॥
उद्यमी निश्चयोत्साहें बुद्धिशस्त्रें पराजिती ।
पराजिती विघ्नशतां शेखीं सत्फळ पावती ॥११॥
स्त्रीहृदयी निरुत्साही विघ्नें त्यासीच दापिती ।
कांपती वीरपुरुषा पुढें यायासि लाजती ॥१२॥
उद्यम श्रेष्ठ कार्यार्थीं यावज्जीव घडो सुखें ।
परमात्मकृपा हीच सांगे लक्ष्मण मानसा ॥ १३ ॥

# २८ निग्रहासी साध्य सर्व कांहीं

( एका विपद्ग्रस्त मित्रास लिहिलेलें पत्र. )

अभंग.

[ १ ]

प्रयत्नें अभ्यासें साध्य नव्हे ऐसें ।
कांहींच न दिसे विश्वामाजी ॥ १ ॥
लंडी अंगचोर भ्याड अविश्वासीं ।
बाधिती तयासी विघ्नचिंता ॥ २ ॥
निश्चयाचा ढिला स्वयें अविश्वासी ।
श्रीकृष्ण तयासी पावतीना ॥ ३ ॥
आत्मविश्वासी जो धैर्यवंत बळी ।
काय भूमंडळीं असाध्य त्या ! ॥ ४ ॥
आत्मविश्वासाचें वज्र लेई अंगीं ।
न भंगे प्रसंगीं धैर्यबळ ॥ ५ ॥
निश्चयाचा मेरु तयापाशी हरी ।
सुदर्शनें वारी विघ्नजात ॥ ६ ॥
इच्छावें तें मिळे सर्वा सर्व कांहीं !
योग्यतेची नाहीं खाण कोठें ! ॥ ७ ॥
विषयीं विरक्त देहधर्मी नियत ।
सत्कर्मी निरत धैर्यवंत ॥ ८ ॥

यावरी सत्यत्वें हरीचा अंकिला ।
वरिती तयाला सकळ सिद्धी ॥ ८ ॥
अभ्यासें प्रत्यक्ष परब्रह्म सांवळा ।
करतळीं आवळा तैसा हरी ॥ ९ ॥
परंतु वा सख्या ! पाहिजे निग्रह ।
होती सर्वग्रह सानुकूळ ॥ १० ॥

[ २ ]

गुणवर्धनासी मर्दन उपाय ।
मुख्यत्वें अपाय सुलभयश ॥ १ ॥
विघ्नां आघातांतें आपत्तींतें भिये ।
यशः प्राप्ती होये तयां कैची ? ॥२॥
वैभवाचा सूर्य तळपतां आकाशीं ।
लोपती सर्वांशीं सुविचार ॥ ३ ॥
आपत्तीच्या रात्रीं काळोख्या सख्या ! रे
सद्विचारतारे चमचमती ॥ ४ ॥
आपत्तीच्या लाटा सारीं दोहीं वाहीं ।
धीरेवीण नाहीं पैल तीर ॥ ५ ॥
शांत दिसती सारे होतां सुपरीत ।
वीरां विपरीत धैर्य देतें ॥ ६ ॥
पोहतां पोहतां शिके पोहण्यासी ।
विवेकें वीरासी धैर्य चढे ॥ ७ ॥
झंझावातीं नौका हाकारी नाविक ।
येणेंचि विवेक धैर्य मिळे ॥ ८ ॥

स्वयें न बुडे तरे आणिकांसीं तारी ।
तोचि या संसारीं धन्य धन्य ॥ ९ ॥

[ ३ ]

यश अपयश प्राप्त होई जें जें ।
निवांत साहिजे सकळही ॥ १ ॥
इच्छाशक्ति तीव्र उदंड पाहिजे ।
निश्चयें लाहिजे सकळ सिद्धी ॥ २ ॥
उत्साहें परिपूर्ण हृदय वीराचें ।
त्यामध्यें खेदाचें नांव नाहीं ॥ ३ ॥
न तोडितां तरु फुटे ना फोपावे ।
अपेशेंचि पावे फळ पूर्ण ॥ ४ ॥
तोडियेला तरु निश्चयानें फुटे ।
फळभारें दाटे काळक्रमें ॥ ५ ॥
पडे तोचि चढे, न पडे न चढे ।
पडतां पडतां चढे निग्रहीच ॥ ६ ॥
निग्रहावांचूनी यश कैचें मिळे ? ।
असो हें न कळे भेकडासी ॥ ८ ॥
निग्रहें निश्चयें पाय टाकी पुढें ।
तयासी रोकडें यश सिद्ध ॥ ८ ॥
बलिष्ठ द्रढिष्ठ तो लोकीं वरिष्ठ ।
तयाचें अरिष्ट हो न सके ॥ ९ ॥

———

# २१ व्यवहारनीति–फटका.

ऐक सख्या ! संसार हाट हा अफाट यातें भुलूं नको ।
सावध सावध सावध राहे व्यवहारामधिं फसूं नको ॥
गुप्त आपुले विचार नाना भलत्यासलत्या सांगुं नको ।
स्वमनःसमता सोडूं नको भरिं भलत्या कधिंही भरूं नको ॥ध्रु०॥
पूर्ण कसाला लाविल्याविना मित्र कुणाला ह्मणूं नको ।
खरा मित्र तो प्राण वहिश्वर तुझा खूणही सोडुं नको ॥
' मित्ररत्न ' ही दुर्लभ संज्ञा वाजाऱ्याला देऊं नको ।
शिताभोंवतीं भुतें, तशास्तव उगा द्रव्य तूं उधळुं नको ॥
कष्टप्रद त्या कलहाचा संसर्ग आपणा लावुं नको ।
कलहीं वैऱ्या नरम होइतों जरब लावितां विरमुं नको ॥
संकटकाळीं डगूं नको । सवदा करितां चकूं नको ॥
पराधीनता धरूं नको । वेडऱ्यापरि तूं वकूं नको ॥
संथपणानें भल्याबुऱ्याचें ऐकिल्याविना राहुं नको ॥ऐ०॥१
वटवट निंदा ऐक मुकाट्या उणें झटपटा बोलूं नको ।
हमरीतुमरी सदा नको परि तेज आपुलें दवडुं नको ॥
घाम येइ तों काम करुनीं दाम जोडण्या लाजुं नको ।
काटकसरिनें न्यायोपार्जित वित्त वेचितां विरूं नको ॥
लांडिलवाडी त्याग सर्वथा नष्ट कृपणता धरूं नको ।
ऐपत पाहुनि वेप करावा नट्टा पट्टा मुळीं नको ॥

सर्वस्वाचा नाश करी त्या ब्रह्मस्वाला शिवूं नको ।
मूळ कुळाचें खंडुनि पाडी निपट निपट हें नको नको ॥
धनको अथवा ऋणको बाबा प्राणांतींही होऊं नको ।
धनसंबंधीं धन जाउनि वरि स्नेह तुटे हें विसरूं नको ॥
आत्महत्यारा बनूं नको । पाखांडामधें शिरूं नको ॥
देह झिजवितां खिजूं नको । सत्यापासुनि चळूं नको ॥
रामचंद्रसुत लक्ष्मण बोले:रामप्रभुतें सोडूं नको ॥ ए०॥२॥

# ३० अनुभवयोगिराज काव्य.

## सर्ग पहिला.

आर्या.

श्रीरामराय तारी स्वपदनता त्या असो सदा नमन ।
यत्पादकृपालव करि लवकरि भवपाशमुक्त दासमन ॥ १ ॥
एके दिवशीं भवरासरित्तटाकीं अतिप्रसन्नमनें ।
भव्य प्रवय तपस्वी तोषविला म्यां सुविप्र सन्नमनें ॥ २ ॥
मच्चित्तखेद जाणुनि अंतर्दृक् तो दयार्द्र विरघळला ।
दवकवळित गिर्युपरि प्रेमें अंभोद वाटते वळला ॥ ३ ॥
"चिंता न करीं, आलों कूट तुझें विकट सोडवायाला ।
निष्ठा मद्वचनावरि ठेव पुन्हां न ह्मण 'सोडवा याला' ॥४॥
अनुभवयोगी ऐसें मजला सर्वत्र लोक वदतात ।
विश्वकुटुंबश्रेष्ठा मातें आप्तांत तात गणतात ॥ ५ ॥
नृप यश संपादी जरि लाधे सन्मात्रि तद्धितोद्युक्त ।
तेंविं प्रपंच वरवा नटतो जरि तो असेल मद्युक्त ॥ ६ ॥
सत्वरजस्तम यांहीं सृजिली ही सृष्टि सृष्टिकर्त्यानें ।
न्यूनाधिकगुणभागें भूतांचे संघ निर्मिले त्यानें ॥ ७ ॥
पाषाणादिक तामस व्याघ्रव्याळादि जीव राजस रे ! ।
द्विगुणक्षयीं नृदेहीं भाग्यें सत्वप्रदीपभा पसरे ॥ ८ ॥

तामस अज्ञानज वा ! निद्रालस्यादियुक्त तूं जाण ।
राजस वर्तवि कर्मीं, कामद्वेषादिकांस ही खाण ॥ ९ ॥
संसृतिगर्तीं सेवी सत्त्वगुण श्रेष्ठ पुरुष तोचि तरे ।
सत्त्वचि अलावु, सत्वर भव तरणें हेंचि पुरुषतोचित रे!१०
सत्त्व ज्ञानद पुण्यद संत स्वहितार्थ सेविती यातें ।
राजस दुःखद, मूढचि गोरस सांडूनि सेवि मद्यातें ॥११॥
राजस दुःखद परि तो फिरवी संसारचक्र हें सारें ।
परमार्थापरि लोकव्यवहारीं दक्षता धरीं वा ! रे ! ॥१२॥

आधीं आधिव्याधिप्रशमनपटु सत्यधर्म रक्षावा ।
धर्मेंचि श्रीहरिला वळवाया कायही उपेक्षावा ॥ १३ ॥
मग सत्कर्कीर्तिरवानें सोडावें विश्व नित्य दुमदुमनी ।
भक्त्याचारविचारें रमवावे सत्यशील धीर मुनी ॥ १४ ॥

रमुनी रमवी धर्मीं सत्कर्मीं रामरायपदपद्मीं ।
प्रेमें राहे त्याच्या कमला अमला उभी सदा सद्मीं ॥१५॥
परमार्थ साधणें हें साध्य परी ठेव साधनीं लक्ष ।
इहपर साधाया हो तूं संसारांतही सदा दक्ष ॥ १६ ॥
जेणें कुटुंबपोषण अब्रूनें तेविंही यशानें हो ।
इतुकें धन संपादीं धर्मानें नीतिनें सुखानें हो ॥ १७ ॥
‘ पैका नामर्दाचा, यश इज्जत मर्द जो असे त्याची ’ ।
हा साधबोध चिंतुनि जोडावी शुद्ध कीर्ति वा ! साची१८

वपुवेषवित्तविद्यावैभव लोकांत पावती मान ।
परि धन्य तोचि यद्गुणगणनें विश्व डोलवी मान १९

श्रीवाल्मीकिव्यास-ज्ञानेश्वर-नाथ-रामदासांनीं ।
सद्धर्म लाविले ते पाळावे सतत राम-दासांनीं ॥ २० ॥
धर्माधर्मचिकित्सा अतिगहना कूट पंडितांनाही ।
अल्पज्ञ वरळती कीं त्यांस कुणी थोर दंडिता नाहीं २१
मन्वादिक सुज्ञ भले झळले, सर्वस्व त्यां समाजहित ! ।
उमजे कैसें, चढतो धनमानांनींच ज्यांस माज, हित ? २२
वर्णाश्रमधर्म तुवां पाळावे जेविं पितर सादर ते ।
चित्त सदा कुलजाचें मंगल-हित-धर्मरक्षणींच रते ॥ २३ ॥
आनंद सौख्य यश दे, धर्मचि आधार होय विश्वास ।
इहपरलोकीं तारक धर्मचि, या वचनिं ठेव विश्वास ॥२४॥
विश्वास नसे तिळही, कलियुग कलिचेंचि चोज चालवितें।
पालवितें पापद्रुम, हाल वितें, धर्मदीप मालवितें ॥ २५ ॥
धर्मोपदेशकर्ते ब्राह्मण सांडूनि मान वागाति ते ।
पाववितें होते प्राक् कर्मा खंडूनि मानवा गतितें ॥ २६ ॥
प्रकटविले साधनपथ होउनि जे मलिन लोपले होते ।
नाथ—समर्थ—तुकोबा सदय सबळ केविं झोंपले होते ! २७
नास्तिकपण-मद्यातें प्राशुनि उन्मत्त बहुत वडवडती ।
अन्यायपापरत सद्धर्मच्युत खळहि समयिं गडवडती २८
कोटिसुगुणरत्नांचा उद्भव हरिभक्तिच्या असे पोटीं ।
परि पंचविषयाविषधरदष्टांच्या भक्ति वागते ओठीं ॥२९॥
कुलदेशाचारांशीं शास्त्रांशीं करिति जे विरोधांतें ।
विषवृक्षसे त्यज, जणों आले धर्मक्षयार्थ बहुधा ते ॥३०॥

धनलोभी जन कैसे नागविती हेंचि सांगतों तुजला ।
सर्वत्र हेचि रीति प्रस्तुत दिसते जनांत नित्य मला ॥३१॥
कलि म्हणतो ‘ ब्राह्मण हो ! सोडुनि वेदान्त कायदे वाचा ।
वाचा कुटुंब पोसा’ झाला हा कोप काय देवाचा ! ॥३२॥
गरिबांचे काळ परी धनिकपदीं त्यक्तलज्ज बाळकसे ।
लुडबुडती, बुडत्यातें बुडविति नव्हती कराळ व्याळ कसे? ३३
व्याळ बरे, परि संतत खळ हे खळखळ भल्यास रडवीति
सर्व वळांत अलंघ्यचि गमतें खळबळ, खला सकळ भीती
सत्तेचा सदीचा बुद्धीचा वेंच दीन दुबळ्यांना ।
ठकवाया करिती हे खळ देतो कोण रे ! दुवा त्यांना ३५
त्यांचे दांत निराळे खायाचे तेविं दाखवायाचें ।
व्रत गरिबागुरिबांना भोंदुनियां ठार मारवायाचें ॥ ३६ ॥
न्यायान्याय न गणती, न पाहती धर्म पुण्य कीं पाप ।
थापांत शूर, म्हणती बापास न बाप, घेति जनशाप ३७
अन्यापहार चित्तीं नित्य, हरुनि वित्त देति हृत्ताप ।
अन्योत्कर्षे उसळे पित्त, न पापास त्यांचिया माप ॥३८॥
पाडिति विपट कपटपटु, दोघांत स्वार्थ साधण्यासीं ।
लावुनि झुंज पहाती खेळ अशी कुटिललोकराहाटी ! ३९
दोघांस मूर्ख ठरवुनि वर्चस्व स्थापण्यास हे शिष्ट ।
टपती तटस्थ, राखुनि मिष्टपणा, दुष्ट केविं पापिष्ठ ॥४०॥
लिडबिडलें अंतर जरि कपटमळें लोभ दावि बाहेर ।
भक्ष्याखुसह क्रीडे मांजर, खळही तसाचि बा ! हेर ! ४१

अंतर कपटी परि मुख रसाळ ज्याचें सुत्याज्य तो खळ गा ।
माळ वरा, परि गुल्माचृत दे हटकूनि वा ! दगा खळगा ४२
वाग्वर्तनीं जयाच्या मेळ नसे अंतरंग बहिरंग !
भिन्न सदा ठेवुनि जो वागे त्याचा नसो तुला संग ॥४३॥
डोळस परि अंध, तसा बधिर असुनि कर्णही अती तिखट
न्यायी सदा म्हणवितो,ये विपरीतहि जरि प्रतीति, खट४४
उपकृतिकर्त्याच्याही टपतो नाशास खळ, न हा सरळ ।
गोरसदात्या विषधर चावाया धाउनी वमी गरळ ॥४५॥
मधुमधुर बोल बोलुनि कपटव्यूहांत लोक हा घेरी ।
भ्रमरी,चक्री,टक्री,ठक काविसांहि नित्य आणितो वेरी४६
अन्याय करुनि करवी हरवी परवित्त हस्तकांकरवी ।
मस्तक नीचपदींही लववुनि अयशोमळें स्वमुख भरवी ४७
कार्याकारण ठेवी कार्यार्थी लोभमूल संबंध ।
कार्यांतीं सत्वराचि स्नेहाचा क्रूर तोडितो बंध ॥ ४८ ॥
तेजस्वी स्वबळानें स्वगुणानें लौकिकास जरि चढला ।
मत्सरलोभहतां तें होय महद्दुःख, जरिहि बहु पढला ॥४९॥
तेजस्वी पुरुषर्षभ वान्ह, कुमांत मत्सरीच पापड तो ।
कीं रविपुढें न टिकतो चंद्र, नभीं नित्य तो फिका पडतो५०
सत्संगति सुख देते सुजना, कुजना तशी न हें पारिस ।
लोहापरि खापरिला देतो स्वर्णत्व कां कधीं परिस ? ५१
खळकृत निंदाच्छलनें सत्तेज जरि क्षणार्ध मावळलें ।
केतुग्रसनें सांग ! रविचें तत्तेज नित्य कां मळलें ! ॥५२॥

खलकेतुग्रस्तातें साधुरवीतें बघुनि हळहळतें ।
विश्व सकळ हें, तच्छल दुःसह न गमेचि तेंवि हळहळ तें ५३
व्यवहारज्ञपणाचा गर्व धरुनि कुटिलनीतिनिष्णात ।
स्तविति दुरंगीपण त्या व्हावें अवलोकितांचि सुस्नात ५४
एवं बहुविध जन हे चेवविती ज्यांसि स्वार्थवेताळ ।
तन्नीतिरीति न धरीं, वा ! त्यांचे सोडिती थवे ताळ ५५
दुर्जनसंगति खोटी पंचमहापातकांस आधार ।
पूर्वदुरितराशींचें फळ, कामाद्यखिलशत्रुंना थार ॥ ५६ ॥
नित्य खळांची संगति सन्मन शोकार्णवांत बा ! बुडवी ।
कढवुनि सच्चितातें रडवी, परमार्थबुद्धिनें सुडवी ॥ ५७ ॥
पूर्व महापापानें घडतां दुःसग तंग बांधावे ।
धैर्यनगा भंग न हो यास्तव नामींच नित्य रंगावें ॥ ५८ ॥
किंबहुना हरि सकरुण भक्तोद्धारार्थ संकटें आणी ।
अज्ञपणें सद्भक्तहि जरि रे ! डोळ्यांस आणिती पाणी ५९
नाविक झंझावातीं, योद्धा चतुरंग संगरीं शिकतो ।
मलयज देह झिजवुनी परिमलविख्यात पतनीं विकतो ६०
कंटकरुद्ध गुलाबा पन्नगसंवीत [illegible] रक्षुनी ।
प्रभुसंकेत असा हें वर्तावें शांत[illegible] न मनिं धरुनी ॥ ६१ ॥
ज्या ज्या वेळीं उठती ऊर्मी बा [illegible] हृदय सागरावरती ।
तेव्हां तेव्हां त्यांतें सावध राहू[illegible] धीर आवरती ॥ ६२ ॥
सावध राहुनि आला तरि काढ[illegible]चि राग निपटून ।
न दिसों द्यावा, ऐसें मनं करी जो [illegible]ग्रासियानिति प[illegible]न ६३

अविवेकांकित होउनि बरळे भलतेंचि चाट वाचाट ।
सूज्ञ म्हणाति कीं मध्यभाशी वा उथळ मूर्ख हा भाट ॥६४॥
पंत ह्मणति ' सुज्ञमतें आहे वादांत सर्वथा तोटा ' ।
तें सत्यचि ह्मणुनि बुधें न पडावें त्यांत, आग्रहचि खोटा६५
' मी तूं ' ' तूं मी करितां देहाहंकार वाढतो भारी ।
शब्देंचि शब्द वाढे, चित्त तुटे हरुनि मित्रता सारी ॥६६॥
बकबक बोलुनि साधे कोणाला कोणता कसा अर्थ ? ।
सार ज्ञानाचें हें सर्व मनोनिग्रहाविणें व्यर्थ ॥ ६७ ॥
मंत्र करीं एकांतीं, लोकांतीं सुप्रसन्न बाहेर ।
गंभीर चित्त ठेवुनि लोकव्यवहार फार वा ! हेर ॥ ६८ ॥
निंदाच्छलहि सहावा कृतघ्नताही सुखेंचि सोसावी ।
परि धनदेह झिजवुनी सत्पथ सच्छील सुयश पोसावी ६९
ईश्वर साक्षी ठेवुनि सुज्ञें कर्तव्यकर्म सारावें ।
वारावे दोष सकल स्वकुल भवाब्धींत सर्व तारावें ॥७०॥

श्लोक ( वृत्त शा. वि. )

दे भोळा बहु बावळा बघुनि बा ! त्याच्या करीं आवळा ।
शिष्टत्वें अति मिष्ट दुष्ट वदुनी काढी पहा ! कोहळा ।
जो पोळापरि पुष्ट गुंड रडवी दीनांस, जो ओवळा ।
अंतर्बाह्य, सदा टपे परधना पिंडा जसा कावळा ॥ ७१ ॥

श्लोक ( वृत्त शिखरिणी )

खळांच्या सांगतीं क्षणभरिहि वास्तव्य न करी ।
खळांतें सोडनि त्वरित झटकावें बहु दुरि । ”

असें सांगोनी तो मुनिवर तसाची विरमला ।
मला तो सद्ग्रंथ प्रियतम गुरुश्रेष्ठ गमला ॥ ७२ ॥

संगमनेर, मे, १८९८

---

## सर्ग दुसरा

श्रीरामप्रभुचरणीं करितों मी शतसहस्र हीं नमनें ।
म्यां तत्पदयुगभजनीं रंगावें सर्व घस्र हीनमनें ॥ १ ॥
देवि सरस्वति ! मजला सकृपत्वें सर्वकाळ लक्षावें ।
आधिव्याधिभवभयापासुनि हे वायुपुत्र ! रक्षावें ॥ २ ॥
सद्गुरुनाथा ! माथां कर ठेवुनि मज करा कृपापात्र ।
काय अशक्य समर्था ! हो हा जन गलितदोषगण मात्र॥३॥
श्रीवाल्मीकिमुने ! वा ! झालां गावूनि रामयश धन्य ।
रामयशःपीयूषीं उपजविता प्रीतिदार्ढ्य नच अन्य ॥ ४ ॥
त्या बुद्धिसागरातें योग्यातें सदितिहासकर्त्यातें ।
नमितों श्रीव्यासातें नारायणरूप सुकविभर्त्यातें ॥ ५ ॥
श्रीमच्छंकर शंकररूपी त्रिजगांत जाहला मान्य ।
‘ सत्यसनातनधर्मस्थापक ’ ही कीर्ति मेळवी नान्य ॥६॥
श्रीपंढरिसुक्षेत्रीं दैवें मम वास अल्पसा घडला ।
तेणें माझा प्रेमा विठ्ठलचरणीं मयूरपदिं जडला ॥ ७ ॥
वैकुंठपेठ पंढरि भूवरी संतां पसंत ही भारी ।
नारीनर इजमाजीं भजति प्रेमें सदैव कंसारी ॥ ८ ॥

अविवेकांकित होउनि वरळे भलतेंचि चाट वाचाट ।
सूज्ञ म्हणति कीं मद्यमाशी वा उथळ मूर्ख हा भाट ॥६४॥
पंत ह्मणति ' सुज्ञमतें आहे वादांत सर्वथा तोटा ' ।
तें सत्यचि ह्मणुनि बुधें न पडावें त्यांत, आग्रहचि खोटा६५
' मी तूं ' ' तूं मी करितां देहाहंकार वाढतो भारी ।
शब्देंचि शब्द वाढे, चित्त तुटे हरुनि मित्रता सारी ॥६६॥
बकबक बोलुनि साधे कोणाला कोणता कसा अर्थ ? ।
सार ज्ञानाचें हें सर्व मनोनिग्रहाविणें व्यर्थ ॥ ६७ ॥
मंत्र करीं एकांतीं, लोकांतीं सुप्रसन्न बाहेर ।
गंभीर चित्त ठेवुनि लोकव्यवहार फार वा ! हेर ॥ ६८ ॥
निंदाच्छलहि सहावा कृतघ्नताही सुखेंचि सोसावी ।
परि धनदेह झिजवुनी सत्पथ सच्छील सुयश पोसावी ६९
ईश्वर साक्षी ठेवुनि सुज्ञें कर्तव्यकर्म सारावें ।
वारावें दोष सकल स्वकुल भवाब्धींत सर्व तारावें ॥७०॥

श्लोक ( वृत्त शा. वि. )

दे भोळा बहु बावळा बघुनि बा ! त्याच्या करीं आवळा ।
शिष्टत्वें अति मिष्ट दुष्ट वदुनी काढी पहा ! कोहळा ।
जा पोळापरि पुष्ट धुंड रडवी दीनांस, जो ओवळा ।
अंतर्बाह्य, सदा टपे परधना पिंडा जसा कावळा ॥ ७१ ॥

श्लोक ( वृत्त शिखरिणी )

खळांच्या सांगतीं क्षणभरिहि वास्तव्य न करी ।
खळांतें सोडनि त्वरित झटकावें बहु दुरि । ”

असें सांगोनी तो मुनिवर तसाची विरमला ।
मला तो सद्ग्रंथ प्रियतम गुरुश्रेष्ठ गमला ॥ ७२ ॥

संगमनेर, मे, १८९८

---

## सर्ग दुसरा

श्रीरामप्रभुचरणीं करितों मी शतसहस्र हीं नमनें ।
म्यां तत्पदयुगभजनीं रंगावें सर्व घस्र हीनमनें ॥ १ ॥
देवि सरस्वति ! मजला सकृपत्वें सर्वकाळ लक्षावें ।
आधिव्याधिभवभयापासुनि हे वायुपुत्र ! रक्षावें ॥ २ ॥
सद्गुरुनाथा ! माथां कर ठेवुनि मज करा कृपापात्र ।
काय अशक्य समर्था ! हो हा जन गलितदोषगण मात्र॥३॥
श्रीवाल्मीकिमुने ! वा ! झाला गावूनि रामयश धन्य ।
रामयशःपीयूषीं उपजविता प्रीतिदार्ढ्य नच अन्य ॥ ४ ॥
त्या बुद्धिसागरातें योग्यातें सदितिहासकर्त्यातें ।
नमितों श्रीव्यासातें नारायणरूप सुकविभर्त्यातें ॥ ५ ॥
श्रीमच्छंकर शंकररूपी त्रिजगांत जाहला मान्य ।
' सत्यसनातनधर्मस्थापक ' ही कीर्ति मेळवी नान्य ॥६॥
श्रीपंढरिसुक्षेत्रीं दैवें मम वास अल्पसा घडला ।
तेणें माझा प्रेमा विठ्ठलचरणीं मयूरपदिं जडला ॥ ७ ॥
वैकुंठपेठ पंढरि भूवरी संतां पसंत ही भारी ।
नारीनर इजमाजीं भजति प्रेमें सदैव कंसारी ॥ ८ ॥

पंढरिचें यश भुवनीं गाजाविलें फार पुण्डलीकानें ।
यत्पितृभक्तिश्रवणें लाजावें मूढ पुण्ड लेकानें ! ॥ ९ ॥
एके सायंकाळीं पुण्डलिकाचें समीप वसलों तीं ।
योगीश्वर अनुभवराट् एकाकी तेथ पातला हो ! तो ॥१०॥
साष्टांग नमन माझें घेउनि हर्षें मला ' भला गाजी ' ।
ऐसें वदला तेणें प्रहृष्ट होईन मी न मग कां जी ! ॥११॥
" बहु अज्ञ असति परि मदनुग्रहपात्रत्व हें तुझ्या ठायीं
पाहुनि आलों पुनरपि उपदेशाया स्वयें ठायीं ॥ १२ ॥
मौन धरुनि एकांतीं स्वपरांतरहेतु बहुत शोधावे ।
सावधपणें रहावें, स्वपरहितास्तव सुमित्र जोडावें ॥ १३
अंतर्बाह्य सुनिर्मळ, परहितरत, मत न ज्यास पाखांड ।
सात्त्विक, सत्यप्रिय, सद्वृत्त, सुहृद्भाव त्यासवें मांड ॥१४॥
विषयासक्त नसे जो, लोभ अनावर न ज्या, न जो भाड ।
मत्सरभत पछाडी ज्या न, सुहृद्भाव त्यासवें मांड ॥१५॥
गौरव मार्दव करुणा चित्तीं ज्याच्या, कधीं न जो दांड, ।
निष्कपटी, अनिमित्तप्रेम, सुहृद्भाव त्यासवें मांड ॥१६॥
मद्याद्यखिलव्यसनारहित, न जाणे सुपारिचें खांड ।
विद्येचें वेड जया, नित्य सुहृद्भाव त्यासवें मांड ॥१७॥
व्यासप्रणीत अठरा सद्ग्रंथ न ज्यास गमति थोतांड ।
ईश्वरभक्तिपरायण, नित्य सुहृद्भाव त्यासवें मांड ॥ १८ ॥
भारतपर्व रिझवि ज्या, कीं श्रीरामायणांतलें कांड ।
वेदान्तोपनिषद्रति नित्य सुहृद्भाव त्यासवें मांड ॥१९॥

‘ झाडाया पापातें तापातें देहबुद्धितें सांड ’ ।
चित्ता क्षणक्षणा हें शिकवि, सुहृद्भाव त्यासवें मांड ॥२०॥
दृष्टांत समर्पक सत्स्नेहाचा सांगतों सख्या ! तुजला ।
दुग्ध वरिष्ठ असुनिहीं सहवासें साम्य देतसेचि जला २१
पूर्वोपकृतिस्मरणें विधियोगें त्यास लागतां आंच ।
मित्रार्थ जळुनि जाई जल, सोसुनि कठिण अग्निचा जाच २२
आत्मार्थ प्रियनाश प्रेक्षुनि वन्हींत घालितेंचि उडी ।
दुग्ध, पुनःसंगतिनें स्वीकारी आपुली सदैव कुडी ॥२३॥
सद्गुणमंडित पंडित सन्मित्र स्नेहयुक्त जोडावे ।
जोडोनि दृढ धरावे तैसेंही आपण स्वयें व्हावें ॥२४॥
निर्मत्सर निष्कपटी नीतिज्ञ श्रेष्ठ मित्र दातार ।
स्मरुनि प्रार्थी ‘रामा ! शुचिवृत्ता ! यास तूं सदा तार’२५
संकटकाळीं धांवे विसरुनियां स्वार्थ रे ! चित्यापरि जो ।
सन्मित्र वीर शंकर निःशंक स्मरुनि साश्रु नेत्र भिजो २६
निर्मळ निश्चळ नित्यप्रेमळ तव बाळ तो सिताराम ।
तारा त्वच्छिष्यगणीं देता झाला मनासि आराम ॥ २७॥
ऐसे सुमित्र दुर्लभ बहुमोलाचे हिरेच ते साचे ।
दाविति वरकांतीचें जायाचें प्रेम मित्र ते काचे ॥ २८ ॥
‘ संसार दुःखसागर ’ सद्गच हें अनुभवेंचि वळखावें ।
सारासारविचारें सुविचारी मात्र शांतिसुख पावे ॥२९॥
‘संसार सारहीन’ ज्ञाते कथिती, तुला कसें न रुचे ? ।
दीपपतंगापरि कां मिथ्याभासासि भुलसि हे कुरुचे ! ३०

विषयानंदाभासा भुलती जे कृष्णसारखे मूढ ।
शोक-क्षय-भवचक्रारोह न त्यांचा चुके, न हें गूढ ॥३१॥
सद्ग्रंथसेवनीं मति गुंगावी कीं सदैव हरिचरणीं ।
भवतरणोपायांतें दाववित्यांच्या तशीच परिचरणीं ॥३२॥
ज्ञानेश्वरी भवतरी करि षडरींच्या दरींतुनी मुक्त ।
कीं दासबोध शोधक चित्ताचा तुज अलावु बहु युक्त ॥३२॥
भक्तिसुधारस पिकवी कलिकाळांच्या मुखांस जो सुकवी ।
हरिनामीं रति शिकवी सद्ग्रंथ तयास मानिती सुकवी ३४
एकांत रमाकांत-प्राप्तिस्तव धरिति सत संतत रे ! ।
कीं तद्वरेंचि दुस्तर विपदर्णव घोर सर्व संत तरे ॥ ३५ ॥
श्रीरामपादपद्मीं नाममरंदार्थ हो मिलिंद मना ! ।
ऐसें विनवुनि चपला सेवाया लावि त्या अरिंदमना ३६
नामसुधा हीं भवगद हरिते, करिते समस्त शोक रिते ।
हरिहरसंत मम मतें हरि ते, करि तेथ मस्त सा अरि ते३७
निंदास्तुति सम मानुनि वागावें सेवुनी उदासपण ।
मुक्ताहारसम सख्या ! मिरवावें रामपाददासपण ॥ ३८ ॥
तळमळपिशाच कलिमळयुक्त खळधिलाचि रे ! सदा शिवतो
निर्मळ निश्चळ हृदयीं प्रेमें सादर वसे सदाशिव तो ॥३९॥
सुखदुःखांचा दाता अन्य न, अन्यांसि लाविती बोल ।
'प्रारब्धकर्मभोगी जीव' गणुनि हें न बोलती फोल ४०
ज्या ज्या वेळीं जें जें होइल तें स्वस्थचित्त भोगावें ।
लाभालाभ जयाजय सम गणुनि प्रभुगुणांसि भो ! गावें४१

चोंचेआधीं करितो चाऱ्याची सोय जाणता देव ।
सर्व प्रतिपाळी जो भर्ते सद्भाव त्यावरी ठेव ॥४२॥
करुणार्णव राघव हा, सर्वांची लाज काळजी याला ।
याची कास धरावी कीं जाचो कधिं न काळ जीवाला४३
कामक्रोधादिक वा ! ग्रासाया टपति काळ जीवा हे ।
वाहे तनमन हरिला, भक्तांची तोचि काळजी वाहे ॥४४॥
गुप्तहि करितां पातक होतें विष, नरक, काळ जीवास ।
निष्पापसत्यमार्गें जातां मनिं करि न काळजी वास ॥४५॥
श्रीराम मायबाप प्रभु हा सर्वांसि सारिखा सदय ।
कर्मानुसार दुःखें येतां मढासि वाटतो अदय ॥ ४६ ॥
आतां पुरे ! पुरासी जा ! पुरती सर्व कामना तूर्ण ।
पूर्णमनोरथ करि हरि भक्त, तसें तद्रिपु शीघ्रही चूर्ण ४७
जेथें धर्म तिथें यश, नीति तिथें सौख्य, नित्य हा नियम
धर्मन्याय त्यजितां अंतीं करि शांतिसौख्यहानि यम॥४८॥
जें प्रतिकूळ स्वहिता कीं जें स्वीकारितां जडे शर्म ।
तें तें तसेंचि इतरां, जाणुनि हें वागतां घडे धर्म ॥ ४९ ॥
आधार धर्म जगता ! जगतां बाधा न धर्मनिष्ठास ।
अस्तास चालला रवि स्मरतां पावेन खेद हरण्यास "५०
विश्वप्रकाश ! पोषक विश्वाचा ! सत्प्रभा प्रसवित्यातें ।
प्रेरक मतिचा तूं तुज ध्यातो स्वहितेच्छु विप्र सवित्यातें"५१
ऐसें चिंतुनि रविला, नीरविला त्यांहि नमुनि योगी तो ।
तो झाला अंतर्हित अंतर्हित करुनि सौख्यभोगी तो॥

# ३ क्रोध

चालः—असा धरि छंद.

क्रोध अनिवार । जाणिजे शत्रु हा थोर ॥ ध्रु० ॥
देहीं राहुनि देहाचि नाशी । काष्ठां वन्हि जसा कां ग्रासी ।
हा क्रोध बोधसूर्यासि । करी अंधार ॥ जा० ॥ १ ॥
शरीर वळलें हें धातूंचें । चित्त राखितां धातू सांचे ।
समत्व राखावें चित्ताचें । करीं सुविचार ॥ २ ॥
साम्य विकारें नच ढवळावें । तेणें बुद्धिप्रभाव फावे ।
बुद्धिवैभवें हरिगुण गावें । सांडुनी घोर ॥ ३ ॥
क्रोध दुज्यावरि करुनी काय । लाभ आपणांतरि वा होय ।
दुःशब्दें भाजणें स्वकाय । कोण अविचार ! ॥ ४ ॥
क्रोधें शांतिसुखासि मुकावें । क्रोधें आत्मघातकी व्हावें ।
क्रोधें दैन्यदुःख पावावें । हांसतें पोर ॥ ५ ॥
चित्तीं काम असे जो गुप्त । क्रोध वाढवी तोचि अतृप्त ।
तृप्त हो तरि लोभचि सुप्त । चेतवी फार ॥ ६ ॥
जिंकी कामकोपलोभांसी । सांडी मूळ अहंभावासी ।
चुकेल तेणें सत्यार्थेंसी नरकद्वार ॥ ७ ॥
लक्ष्मण बोधी आपणासी । संतनिंदित या मार्गासी ।
सांडुनि भोगी स्वात्मसुखासी । अपरंपार ॥ ८ ॥

# ३२ आपत्तीचें गाणें !

वृत्तः—शालिनी.

आपत्तीनें लोक होती शहाणे
तींतें नेणें तें जिणें दैन्यवाणें ।
आपत्तीचा लागला नाहिं सोटा
ज्याच्या पाठीं तोचि मोठा करंटा ! ॥१॥
संपत्काळीं जीव मोहांध होती
तेणें अंतीं दुर्दशा ये अहो ती !
अंधत्वें हा खोल गर्ती पडाया
धांवे, नेणो ही प्रभूचीच माया ॥२॥
संपत्काळीं देव ना धर्म कांहीं
नीतिन्याया पारिखा हा सदाही ।
थारा चित्तीं याचिया दुर्विचारा
आचाराला ताळ ना तंत्र धारा ॥ ३ ॥
मानी मित्रा शत्रु, शत्रूसि मित्र,
हानी लाभा नेणतो हें विचित्र ।
संपत्तीची ती निशा दुर्निवार
मस्ती येतां नावडे सद्विचार ॥ ४ ॥
श्रीमत्ताच्या भोंवती जे पिसाट
गोळा होती दुर्गुणाचेचि भाट ।

साधायाला नीच मोठें घबाड
याच्या भोंतीं नाचती ते लबाड ! ॥ ५ ॥

आपत्ती ही ऊडवी झांज सारी
तेणें डोळे देखती सृष्टि न्यारी ।
आपत्ती ही शोकमोहा निवारी
कल्याणाचा दावुनी मार्ग तारी ॥ ६ ॥

नेत्रीं घेऊं लेवुनी अंजनासी
आपत्ती ही पायसी मोह नाशी ।
सृष्टी कैसी कोण मी कोठिला मी
हे बोधोनी नेतसे ते स्वधामीं ॥ ७ ॥

आपत्तीच्या बोल जन्मे कुशीला
धीला धैर्य स्थैर्य दे तेचि शीला ।
आपत्तीच्या आठवूनीहि लीला
वंदी मी या सद्गुरू माउलीला ॥ ८ ॥

अज्ञानाचें बीज निःशेष झाडी
संसाराचें स्वप्न मोडोनी काढी ।
आत्मारामीं जागृती दे सदाही
नोहे नोहे मित्र आपत्ति कांहीं ॥ ९ ॥

आपत्कालीं चित्त अक्षोभ्य ज्याचें
आघातींही धैर्य अव्यंग साचें ।
प्रज्ञास्फूर्ती शांतिदांती विवेक
ज्याच्या ठायीं धन्य तो वीर एक ॥ १० ॥

उत्साहश्री शुक्लचंद्रासमान
वाढे, गाढें चित्त आकाशमान ।
दुःखक्लेशा साहुनी तें स्मरेना
कोणाच्या तन्नाम जिव्हेसि येना ? ॥११॥

आपत्तीनें शौर्यधैर्यादि अंगीं
येती किंवा वाढती वा प्रसंगीं ।
आपत्ती ही खाण सर्वा गुणांची
प्रेमें घेते ही परीक्षा जनांची ॥ १२ ॥

जो तो बोले शूर मी वीर धीर
धर्मज्ञाता मीच मोठा उदार ।
ऐसे लोकीं बोलती लक्षकोटी
आपत्ती ही सद्‌गुणांची कसोटी ॥ १३ ॥

मी हो मोठा देशभक्त प्रसिद्ध
नाहीं ऐसा भक्त धर्मिष्ठ सिद्ध ।
ऐसे लोकीं बोलती लक्षकोटी
आपत्ती ही सद्‌गुणांची कसोटी ॥ १४ ॥

निर्लोभी मी इंद्रियांचा धणी मी
अन्यस्त्रीतें माय मानी मनीं मी ।
चित्तीं जो तो ही अहंताच घोटी
आपत्ती ही सद्‌गुणांची कसोटी ॥१५॥

डुंगाभोंतीं काजवा फेर घाली
जेथें तेथें चालते हीच चाली ।

पोटी मी मी वोठिं त्या ज्ञानगोठी
आपत्ती ही सद्गुणांची कसोटी ॥१६॥

एक्या खाणी कोळसाही हिराही
जन्मे दोघां कार्बनाचीच ग्वाही ।
पावे आघातीं हिरा उंच कोटी
आपत्ती ही सद्गुणांची कसोटी ॥१७॥

एक्यावर्णी कावळा कोकिळाही
त्यांचा भेद स्पष्ट वासंतिं पाही ।
अग्नीमाजी शुद्ध भांगार खोटी
आपत्ती ही सद्गुणांची कसोटी ॥१८॥

संपत्तीचा लाभ ज्या सर्वकाळ
जाणा त्यासी कोपला लोकपाळ ।
आपद्धीना सांग वैराग्य कोठें
लाभे ? सांगा ज्याविना ज्ञान खोटें ! ॥१९॥

आत्मज्ञानावांचुनी मोक्ष कैचा
मोक्षागारीं अद्वयानंद साचा ।
आपत्तीची केवढी वानुं थोरी
तारीं जी या घोर संसारपूरीं ॥२०॥

मोठे मोठे देशभक्त प्रसिद्ध
ज्ञाते दाते भक्त वा साधु सिद्ध ।
योगी रागी वीतरागी समस्त
आपत्तीनें तारिले पंत संत ॥२१॥

आपत्तीची हेळणा हो करीती
ऐसी आहे या जगीं लोकरीती ।
आपत्ती गे ! नेसि तूं सद्गतीला
बाई ! तूझ्या भुललों संगतीला ॥२२॥
भाग्यें मातें वोळला पद्मनाभ
आपत्तीचा जाहला संगलाभ ।
तेणें वागे प्रेम अन्योन्य भारी
याची गोडी काय जाणे भिकारी ! ॥२३॥
जन्मोजन्मीं सोडुनि त्वां न जावें
म्यांही तूतें निश्चळत्वें भजावें ।
बाई ! माझी जाणुनी भक्ति फार
द्यावें मागें तें न यावा नकार ॥२४॥
माते ! मातें देइं सत्संगतीला
ब्रह्मानंदीं तो विसावा मतीला ।
चित्तीं प्रीती कृष्णसंकीर्तनाची
अन्या वांछा नाहिं गा लक्ष्मणाची ॥ २५ ॥

पृथ्वी.

करीं धरुनि बाळका जपुनि चालवी माय ती
पडे तरि रडे स्वयें सदयता वदों काय ती ॥
स्वभक्त जरि संकटीं अचळ आळवी श्रीपदा
द्रवोनि हरि संहरी त्वरित सर्वही आपदा ॥ २६

# ३३ स्तुतिनिंदा.

—————:०:—————

आर्या.

पुरुषप्रकृतिभव मना ! एकात्मक विश्व सर्व जाणावें ।
स्वगुणानुरूप चेष्टति जीव सकळ हें मनांत आणावें ॥१॥
अन्यस्वभावकर्मं नको प्रशंसूं नको नको निंदूं ।
परनिंदेनें पदरीं न पडे परमार्थसत्सुधाबिंदू ॥ २ ॥
द्वैतविकल्पें अंगीं मिथ्याअभिमानरूप गद जडतो
नडतो : परमार्था येणें नरकांत जीव जड पडतो ॥ ३ ॥
आद्यंतवंत सारें दृश्य, नसावें ममत्व सृष्टींत ।
निःसंगत्वें लोकीं विचरावें ब्रह्म भरुनि दृष्टींत ॥ ४ ॥

श्लोक.

रामा ! तू मम रक्षणासि जपसी, चिंता कशाला करूं ?
चित्तीं निर्मल भाव ठेवुनि सख्या ! त्वद्रूप ध्यानीं धरूं ।
तोडीं ग ! भवपाश दुःखमय हे ' सोडी मला यांतुनी
जोडी दे चरणांबुजीं मजासि ते होडी भवाब्धींतुनी ॥५३॥

———

## ३४ स्वातंत्र्यलाभ.

पद.

स्वातंत्र्याची मजा गड्यांनो ! । स्वातंत्र्याची मजा ॥ध्रु०॥
पंजरबद्ध शुकातें जेव्हां । मुक्त करी हरिदया ॥गड्यानो१
स्वानंदानें विचरे विहरे । रोधिल कोणि न तया ॥ग. स्वा.
स्वप्रभ होउनि बलसुख भोगिल । धरिल न संभ्रांतभया२
परशिक्षित परगुण नच गाइल । गाइल हरिहरजया ॥४॥
अमोदक हरि नेमें देइल । नेइल संकट लया ॥ ५ ॥
पारतंत्र्य हें जिणें व मरणें । समान, कांहि न रया ॥ ६ ॥
स्वाधीनत्वें करणें समुचित पुण्याच्या संचया ॥ ७ ॥
पाशमुक्तिसुख भोगुनि लक्ष्मण । नाचतसे थैथया ॥ ९॥

अनुष्टुभ्.

सेवेनें भंग तेजाचा अपमान पदोपदीं ।
हीनता दीनता भारी निष्पराक्रम जीवन ॥ १ ॥
रामाचा दास अन्यांच्या सेवनीं रावतो कसा ।
आव तो जाइना रामा ! नको ही परतंत्रता ॥ २ ॥
परतंत्र जिण्याला जें लाजे मच्चित्त त्या कसें ।
पाडिलें गोविलें पाशीं ? तापाशीं दाविना पुन्हां ॥३॥
' योगक्षेम स्वभक्तांचा चालवी मीच ' हें प्रभो ।
ब्रीद राखी दयासिंधो ! दीनबंधो ! रघूत्तमा ॥ ४ ॥
श्रीरामचंद्रचरणस्मरणध्यान या घडो ।
शुक्लचंद्रकलेसें तें वाढो तत्प्रेम अंतरीं ॥ ५ ॥

# ४ प्रासंगिक कविता.

## ३५ विवाह समर्थी सासऱ्याचा उपदेश

दिंडी

शके अठराशें एकवीस सालीं
माघ वद्य प्रतिपदा तीथ आली ।
द्वितीयाश्रम मज द्यावया सुकालीं
परशुरामाची सुता सज्ज झाली ॥ १ ॥
दहा होतां घटि पळें आडतीस
मायबापें मत्करीं दिले तीस ।
सुता चिंता ह्मणाति हो ह्मणुनि जीस
हरुनि हरिलें त्यांचिया काळजीस ! ॥२॥
"द्वादशाब्द राखिला मला ठेवा
तुह्मां हातीं देतसों सुखी ठेवा ।
धर्म अर्थे कामेच--ही प्रतिज्ञा
स्मरुनि वागा, सांगणें नको सुज्ञा" ॥३॥
बोध केला समयानुरूप गोड
चिरस्नेहाची करुनि दिली जोड ।
तदुत्तर ते सप्रेम कन्यकेसी
बोलिले तें सांगतो मी तुह्मांसी ॥ ४ ॥

"तूं हि बाळे ! ऐक हा सूपदेश
पती जेथें जाण तो तुझा देश ।
पती दैवत गुरु मानितेचि आर्या
समर्यादा पतिकार्य करी भार्या ॥ ५ ॥
सत्य मंजुल मित मधुर गे वदावें
विनयरत्नें वपु नित्य भूषवावें ।
तुष्ट चित्तें तच्चित्त तोषवावें
भुवन आनंदें सर्वदा भरावें ॥६॥
सर्वसौख्याचें स्थान मित्र साचें
श्रांत होतां विश्राम पावण्याचें ।
एकमेकां आधार तुह्मी आतां
सुखें नांदा हरिजेल सर्व चिंता ॥ ७ ॥
सिता सावित्री द्रौपदी सती गे !
अनुसराया तुज योग्य दीसती गे ।
नित्य वडिलांची शुश्रुषा करी गे
कुलजकन्या ही कीर्ति वरि वरी गे ॥ ८ ॥
मांड करण्याची गृहस्थाश्रमाची
धर्मनीतीला धरुनि वागण्याची ।
रीत तुह्मां दावील देवराव
पदीं ठेवा तन्निष्ठ शुद्धभाव ॥९॥
अर्थकामा साधुनी मोक्षधर्म
जागवा हो ! पावाल नित्यशर्म ।

उठा ! जागा ! संसार रामरूप
करुनि भोगा उभयत्र सुख अमूप ॥ १० ॥

योग्य कालीं सत्पुत्र कूस बाहो
शांतिवैभवही तुह्मांसवें राहो ।
रमो आनंदी लक्ष्मणा सती ही
जसी सीता रामास तसी तीही ॥ ११ ॥

---

## ३६ एक प्रसंग.

### ' भयकृत् भयनाशनः '

( माझा वडील मुलगा मोरया हा दोन वर्षांचा असतांना घडलेला एक प्रसंग व मिळालेला भक्तीचा उपदेश यांत वर्णिला आहे. )

रथोद्धता

एकदा स्वसदनासि कौतुकें
गात गात शिरलों गृहांगणीं ।
दौंड घेत करि लास्य तत्क्षणीं
मोरया सुभरिला महासुखें ॥ १ ॥

साजिरी मधुर मूर्ति कोवळी
दंतपंक्ति जणुं मौक्तिकावळी ।

सूत्र ते कटितटीं कडीं करीं
बाळरूप मन देखतां हरी ॥ २ ॥
उंच हात उजवा उभारिला
उंबऱ्यावरि दुजा अधांतरीं ।
पाय नाचवित आंग हालवी
बाळकृष्ण गमला मदंतरीं ॥ ३ ॥
'घे मना' वदत बोल बोबडे
धावरा त्वरित घ्यावया कडे ।
प्रेम तेथ तितुकेंचि येथही
चंद्र देखत उचंबळे मही ॥ ४ ॥
आमुच्यामधिल थोर अंतर
पायऱ्या खडबडीत खोलट
तोल जाय तरि–धीरता गळे
घर्मबिंदु उठले तनूवरी ! ॥ ५ ॥
तो मनांत परिणाम आणितां
जाहली सभय वृत्ति बावरी ।
झांप घालितचि आंग टाकितां
झेंप घेत करिं मीहि सावरी ॥ ६ ॥
वायुवेग शिरला पदांतरीं
प्रेमसागर तुडुंब अंतरीं ।
लोटलों झडकरी कसा तरी
बाहुपाश पसरूनियां धरी ॥ ७ ॥

घेतला विलगला डिकापरी
लाडिका परिस जाहला मला ।
स्पर्शनेंचि दवडी मनोमल
दिव्यता प्रकटवी सुकोमला ॥ ८ ॥
मोरया मम उरीं विसावला
काय हा सुखतुषेंत नाहिला ।
वेग म्यां पळभरी न साहिला
अश्रुपूर नयनांत वाहिला ॥ ९ ॥
देव तरि तरि कोण मारिता ?
मारि त्यासि तरि कोण वारिता ? ।
बालकें स्मरविले रमावरा
ज्याहुनी मज दुजा न आसरा ॥१०॥
कोण दिव्य तरि ही अनन्यता
प्रेमता सकलभीतिशून्यता ।
देशकालविषयीं अभेदता
मोरया गुरुच होय तत्वता ॥११॥
बालकासि गुरु संत देव वा
काय काय ह्मणुं यास मी तरी ।
तारण्य स्तव भवार्णवांत या
विठ्ठलें मजसि धाडिली तरी ॥१२॥
म्यां मनीं ह्मणिलें "परात्परा !
देइ गा असिच बुद्धि त्वत्परा ।

बाल हा मसि तसाच मी तुला
पुत्र दार धन देह अर्पिला ॥ १३ ॥
दान देईं---विनती तुझ्यापदीं
संपदीं स्मरण तेविं आपदीं ।
वेड दे हरि ! तुझेंचि मन्मना
वेड लाविन तुला दयाघना ! ॥ १४ ॥
मायबाप गुरु तूंचि पालक
तूं त्रिसत्य भयकृत् भयांतक ।
त्या तुला शरण मी दयाकुला !
लक्ष्मणासि गुरु बाल जाहला ॥ १५ ॥
तत्क्षणीं सुखसमाधि लागला
प्रेममूर्ति हरि चित्तिं जागला ।
तो प्रसंग स्मरतांचि मागला
स्फूर्तिगांगजलपूर लोटला ॥ १६ ॥

आर्या

वत्सलता भक्ति सख्या यांचा मी जाहलों प्रयाग, मला
प्रवृत्तिनिवृत्तींचा संगम हा एकरूपता गमला ॥ १७ ॥

ग्रंथ संग्रहालय
क्र. ९८३०

## ३७ लीला आणि मोरया.

( तीन वर्षांच्या अंतरानें जन्मलेलीं हीं भांवडें अपासांत बोलत आहेत. या बाळगीतांत पुढें येणारे मामा ह्मणजे मीच. माझीं मुलें मला मामा नांवानेंच संबोधितात. )

लीलाः—दादा ! दादा ! ये इकडे
मौज दाविते तुला गडे ॥
मोरयाः—कां गे लीले ! बलावतें ?
हा मी आलों पहा इथें ॥
लीलाः—पहा पहा रे ! ढगाकडे
चांदोवा हा ये इकडे ।
चाले माझ्या सवें कसा
जाते तिकडे पळे जसा ॥
मोरयाः—जातो तो गे आइकडे
घेइल त्यासी आइ कडे ॥
खाऊ खाया हा जाई
मांडीवरि करि अंगाई ॥
लीलाः—आई त्याची कुठें असे ?
आह्मांला ती कां न दिसे ? ॥
मोरयाः—दिसतो ढग जो तो तिकडे
राहे ती त्यापलीकडे ।
पहा ! घरांतचि हा शिरला
मुळीं दिसेनासा झाला ॥
लीलाः—चैन त्याची झालि अहा !
शिरला गेला घरीं पहा ।

आई येइल ।
पाप्पा घेइल ।
नाहूं घालिल ।
खाऊ देइल ।
निजविल त्यातें मांडिवरी
गाणीं गाइल गोड वरी! ॥ १ ॥

× × ×

दादाः—काय अरेच्या ! हे पडले
थेंब अंगावरि तरि कसले

लीलाः—आहे ठाउक मज सारे ।
दादा वेडा मोठा रे ॥

दादाः—कां गे वेडा मज ह्मणसी ।
फूं गडी मी करिन तुसी ॥

लीलाः—दादा आम्हुचा शहाणा हा ।
आहे वेडी मीच पहा ॥

दादाः—थेंब पुन्हां हे आले गे ।
कपडे होतिल ओले गे ॥
सांग बघूं हे काय तरी ।
शाहणी मग तूं होसि खरी ॥

लीलाः—सांगतो मीं मज सारे ।
ठाउक आहे बाप्पा रे ॥
मुतला चांदोबाच वरी ।
त्याची लागे धार खरी! ॥

गुलाम हांसुनि बघे मला ।
दादा दिसतोना तुजला ॥
टोपी डोक्यावर बघ ती ।
लुकलुक डोळे करिताती ॥
दादाः—प्रकाश अंधुक कसला तो ।
त्याच्या मागुनि गे ! दिसतो ॥
लीलाः—आई त्याची ।
प्रेमळ साची ।
मूर्ति दयेची ।
देवाजींची ।
घेउनि दीपक रे हातीं ।
प्रकाश त्याला दाखविती ॥ २ ॥

× × ×

दादाः—लीले आपुले मामा हे ।
आले आले तूं पाहे ॥
लीलाः—मामा मामा ! सांग मला ।
विचारिते मी एक तुला ॥
चांदोबाची आइ कशी ।
कोठें राहे सांग मशी ॥
मामाः—सांगतों मी तुज बाळे ।
ढग हे दिसती जे काळे ॥
त्यामागे आकाश निळें ।
वर्तुळ दिसतें बघ सगळें ॥

आकाशाच्या पलीकडे ।
ती राहे घर तिचें वडें ॥
आहे ती बहु कनवाळ ।
सकळांचा करि सांभाळ ॥
मोरया:—चांदोबाला भाउ किती ।
पुत्र तिला हो किति असती ॥
मामा:—तेजस्वी सुत तीन हिला ।
विश्वप्रकाशक रवि पहिला ॥
दाहक पाचक अग्नि दुजा ।
शीतल कोमल चंद्र तिजा ॥
आहे ती बहुपुत्रवती ।
बाळ तिचे बा ! ही जगती ॥
सकळा जीवांची आई ।
आई ह्मणतां ती दाई ॥
आह्मि बाळे ।
लाडिवाळे ।
प्रातपाळे ।
दास कृपाळे ! ये आई !
लक्ष्मण प्रेमें तुज गाई ॥

---

# ३८ पद्मेचें हास्य

( माझी तान्ही मुलगी पद्मावती—हिचें मधुर हास्य
पाहून सुचलेलें गाणें )

पद ( चाल—नृपममता रामावरती )

पद्मावति अमृतोपम हें । स्मित तुझें सुखवि मज वाळे।
। बहुतची ॥ ध्रु० ॥

१

कोठुनि हें हास्य तुवां गे । आणिलें सांग वेल्हाळे! ॥ झडकरी
हास्य हें न भूलोकीचें । जें तुझिया वदनिं झळाळे ॥ लाडके॥
दंभता, नसे तत्वता यांत सर्वथा ।
वाटतें बाळे । स्वसुखाचे सारे चाळे । खाचेताचि ॥ १ ॥

२

आत्माचि सुखाच्या गोष्टी । रंगुनि करि वाटे चित्तीं । बालिके
स्वानंदसुखाच्या येथें । लहरींवरि लहरी उठती ॥ खचितची
संसार, वदति निःसार त्यांत सुखसार ।
हास्य जें न मिळे । आणिलेस कुठुनि दयाळे वद तरी ॥ २ ॥

३

गे नको नको तूं बोलूं । परि अशीच हांसत राहीं ॥ सर्वदा ॥
पुलकांकित तनु होवो ही । बुडुनियां चित्त सुखडोहीं, ॥
डोलुनी अंतरात्मा हा । विमल शांति भोगो बाई, ॥

वय तरी, सुखदनिर्झरीं, मोदसागरीं ।
न्हावुनी धालों । सुखरूप केवळ उरलों । लाडके ॥ ३ ॥
स्वर्गंगाजलबिंदू कीं । अविरत हे वाटे गळती ॥ बालिके ॥
पारिजातसुमनें अथवा । अंगावरि वरुनी पडती ॥ ,, ॥
कीं सुधावृष्टि हर्षानें । करितसे चंद्रमा ह्मणुं ती ॥ ,, ॥
हें भाज्य, पृथ्विचें राज्य, सकल साम्राज्य,
त्याज्य मज गमती । तव या मधु हास्यापुढती ॥ बालिके ॥४

---

## ३९ स्नेहलता

——:o:——

( इंदूरची राजकन्या स्नेहलता इच्याबद्दल तिची माता महाराणी श्री. सौ. इंदिराबाई यांची देवास प्रार्थना. ही द्व्यर्थी आहे. दुसरी साकी गाळली तर ही प्रार्थना सार्वत्रिक होते. ह्या अर्थी स्नेहलता ह्म. भक्तीची लता. हिचा आश्रय हरिप्रसाद. भक्तीचा हरीनें स्वीकार केला तरच तिची सफलता. भक्तीला हरिप्रसादाची जोड मिळून त्यांचा विस्तार आकाशतत्वापलीकडील जें शुद्ध परमात्मस्वरूप तेथपर्यंत होवो हा पांचव्या साकीचा अर्थ आहे स्नेहलता नित्य लडिवाळपणानें खेळे ह्मणून वात्सल्यानें या साक्या लिहिल्या आहेत. )

**साकी.**

स्नेहलता ही चंद्रकलेपरि वाढो प्रतिदिन देवा ! ।
सेवा आपुली घ्या इजला हा आत्मकृपेचा ठेवा ॥ १ ॥
रेवातीरीं इंद्रपुरीं हा देवें दिधला मेवा ।
हेवा कोणाचाहि न बाधो या नित्य सुखी ठेवा ॥ २ ॥

स्नेहाचें तुह्मि रोप लाविलें जतन करा गा यातें ।
कीर्तिसुगंधें विश्व भरो हें हो सकलां गायातें ॥ ३ ॥

स्नेहलता ही हरिप्रसादा पावुनि वाढो स्वसुखें ।
यांच्या शीतल छायेखालीं गुण जन गावोत मुखें ॥ ४ ॥

चढोत यांच्या पल्लवशाखा गगनमंडपावरतीं ।
देव संत या कृपादृष्टिनें वर्षोत हींच विनती ॥ ५ ॥

---

## ४० उपकृतिस्मरण.

( परमात्म्याचे उपकार आठवून हें प्रकरण लिहिलें आहे. देवानें परोपरीनें विविध प्रसंगांतून माझें रक्षण केलें, सुबुद्धि देऊन सद्ग्रंथ व संतसज्जन यांचा समागम दिला, याबद्दल त्याचें व संतांचे उपकार कृतज्ञतापूर्वक स्मरावे व तें काव्यरूपानें वर्णावेत अशी श. १८४२ च्या पाडव्याचे दिवशीं प्रेरणा झाली व तदनुसार हें प्रकरण गेल्या चैत्रांत लिहिलें गेलें. हें बहुधा आत्मचरित्रपर निघालें हें सहजच आहे.

बाळपण १ – ३; मराठी शिक्षक ४–५; वडिल व चुलते ६–७; वडील रामभाऊंची भक्ति व माझी रोगमुक्तता ८–१३; पुण्यास इंग्रजी विद्याभ्यास व शिक्षक १४–१८; आवडीचे मराठी, संस्कृत व इंग्रजी ग्रंथकार १९–२७; भाषाभेद पण अर्थ एक २८–३१; पुण्यांतील विद्वान् व त्यांपैकीं ज्यांच्या व्याख्यानांचा व संगतीचा मला लाभ झाला ते ३२–३४; माधवराव रानडे ३५–३६; श्रीधरपंत जिन्सीवाले ३७–३८; टिळक ३९–४२; सांप्रतच्या विद्येचा परिणाम ४३–४५. यानंतर एक लावणी दिली आहे. कै. गोपाळराव आगरकर हे माझे इंग्रजी पांचवीपासून बी. ए. पर्यंत शिक्षक होते. तारुण्यांत

मिलस्पेन्सर यांचे ग्रंथ पाहिल्यामुळें व आपल्याकडील ग्रंथ किंवा परंपरा न पाहिल्यामुळें त्यांचीं मतें सुधारकी झालीं व त्या मतांचा व नास्तिकपणाचा उपदेशही ते वर्गांत, पत्रांत व घरीं करीत. मी कॉलेजांत असतांना एक वर्ष नास्तिकपणाच्या त्यांच्या मताचा माझ्या मनावर परिणाम होऊन चित्तवृत्ति गलबलली. ही उदासीनता परमात्म्यानें कृपा करून खेडाजवळील एका डोंगरावर घालविली तो प्रसंग आठ कडव्यांच्या या लावणींत वर्णिला आहे. गोपाळरावांचे माझे झगडे वर्गांत व त्यांच्या घरींही होत. त्या प्रसंगीं परमात्म्याच्या केवळ दयेनें जो अपूर्व लाभ झाला त्यानें नास्तिकतेचे संस्कार तत्काल उडाले व चित्त भक्तिमार्गाकडे वळले. गोपाळरावांचें व माझें तेव्हांही अत्यंत प्रेम होतें व त्यांचें सौजन्य, अंतःकरणाचा मोकळेपणा, व साधेपणा यांविषयीं माझा प्रेमादर कायम आहे. परमार्थ दृष्टि उत्पन्न झाल्यावर पाहिलेले ग्रंथकार ४७–५१ दर्शन–संगति वोधहि ज्यांपासून प्राप्त झाले असे संत ५२–६२; वादाचा कंटाळा व त्याचे दुष्परिणाम ६३–६४; ज्या मित्रांच्या सहवासांत संवादसुख मिळालें व मिळते ते ६५–६८; उत्तम शिष्य ६९; भार्या व प्रपंच ७०–७२; परमार्थ संगतीनें बसलेली मनाची घडी ७३–७५ देवाचे उपकार ७६–८०.)

### शार्दूलविक्रीडित.

मातें जन्म दिला दयाळु हरिनें सत्पूर्वजांच्या कुळीं
बाळत्वीं बहु रक्षिलें जरिहि मी आलों पित्याच्या मुळीं।
वात्सल्यें जनकाग्रजें बहुरसें सांभाळिलें नित्य या
आर्तत्राणपरायण प्रभु खरा त्याचीच सारी दया ॥१॥
होतें दूधदहीं गृहीं विपुलसे अंगीं भरे बाळसें
आधिव्याधि नसे न ठाव दिधला देहीं कधीं आळसें।
शीतोष्णांत वनीं विहार करणें वृक्षांवरीं वैधणें
डोहांमाजि बुड्या गड्यांसह उड्या खोड्या किती सांगणें२

पौडग्राम असे मुळानदितटीं सह्याचळाच्या कुशीं
बाळत्वीं बहु भोगिलीं बहु सुखें जीं वर्णवेना अशीं ।
अभ्यासांत तसाच बालसमुहीं खोडयांत अग्रेसर
त्या सौख्या स्मरतांहि हर्ष उपजे प्रेमास येतो भर ॥ ३ ॥

आर्या.

गोविंदराव ब्रह्मे, शिंपी मास्तर, मराठी शाळेंत ।
यांनीं प्रथम पढविले अंगा लागों दिला न म्यां वेत ॥४॥
वर्षें तेरा गेलीं द्वाडपणा बहुत वाजला अंगीं ।
प्रिय गुरुजनांसि होतों विद्यारति विलसलीहि प्रत्यंगीं ॥५॥

शार्दूल विक्रीडित.

आधी व्यंकट, रामचंद्र दुसरे, श्रीकृष्णनामा तिजे,
दादा, बापुहि बंधुपंचक भले सच्छील भावार्थि जे ।
त्यांपैकीं तिसऱ्यास दोन मुलगे—आधी सखाराम, मी
त्यापाठीं, भगिनी मधें उपजली गोदा सुशीला शमी ॥ ६ ॥
वर्षी तो प्रथमीं दिवंगत पिता झाला महाप्रेमळ
गेला त्याचि पथें चतुर्थ चुलता षष्ठांत तो सोज्वळ ।
दादा पाटिल चित्रकार बरवे सर्वांहि वाखाणिले
ज्याणीं प्रेमभरें निरालसपणें माझे लळे पाळिले ॥७॥
सर्वांमाजि विरक्त भक्त नियमी श्रीरामभाऊ भले
गीता—नामसहस्र—नित्यपठणीं सप्रेम जे रंगले ।
ज्यांचें लक्ष पुरें निरंतर अनुष्ठानीं तथा पूजनीं
संसारीं रतसे दिसोनि सुटले संसारपाशांतुनी ॥ ८ ॥

मदेहीं शिरलें भयंकर घुरें वर्षाष्टमीं जेधवा
सारे घाबरले, उपाय थकले तेंव्हां अळंदीधवा।
भेटाया मज घेउनी त्वरित ते भाऊ स्वयें पातले
प्रार्थूनी निकरें मलाहि स्वकरें पायांवरी घातले ॥ ९ ॥

अश्वधाटी

"देवा! तुझा बाळ तूं यास सांभाळ, याची न आबाळ कांहीं करीं,
संसारजंजाळ वारीं, कृपापाळ! दारीं करी काळ हा चाकरी।
दावी न वैद्यांस, धन्वंतरी यास तूं एक, विश्वास हा अंतरीं!
वांचवी यास, त्वत्कीर्ति गायास लावी, खरी आस माझी हरी"

शार्दूळ विक्रीडित.

ज्ञानेशें सदयें स्वभक्तकृत ही सत्प्रार्थना ऐकिली
देहाची मम दुर्दशा पुनरपी नाहीं कधी जाहली।
भक्तें प्रेमभरें सगद्गदरवें देवासि बोभाइलें
देवें त्यासि उपेक्षिलें न कधिही ऐसें कुणी ऐकिले ॥ ११॥
भक्ताची न तुटेचि भीड हरिला धांवे स्वयें संकटीं
कारुण्यांबुधि भाव देखुनि हरी दुःखें पहा बोखटीं।
भाऊंचे उपकार गाइन किती प्रेमाश्रुंनीं नाहुनी
केलें दत्तविधान मौंजहि भली संपादिली भाऊंनीं ॥१२॥
बाराव्या वरुषांत राम ह्मणतां ती मूर्ति सत्वाथिली
गेली रामरसीं मिळोनि, सहजें पुण्यर्धि मातें दिली।

त्यांच्या पुण्यबळें सुख प्रचुर या जन्मांत देवें दिलें
त्यांची ध्याउनि मूर्ति पावन पदीं र्‍यां शीर्ष हें ठेविलें ॥ १३ ॥
ग्रामत्याग वडे चतुर्दशसमीं विद्यार्जनालागुनी
विद्यापीठ जुनाट पुण्यनगरी स्वीकारिली र्‍यां मनीं ।
वर्षे पांच भलें बुरें मज खरें त्या अग्रजें पाळिलें
यावच्छक्य पुढें पहा यकुवरें सप्रेम सांभाळिलें ॥ १४ ॥
कोणाचाहि न आसरा मिळविला मानीपणाच्या गुणें
स्वातंत्र्यप्रिय हा स्वभाव खपणें नाहीं उगें बोलणें ।
वर्षें द्वादश कष्ट थोर पडले आंग्लविद्यार्जनीं
विद्यानंद तरी बराच लुटला हा काळ विद्वज्जनीं ॥ १५ ॥
झाले शिक्षक पुष्कळ प्रथम मी सर्वां मनें आदरीं
सर्वांच्याचि कृपाबळें शिकलों मी शारदामंदिरीं ।
त्या सर्वांत गणेशपंत रुचले दातार प्रेमार्द्रधी[1]
नंदगीकर आपटे बहु भले गीर्वाणभाषासुधी ॥ १६ ॥
झाला नाहिंच शिष्यवृंदकलिजा गोपाळरावापरी[2]
मूर्ति प्रेमळ, वृत्ति मोकळि सदा, ती साधुमूर्ती खरी ।
त्यांचे ते न मला विचार रुचले तेव्हांहि आतांपरी
अद्यापि स्मरतां उदार मन तें नेत्रांत येती सरी ! ॥ १७ ॥
जे जे शिक्षक मित्र सज्जन मला येथें मिळाले भले
जे जे ग्रंथ अनूत्तम प्रतिदिनीं वाचावया लाभले ।

---

१ गणेश रामचंद्र दातार हे न्यू इंग्लिश स्कुलांत १८८७ सालीं तिसरीवर शिक्षक होते. २ गोपाळराव आगरकर हे इंग्रजी पांचवीपासून बी. ए. पर्यंत माझे शिक्षक होते.

ज्यांची संगति थोर लाभलि मला सच्छीलसंवर्धनी
सर्वांचाहि सदैव मी मनिं असे सप्रेम भारी ऋणी ॥१८॥

आर्या.

तारुण्यभरांत बहु ग्रंथ घरीं पाहिले तयांनाही
पूज्य गुरुचि मी मानी सीमा उपकृतिस त्यांचिया नाहीं १९
उपदेशिति सर्वांतें सर्वस्थळिं सर्वकाळ सत्ग्रंथ ।
गुरुदक्षिणा न मागति, भागति अंगें, खरोचि हे संत ॥ २० ॥
प्राकृतगद्याचार्या गुरुवर्या विष्णुशास्त्रिबोवाला ।
प्रथम नमस्कृति माझी तेणें ज्ञानस्फुलिंग चेतविला ॥ २१ ॥
प्राकृतकवींत मुक्तेश्वर महिपति वामनादि मज रुचले ।
ग्रंथार्थस्तन्यातें झगटुनि प्यालों-भलें मला सुचलें ॥ २ ॥
श्रीकालिदासभारविभवभूतिप्रमुखसत्कवीश्वर ते ।
बाण जगन्नाथ तसे ज्यांच्या काव्यामृतांत विश्व रते ॥ २३ ॥
शतकें भर्तृहरीचीं गीताही पाठ जाहली सहजें ।
यांतें स्वात्मसुखास्तव कोण सुधी जाणता भला न भजे ? २४
सुविचारकमलवृंदीं गुप्त असें मधुर काव्यमकरंद ।
आकंठ सेविला म्यां तत्पर होवोनि सर्व हि मरंद ॥ २५ ॥
मिल्टनशेक्स्पिअरादि प्रसिद्ध कविहीर आंग्ल शाहीर ।
जान्सन बर्क इमर्सन कार्लाइल देति हे मना धीर ॥ २६ ॥
गोल्डस्मिथ प्रिय मला कॅरेली वार्कलेही त्या नारी ।
यांच्याहि ग्रंथांचे मजवरि उपकार जाहले भारी ॥ २७ ॥
भाषाभेद असो परि अर्थीं तात्पर्य येक समसारे ।
मत्स्यासि जीवन प्रिय आकारें होतु भिन्न कासारें ॥ २८ ॥

बटमोगरा बकुळ वा गुलाब यांचा सुगंध सुखदायी ।
रुचिभेद हो सुखें परि परिमळभोगांत भेद तो कायी ? २९
गीर्वाण मातृजननी लाड पुरवि सर्वपूज्य तीहि मला ।
माय मराठी माझी इंग्रजिही मावशी पहा विमला ।। ३० ।।
सम माय मावशी मज आजी परि जन्मदेकडे ओढा ।
'निम्नाकडेचि धांवे नाटोपे जेवि अद्रिचा ओंढा ' ।।३१।।
ह्या पुण्यपत्तनीं बहु असती विद्वांस थोर थोर भले ।
ज्यांच्या वाक्चातुर्यें लोक सकळ सर्वकाळ हे रमले ।।३२।।
केसरिसुधारकांचा झगडा सोत्साह पाहती सगळे ।
मीही त्यांतचि देखे–वादार्थीं बुद्धि सर्वथा पघळे ।। ३३ ।।
व्याख्यात्यांची येथें नित्य पहा झोड ही उठायाची ।
त्यांत तिघेंचि निवडले छाप श्रोत्यांवरी पडे ज्यांची ।।३४।।
तो राजनीतिनिपुण प्रख्यात सुधारकाग्रणी शांत ।
झटला माधवराव स्वजनाभ्युदयार्थ तो अविश्रांत ।। ३५ ।।
विषयप्रतिपादन तें अंबरगंभीर धीर ती वाचा ।
चौरस चतुरस्र भला अवतारचि काय होय जीवाचा ।।३६।।
हंसवी रडवी श्रोत्यां पैजा बांधूनि आठवे साची ।
त्या श्रीधरपंताची वाणी ती स्फूर्तिदा जिव्हाळ्याची ।।३७।।
गीर्वाणभारतीचा कंठमणि स्वेतिहासभास्कर हा ।
हा आर्यसंस्कृतीचा तेजस्वी पुत्र खचित यासम हा ।।३८।।
तच्छिष्योत्तम मित्र प्रथितयशा सज्जनां महामान्य ।
हा लोकमान्य तिलक प्रज्ञा धृति ज्याचिया असामान्य ।।३९।।

१ माधवराव रानडे, श्रीधरपंत जिन्सीवाले व बळवंतराव टिळक. २ बृहस्पतीचा

परपक्षखंडणीं हा शूर नसे कर्मवीर सामान्य ।
हा विजयवीर्यशाली होइल लोकां न वा ! कसा मान्य ॥४०॥
झटतो राष्ट्राच्या हा कायावाचामनें समुद्धरणीं ।
निःस्वार्थप्रेमानें वश जेणें केली ही पहा धरणी ॥ ४१ ॥
यांचें इतरांचेंही संगतिसंभाषणादि सुख घडलें ।
तेणें यांच्या ठायीं गुरुबुद्धिप्रेम मन्मनीं जडलें ॥ ४२ ॥

शार्दूलविक्रीडित.

विद्या ही मदिरा खरीच, भुलवी, आकाश वाटे थिटें
देहाहंकृति वाड वाढवि, मन स्वाचारधर्मा विटे ।
नाहीं धर्म नको श्रुतिस्मृति नको शास्त्रें पुराणें जुनीं
बुद्धिभ्रंश असा घडे, कलि पहा ग्रासी कसी मेदिनी ॥ ४३ ॥
विद्येचा नच दोष ती तरि असे सूज्ञांसि संतारक
अल्पज्ञानबळेंचि जीव फुगती होते तया मारक ।
खंडज्ञान मिळे तरी मद चढे पाखंड वाजे मनीं
सत्संगाविण तें जिरे नच, पडे ज्ञानाब्धही ओकुनी ॥ ४४ ॥
ह्या विद्यामद अल्पकाळ चढला माझ्या मनीं यौवनीं
होतें पूर्वजपुण्य कांहिं ह्मणुनी मी वांचलों त्यांतुनी ।
नास्तिक्यासम घोर रौरव दुजा नाहीं त्रिलोकीं पहा
दैवें देवदयार्णवांत भिजला झाला मुदें याद हा ॥ ४५ ॥

लावणी ( चाल—नरजन्मामधें नरा. )

नास्तिक्यानें तप्त जाहली मनोभूमि जेधवा ।
फुटला पाझर करुणार्णवा ॥ ध्रु० ॥

१

प्रिय गुरुंच्या[1] मम तोंडुनि आलें 'देव नसे कीं कुणी ।
सृष्टिला नाहीं दुसरा धणी ! ॥
पापपुण्य वा बंधमोक्ष या नुसत्या वा ! कल्पना ।
झुकविती सकळां मूढां जनां
काळा कातहि चुना पांढरा हिरवीं पानें जशीं ।
निर्मिती रंग तांबडा तशीं ॥
भूतेंहि पंचहि एकवटोनी विविधाकृति दाविती ।
आत्मा कोठुनि हे आणिती ॥
सृष्टि चालते स्वभावधर्में देव नसे वा ! मुळीं ।
चालते परंपरा ही खुळी ' ॥
विचारिलें मी ' तरि कां ज्ञाते देवप्राप्तीविशीं ।
करिति हें हाडाचीं काडें अशीं ? ॥
देवधर्म जरि मिथ्या, शास्त्रें संत बोलती वृथा, ।
जग हें भुललें कां या मता ॥ ?
चेतन्याविण जड चळतें हे गुरुजी मज दाखवा ' ॥ १ ॥

२

मिशा विशाळ, स्मित प्रेमळ, प्रसन्नचित्तें पहा ।
वदले ' मूर्ख खरा एक हा ! ॥
आज तुला हें कळणें नाहीं कळेल काळांतरीं ।
मत्स्मृति राहो दे अंतरीं ' ॥

---

1 गोपाळराव आगरकर.

सांत्वन माझें नाहिं जाहलें वर्षं लोहलें तरी ।
शिरलें नास्तिशल्य अंतरीं ॥
भाव सटवला अभाव घुसला हें ना तें जाहलें ।
अनिश्चय चित्तीं भारी सलें ॥
नास्तिक्याचा दंश जाहला विष संचरलें मनीं ।
पेटली पाखंडाची धुनी ॥
तुटली श्रद्धा सुटली संध्या धर्मकर्म खुंटलें ।
विश्व हें निरालंब भासलें ॥
उदास झाली वृत्ति दिसेना कोठें मज आसरा।
चुकतां माय जशी वासरा ।
समाधान तें भंग पावलें जसा तापला तवा ॥ २ ॥

३

खेटक नामें ग्राम प्रसिद्ध श्रीसिद्धेश्वरपुरी ।
वसलें आहे भीमातिरीं ॥
तीन मास मी तेथ राहिलों चित्त रमेना कुठें ।
विकल्पगिरिवरि तें आपटे ॥
पटेनना नवतत्त्व सत्त्वहरि नास्तिकता पूतना।
शास्त्रें तिस गणती पूत ना ॥
आस्तिकता कंबळ दीनाची गेली उघडा पडे ।
हिंवानें मत्तनु ही थडथडे ॥
पुण्याई वडिलांची निकटीं होती जी संकटीं ।
धाउनि घे मज ती कटितटीं ॥

एक दिवशीं नेणों कैसा जिव हा उल्हासला ।।
कारण कांहीं न दिसे मला ।।
लहरींवरि लहरी उठल्या या आनंदाच्या मनीं ।
लागली कोठें ती सुखखनी ! ।।
चमत्कारलों मीच मला हा अनुभव वाटे नवा ।। ३ ।।

४

सायंकाळीं शिलातलावरि बसुनी सृष्टीकडे ।
पाहिले तुटले गिरिचे कडे ।।
भीमेचें तें वळण देखिलें दूर ग्रामाकडे ।
पक्षिगण आनंदानें उडे ।।
वत्सस्नेहें पान्हावत त्या गाई हुंबारती ।
गुराखी त्यांमागें दौडती ।।
संध्यारागसुरंजित पश्चिमदिग्भागीं चमकला ।
तारा गुरु तेजस्वी भला ।।
किलविल किलविल करित धांवती पक्ष्यांचे ही थवे ।
मधुनी चमचमती काजवे ।।
मंजुध्वनिनें पुंज अलींचे कुंजीं ते गुंजती ।
कोठें कोकिळही कूजती ।।
सृष्टिदेवतेवरी पसरली जणुं काळी कांबळी ।
असे कां कोणि तिच्याहुनि बळी ? ।।
सृष्टिपलिकडे कोणि असे कीं दूर करिल जो भवा ? ।। ४ ।।

५

बाह्यसृष्टि झांकतां उडालें भानहि सारें तिचें ।
लोपलें दृश्यजात चित्तिचें ।
मति गुंगाया औषध देती तैसी झाली परी ।
बुडाली अंतःसृष्टी खरी ॥
खेटक गेलें, पर्वत नगरें राज्यें गेलीं लया ।
उरलें कांहि न देखावया ॥
ग्रीस रोम तें ब्रिटनहि गेलें भरतखंडही तसें ।
देखणाहि उरला नसे ॥
अनंत ब्रह्मांडेंही गेलीं महाप्रळय पातला ।
विवेकहि सारा बा! आटला ।
दृश्य अदृश्यहि सृष्टजात हें सारें गेलें लया ।
कांहीं कोणि न पाहावया ॥
सृष्टि बुडाली मीहि बुडालों देह बुद्धि आणि मन ।
झालें सहज कसें उन्मन ॥

× × × ×

× × × ×

काळ किती लोटला कुणाला ठावें कैशापरी ।
उतरलि समाधि माझी खरी ॥
परमानंदीं ठाव मिळाला अमृतरसास्वादन ।
घडलें निजसुखसंतर्पण ॥
पुन्या घृतीं चुबकळल्या तळल्या टरटरती गा जश्या ।
परमानंदीं वृत्ती तशा ॥

वसंतागमीं वृक्षलता या टवटवती गा जशा ।
प्रफुल्ल झाल्या वृत्ती तशा ॥
मुरलिरवानें मोहुनि जाती समरसती त्या जशा ।
गोपिका कृष्णरूपिं या तशा ॥
गोपी डोलति नाचति हांसति कृष्णसंगतीं जशा ।
तन्मय झाल्या वृत्ती तशा ॥
रासक्रीडासुखभोगाचा स्वाद घेतला जयें ।
वाचेहातीं ध्याया नयें ।
गोविंदा रे परमानंदा नमो नमो माधवा ॥ ६ ॥

७

देहेंद्रियगण तुष्ट जाहला शांतिसुखा पावला ।
अवघा जीवभाव हरपला ॥
मी–तूं–विण आनंद केवल प्रेमपूर्ण पाहिला ।
त्रिपुटीरहित भोग जाहला ॥
अर्धोन्मीलित नेत्र ढाळिती आनंदाश्रू कसे ।
शरीर रोमांचित होतसे ॥
प्रसन्न झाली दृष्टि सृष्टिही प्रसन्नता चहुंकडे ।
महासुख घरिं आलें रोकडें ॥
ताप निवाला संशय तुटला शोक सरकला दुरी ।
स्फुरला नारायण अंतरीं ॥
मनीं उपजलों प्रसाद झाला स्वयें देव प्रगटला ।
दयाघन करुणाकर वर्षला ॥

अपात्र असतां खूण दाविली करुणार्णव माउली ।
भेटली वत्साला गाउली ॥
शाश्वत चिन्मय सुखरूपा या नमो सृष्टिच्या धवा ॥७॥

८

हीहि सुखाची ऊर्मि उतरली आलों देहावरी ।
निवालों थोरसुखें अंतरीं ॥
पूर्वी कधिही नाहिं देखिलें कोठें नच ऐकिलें ।
हरीचें प्राप्त गूज जाहलें ॥
प्राप्ताचें संरक्षण व्हाया संतमार्ग चोखट ।
सुधरला भक्तिबळें उद्भट ॥
दुसरे दिवशीं पुण्यासि जाउनि दासबोध आणिला ।
गाथा तुकयाचा मिळविला ॥
अष्टोत्तरःशत समर्थबोधाचीं ही पारायणें ।
करविलीं आधी नारायणें ॥
आर्तत्राणपरायण माधव तेणें करुनी दया ।
दाविला सुगम भक्तिपंथ या ॥
मार्ग उजळला पूर्वजपुण्यें आवडले हरिगुण ।
हरीनें सावरिला लक्ष्मण ॥
प्रेमाश्रुप्लुत होउनि वंदी पुनः पुन्हां माधवा ॥ ८ ॥

---

शार्दूलविक्रीडित

तीर्थक्षेत्रनिवास, संग बहुधा हा भाविकांचा भला,
सद्विद्याश्रय, रामकृष्णचरित्र प्रेमा मला लाभला ।

तेणेंभक्ति सुखार्णवांत रमला हा जीव मीनापरी
आर्तत्राणपरायण प्रभु खरा त्याची दया ही खरी ॥४७॥
वर्षे आठ मयूरपंत कविचा सत्संग हा लाभला
त्यांच्या काव्यपयोदधींत डुबला हा जीव झाला भला ।
पंतीं सात्विकभाव दावुनि दिली श्रीरामभक्ती यया
आर्तत्राणपरायण प्रभु खरा त्याचीच सारी दया ॥४८॥
श्रीज्ञानेश्वर एकनाथ तुकया श्रीरामदासादि ते
तैसे पंडित पंत आदिकरुनी सत्काव्यभर्ते थिते ।
यांचे ग्रंथ समर्थ सत्य चिदचिद्ग्रंथीसि सोडावया
गोडी फार अपार लागलि मला मी लागलों गावया ॥ ४९ ॥
गीताभागवतार्थसेवनमुदें जो लाभ झाला सुखें
आनंदार्णवमग्न नित्य असतां वर्णीन कैसा मुखें ? ।
यांचींही बहुवार आजवरि तीं सोल्हास पारायणें
आर्तत्राणपरायणें घडविलीं सप्रेम नारायणें ॥ ५० ॥
संतीं कृष्णपदप्रपन्न सुजनीं जो बोध केला जनीं
तो सश्रद्धहि सन्मुखें परिसुनी आनंदलों मी मनीं ।
संतांचें यश गावयासि सजलों उत्तीर्ण व्हाया तया
आर्तत्राणपरायण प्रभु खरा त्याचीच सारी दया ॥५१॥
जे जे जागविती दयाधन हरिप्रेमोर्मि यत्संगमीं
चित्तीं चिल्लहरी सदैव उठती जे सूर्य मायातमीं ।
भक्तिज्ञानसमन्वित प्रभु असे म्यां संत जे पाहिले
त्यांच्या दिव्यपदीं समागमसुखीं म्यां शीर्ष हें वाहिलें ॥५२॥

---

१ पुढील ९ श्लोकांत १४ सत्पुरुषांचीं नांवें दिलीं आहेत. देव मामलेदार, सीताराम महाराज मंगळवेढकर, लक्ष्मणबुवा वाखरीकर, इ.

वंदूं श्रीयशवंत देव सुकृती जेणें जना तारिले
पश्चाब्दीं स्वकरें जयें सकरुणें पेढे मला चारिले ।
पेढे ते न प्रसादयदान दिधलें देवें स्वहस्तें मला
वंदूं प्रेमसमुद्र शांतिजलधी तो देव सत्त्वाथिला ॥ ५३ ॥
मातें पंढरिवास चार वरुषें देवें दिला विठ्ठलें
भक्त्यानंद अपार तेथ लुटिला म्यां पूर्वपुण्यें बळें ।
तेथें देखिलि नग्न निर्मल प्रियां आनंदमूर्ती भली
विद्याहंकृति पार लोपलि पहा जाणीवही लाजली ॥५४॥
सीतारामपदांसि घट्ट धरिलें प्रेमाश्रुंनीं न्हाहिलें
चित्तींचें गुज सांगुनी गुरुवरें तेणेंहि आश्वासिलें ।
' थंडी जाइल, रामराम वद रे, व्युत्पत्ति सारी दुरी '
ऐसें बोधुनियां प्रसन्नवदनें तो हस्त ठेवी शिरीं ॥५५॥
म्यां श्रीलक्ष्मण वाखरीकर बुवा तेथेंचि हो पाहिले
ते मालेपरि सर्प हास्ति धरुनी कंठीं जयें वाहिलें ।
ज्यातें विस्मृतिचा निमेषहि गमे मोठ्या युगासारिखा
वर्षाकाळहि लोचनांत वसला तो भक्त न्हावी निका ॥ ५६ ॥
श्रीनारायण केडगांवकर यच्चित्तीं नये डोल तो
मुद्रा शांत मुख प्रसन्न बघुनी श्रीदत्तही डोलतो ।
वृत्ति प्रेमळ मूर्ति सोज्वळ रत ध्यानाचिया साधनीं
लावी प्रेमभरें समस्त जनता श्रीदत्त–आराधनीं ॥ ५७ ॥
कृष्णाची मुरली गुलाब बनली वेधी जना सुस्वर
धर्मप्रीति अपार कृष्णभजनीं ज्ञानीं दुजा भास्कर ।

रामानंदपदारविंदकमलीं जो भृंगसा राहिला
ऐसा सद्गुरुभक्त माहुलिमध्यें सप्रेम म्यां पाहिला ॥ ५८ ॥
म्यां गाणेश तपस्वि अद्भुत असा पालीकडे देखिला
माउंग्यासहि श्यामदासवदनें गीतार्थ म्यां ऐकिला ।
देवासांतहि शीलनाथ नमिला जो मान्य विद्वज्जनीं
सिद्धारूढ प्रसिद्ध सिद्ध हुबळीमध्येंहि शैवाग्रणी ॥ ५९ ॥
वाडीभाजिहि वासुदेव यतिची श्रीदत्तभक्तिप्रथा
ऐकोनी नमिला यतींद्र विनयें संतारका यत्कथा ।
' काका राव पुराणिक प्रभु'चरित्राचा भला आरसा
सेवी रामपदांबुजा अलि जसा अत्यादरें सारसा ॥ ६० ॥
ते भागानगरींत बापु भटजी सद्भक्तचूडामणी
गंधर्वासम गान, नाथ दुसरे ज्ञानान्नसंतर्पणीं ।
यांची संगति पंगतीहि घडली हें भाग्य भारी गणी
सर्वांचाहि सदैव मी मनिं असे सप्रेमभावें ऋणी ॥ ६१ ॥
ग्रंथा वाचुनि जे कधीं न कळतें तें संतसंगें कळे
ग्रंथावांचुनि भाविका सकळही तें संतसंगें कळे ।
संतांचा सहवास होय तरि बा ! सद्ग्रंथ सारा कळे
सत्संगीं रमतां न जीव तरि त्या कांहीं कळे ना वळे ॥ ६२ ॥
सत्संगीं समधर्ममित्रनिवहीं संवादसौख्यासही
येते जी भरती न त्यासम दुजा आनंद लोकीं तिहीं ।
वादें वाढत वैरवन्हि बहुधा तो म्यां दिला टाकुनी
संवादीं सुख थोर रीत ह्मणुनि स्वीकारिली ही जुनी ॥ ६३ ॥

ज्यांचें चित्त जळे, समत्व वितळे, संतोष सारा पळे,
दीर्घस्नेह गळे, अहंकृतिबळें पुण्यर्धि तीही ढळे, ।
शांतिश्रांति चळे, सुबुद्धिहि मळे, संक्षोभ वादानळें
वादी तो न वळे, न वादहि खळे, होती खुळे आंधळे ।  ॥ ६४॥
यच्चित्तीं परमार्थकाम, सुदृढा निष्ठा स्वधर्मीं जया
प्रीति श्रीहरिपादपद्मभजनीं, ती भूतमात्रीं दया ।
त्यांची संगति आवडे, न इतरा संक्षोभ जेणें घडे
संवादीं प्रभुसेवकाविण मला कोणी दुजा नावडे ॥ ६५ ॥
वादीं मार्दव, सभ्यता, सरलता ती मूर्त जेथें सदा
दातार[1] प्रिय मित्र तो स्मरतसे न स्पर्शला जो मदा ।
हा ज्ञानेश्वरभक्त केशव[2] पहा मी वानितों कौतुकें
ज्याची विष्णुबुवा सुधीसह सुधावाणी पुराणीं तुके ॥ ६६ ॥
हा 'गोविंदसुत[3]' प्रपंच करितां अध्यात्मरंगीं भरे
याची बोधुनि दासबोध बरवा माझ्यासवें आदरें ।
तैसा विठ्ठलपंत[4] कामत मला तो आवडे प्रेमळ
द्वैतीं प्रीति धरूनि दत्तचरणीं जो राहिला निश्चळ ॥ ६७ ॥

---

१ गणेश परशुराम दातार बी. ए. हे प्लेगनें १८९७ साली वारले. हे छात्रांतून पळून गेल्यापासून यांस स्नेही विनोदानें 'रामदास' म्हणत. हे स्वच्छ, सडेतोड, निर्लोभ असे होते. २ केशवराव देशमुख बीए हे कै. विष्णुबोवा जोगाप्रमाणें वारकरी असून १२ वर्षं सतत रोज येथें ज्ञानेश्वरी सांगतात. ३ हे माझे ३० वर्षांचे स्नेही आहेत. यांचें नांव परशुराम गोविंद चिंचळकर. 'परमार्थ-विचारमाला,' 'रहस्यनिरीक्षण' हे यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ४ हे गोव्यांत माशेल गांवीं दिगंबरदास या नांवानें प्रसिद्ध आहेत.

REFBK-0001830

भक्तीनें रमवी मनास मननामोदास वाटा जना
नेमें वाचनलेखनांत रमुनी वानी परांच्या गुणा ।
प्रेमें सिंचन बाबुराव[1] करि हा निर्व्याज सर्वात्मना
ऐसे हे समधर्म मित्र-सकळां वंदू यथा सज्जना ॥ ६८ ॥
सीताराम[2] सुबुद्ध कोमळ मला तो आठवे फाटक
तैसा मोहनिराज वेदमणि जो ज्ञानार्जनीं कारक ।
आस्थावंत अतीव निर्मळ भली ती इंदिरा[3] सुंदरा
चाहे प्रेमळ शिष्य हे पढविता ज्ञानप्रभेचा झरा ॥६९॥
कोणासीं मनिं वैरभाव नुरला, थोडे विकल्पी जन
दोषा दावुनि तारण्यास हरिनें हे ठेविले सज्जन ।
जेथें जात तिथें समस्त करिती अत्यंत प्रेमादर
आर्तत्राणपरायण प्रभु खरा त्याची न कोणा सर ॥७०॥
माझा मित्रकलत्रपुत्र बहुधा संसार विस्तारला
त्यानें बोधियल्या सधर्म विमला श्रीकृष्णलीला मला ।
सर्वां सर्व असोनि तेथ नसणें हें वर्म ठावें जया
संसाराहुनि अन्य थोर न दिसे अध्यात्मशाला तया ॥७१॥
संपत्ती विपुला न, नाहिं पडली त्या अन्नवस्त्रा क्षिती
भार्या प्रेमळ शांत सद्गुणवती धर्मानुकूला सती ।
तेणें होय वरा गृहाश्रम सदा आनंद नांदे घरीं
आर्तत्राणपरायण प्रभु खरा त्याची दया ही खरी ॥७२॥

---

१ बाबूराव उर्फ माधव गोविंद भिडे. २ सिताराम व मोहनीराज हे दोघे माझे प्रिय शिष्य वारले. मोहनीराज बी.ए. झाल्यावर कांहीं वर्षे पंढरपुरास हायस्कुलांत शिक्षक होते. ३ इंदूरची धाकटी महाराणी.

संसारीं सुखदुःखभोग सकळांपाठी असे लागले
मोठे पंडित पंत धीर तरिही ते भोगितां भागले ।
माझा भाग मला मिळोनि सहसा माझी सुखानंदता
त्यामध्येंहि न भंग पावलि खरी ही कृष्णकारुण्यता ॥ ७३ ॥
कर्मीं सादर मी असोनि घडती विध्युक्त कर्में न तीं
नानाशास्त्रविचारणीं चतुरशी नाहीं धृती वा मती ।
योगाभ्यास न ठाउका परि असे हा एक आधार या
आहे निश्चय कीं असे मजवरी श्रीकृष्णजींची दया ॥ ७४ ॥
जें व्हावें ह्मणुनी मनोरथ भले उत्तुंग म्यां वाहिले
ज्यासाठीं बहु कष्ट सोसुनि पहा सद्योग आरंभिले ।
झालों तें जरि मी न, अच्छ दिसला सन्मान्य सन्मार्ग या
होतों तो नच आज, केवल असे ही कृष्णजींची दया ॥७५॥
देवें विघ्नशतांत रक्षुनि मला या या स्थिती आणिले
तेणें वृश्चिकसर्पदुर्जनविषांपासूनि संरक्षिलें ।
नानारोगकुयोग ते निवटुनी नानापरी पाळिले
त्यांचा मी उतराइ होइन कसा सांगा भले हो भले ॥ ७६ ॥

92.30